म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
REFBK-0002347
REFBK-0002347

म. ग्रं. सं. टाणें
विषय काव्य
सं. नं. ९०००

# अभिनवकाव्यमाला

## भाग चवथा

संपादक

प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले
न्यू पूना कॉलेज, पुणें.

पहिली आवृत्ति

सोल एजंट—विश्वनाथ गणेश आणि मंडळी,
बुकसेलर्स अँड पब्लिशर्स
हुजुरपागेसमोर
बुधवार, पुणें सिटी.

किंमत एक रुपया.

शारदाप्रसादनमंडल, पुणें

संग्रहालय

# अभिनवकाव्यमाला

## भाग चवथा

संपादक

प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले

न्यू पूना कॉलेज, पुणें.

आवृत्ति पहिली

REFBK-0002347

REFBK-0002347

2360

किंमत एक रुपया.

प्रकाशक

प्रो० लक्ष्मणशास्त्री लेले, न्यू पूना कॉलेज, पुणे.

मुद्रक

लक्ष्मण भाऊराव कोकाटे. हनुमान प्रेस, घ. नं.
३००, सदाशिवपेठ, पुणे.

( सर्व हक्क शारदाप्रसादनमंडळाकडे आहेत )

# प्रस्तावना

अभिनवकाव्यमालेचा हा चवथा भाग आज आम्ही प्रकाशित करीत आहों. मालेचा पांचवा भाग गतवर्षी प्रसिद्ध झाला. हा भाग, त्याच्या पूर्वी, निदान त्याच्या बरोबर तरी, प्रसिद्ध व्हावयाला पाहिजे होता. परंतु, ज्यांनीं आपण होऊन याचें संपादकत्व हातीं घेतलें व हा योग्य वेळीं प्रसिद्ध करण्याची वेळोवेळीं तोंडी व लेखी वचनें व आश्वासनें दिलीं त्यांच्या प्रकृतीला दुर्दैवानें विकृति जडली ! यामुळें आमची फसगत झाली व या भागाचें प्रकाशन आजपर्यंत लांबलें.

या भागांत सहा कवयित्री व चवदा कवि आहेत. यांत दुर्मिळ व अमुद्रित कविता अर्धी—अधिक आहे; व संस्कृत व प्राकृत वृत्तांत रचिलेली तीन-चतुर्थांश आहे. विषय व भाषाशैली यांचें वैचित्र्य यांत दिसून येईल. या भागांत घ्यावयाच्या ठरलेल्या कांहीं कविता शेवटपर्यंत हातीं न आल्यामुळें, केवळ अनिर्वाहपक्ष म्हणून, त्यांच्याबद्दल ‘ महाराष्ट्रवंदन ’ हें संपादकीय काव्य घातलें आहे. कविविषयक माहिती या प्रस्तावनेनंतर दिली आहे. तिच्यांत व तिच्या पुढील अनुक्रमणिकेंत कवींचा कालक्रम साधला आहे. रसिकांनीं या पुस्तकाचा परामर्ष घ्यावा अशी त्यांस सप्रेम विनंति आहे.

विजयादशमी, शके १८४५
पुणें शहर.

लक्ष्मणशास्त्री लेले.

# कवि व कवयित्री यांविषयीं थोडी माहिती.

## १. कै० विष्णु सोमनाथ सरवटे.

हे इंदूरचे सुप्रसिद्ध कवि महाराष्ट्रियांस फारसे परिचित नाहींत. यांचा ‘ वाग्विहार ’ या नांवाचा सुंदर काव्यग्रंथ सुमारें चाळीस वर्षांपूर्वीं इंदुरास प्रसिद्ध झाला. कवि इंदुरप्रांतीं शाळाधिकारी होते. यापलीकडे कवींविषयीं माहिती आम्हांस नाहीं. वाग्विहार-काव्यांत निरनिराळ्या विषयांवर विविध वृत्तांत, रागदारीच्या पदांत व लावण्यांत रचना आहे. ती फार श्रवणमधुर व मनोहर आहे. यांतील लावण्या व विशेषतः छेकापह्नुति-प्रकार तर रामजोशांची आठवण करून देतो. कवींचा हात या कृतीवरून एकवार फिरला असता तर यांत दिसणारा एकादा दुसरा ठळक दोष राहिला नसता. एकंदर काव्य रमणीय व आदरणीय आहे.

## २. कै० एकनाथ अण्णाजी जोशी.

हे दुसरे इंदूरकर कवि या पुस्तकाला लाभले आहेत. सुभेदार मल्हारराव होळकर यांजवरील यांचें काव्य फार सुंदर आहे. पुण्याच्या दक्षिणाप्राइज-कमिटीनें त्यास पारितोषिक दिलें. पण अत्यंत खेदाची गोष्ट ही कीं, कमिटीचें बक्षीस हातांत पडण्यापूर्वींच कवि दिवंगत झाले ! विद्याभिलाषी कै. श्री. शिवाजीराव होळकर यांनीं प्रस्तुत काव्य इ. स. १८९१ सालीं प्रसिद्ध

करून कवीला अजरामर करण्याचें श्रेय संपादिलें. वरील काव्यांतील एक उद्दीपक प्रसंग या पुस्तकांत दिला आहे. उपर्युक्त दोन्ही कवींचा परामर्ष महाराष्ट्रीय काव्यवाचकांनीं घ्यावा याकरितां त्या कवींचा या भागांत वाचकांशीं मुद्दाम परिचय करून दिला आहे.

### ३. कै० डॉ० गणेश कृष्ण गर्दे. एल्. एम्. ॲंड एस्.

जन्म—इ. स. १८५५; मृत्यु—इ. स. १९१६

डॉ० गर्दे पुण्यांत व महाराष्ट्रांत सुप्रसिद्ध आहेत. ते बहुश्रुत, विद्याव्यासंगी, रसिक व कल्पक होते. अष्टांगहृदय व माधवनिदान या आर्यवैद्यकग्रंथांचीं त्यांचीं मराठी भाषांतरें प्रसिद्ध आहेत. तत्त्वज्ञान, काव्य इत्यादि विषयांकडेही डॉक्टरांचें लक्ष्य होतें. महिम्न, उपमन्यु व विष्णुसहस्रनाम या स्तोत्रांचीं त्यांनीं मराठींत पद्यात्मक भाषांतरें केलीं आहेत. तीं मधुर वठलीं आहेत. शेवटच्या स्तोत्राचें मराठी नांव 'ईश—दर्शन—काव्य' असें आहे. यांत सुमारें बाराशे श्लोक आहेत व ते विविध वृत्तांत रचिलेले आहेत. या काव्यांतला एक लहानसा उतारा या पुस्तकांत दिला आहे. डॉक्टरांची वाणी प्रसन्न, प्रौढ व मधुर आहे.

### ४. प्रो० शिवराम महादेव परांजपे. एम्. ए.

जन्म—इ. स. १८६४

हे विद्वान् रसिक गृहस्थ प्रतिभासंपन्न कवि, ग्रंथकार, निबंधकार, वक्ते व वर्तमानपत्रकार म्हणून महाराष्ट्रांत नांवाजले गेले आहेत. यांची पद्यमय काव्यसंपत्ति विपुल होती, पण ती सर्व-

भक्षक कालानें बहुतेक गिळून टाकली ! यांच्या ‘ अहिल्याजार ’ व ‘ जलदागम ’ या दोनच कविता उपलब्ध आहेत. यांतील दुसरी प्रस्तुत पुस्तकांत घेतली आहे. प्रो० परांजपे यांचे निबंध सुद्धां सुंदर गद्यकाव्याचीं उदाहरणें आहेत. उपहासाचें शस्त्र यांना मोठ्या कुशलतेनें उपयोजितां येतें. यांची उपरोधिक लेख-नाची व भाषणाची शैली तर मराठी वाङ्मयांत केवळ अपूर्व आहे. हे कवि तर्कालंकारविशारद असल्यामुळें यांच्या भाषणांत व लेखांत तर्कशुद्ध कोटिक्रम व अलंकारमंडित भाषा यांचा मधुर संगम झालेला आढळतो.

## ५. श्रीयुत महादेव हरि मोडक, बी. ए.

जन्म—इ. स. १८६४

हे गृहस्थ कवि व ग्रंथकार म्हणून प्रसिद्ध आहेत. हे फार बुद्धि-मान्, बहुश्रुत, विद्वान् व रसिक आहेत. यांची भाषा नटवी, ठसके-दार व संप्रदायाची फार चाहाती आहे. यांचा ‘सुख आणि शांति’ ग्रंथ वाचकांस सुखशांति देणारा आहे. यांचा ‘ नाट्य-मकरंद ’ रसिक—वाचकमिलिंदांना प्रसन्न करणारा आहे. यांचे ‘ खडे तात्त्विक बोल ’ पुष्कळ वाचकांच्या मनांत सदैव खडा पहारा करीत आहेत. यांच्या काव्यादिकांविषयींची माहिती या मालेच्या पहिल्या भागांत आम्हीं दिली आहे. इंग्रेजी पद्यांचें मराठी पद्यांत रूपांतर करण्याच्या कामांत प्रस्तुत कवि फार कुशल आहेत. या पुस्तकांत अशा रूपांतराचे कांहीं नमुने दिले आहेत.

## ६. सपादक.

जन्म-इ. स. १८७० .

नासिकचे सुप्रसिद्ध कवि व ग्रंथकार कै० गणेशशास्त्री लेले यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव. पद्यमंजरी, महाराष्ट्र—भामिनीविलास, मेघदूत-समवृत्त-भाषांतर, तिलकांजली, सौंदर्यलहरी, विपन्न आम्रवृक्ष, ही यांची मुद्रित पद्यात्मक कृति आहे. इंदूरच्या मराठी साहित्यसंमेलनापुढें यांनीं एक पोवाडा रचून वाचला तो तेथील मल्हारि-मार्तंडांत प्रसिद्ध झाला आहे. 'अलंकारप्रकाश' हा यांचा अलंकारांवरील विस्तृत ग्रंथ आहे. 'सन्मार्गप्रदीप' हा लहान बोधपर ग्रंथ यांनीं लहान मुलांकरितां रचून प्रकाशित केला आहे. 'विश्वमंगल' हें यांचें संगीत नाटक नुकतेंच बाहेर पडलें आहे. यांची इतर नाटकीय रचना व कांहीं गद्यात्मक ग्रंथ अद्यापि अमुद्रित आहेत. 'विष्णुस्मरण,' 'अबलाविलास,' 'महाराष्ट्र-वंदन' हीं यांचीं पुरीं झालेलीं अमुद्रित काव्यें आहेत. यांपैकीं शेवटचें या भागांत प्रकाशित होण्याचा अकल्पित योग आला. 'लक्ष्मीविलास' या नांवाचें महाकाव्य पूर्ण करण्याचा यांचा विचार आहे. पांगारकरकृत संतचरित्रमालेंतील देवमामलेदार, रघुनाथभटजो, व शुभराय महाराज हीं तीन पुष्पें यांनीं गुंफिलीं आहेत. टिळक, आगाशे, विनायक, मोगरे, गर्दे, तांबे इत्यादि सुप्रसिद्ध आधुनिक कवींच्या काव्यावरील यांचे टीकालेख विविधज्ञानविस्तारांत छापून प्रसिद्ध झाले आहेत. पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयाच्या वार्षिक वासंतिक उत्सवा-

निमित्त यांनीं रामायण, महाभारत, भगवद्गीता इत्यादि विषयांवर उपदेशपर लेख लिहिले आहेत. नासिक येथें 'नासिकवैभव' नांवाचें वर्तमानपत्र निघत असे; त्याचे हे मुख्य संपादक होते. पुण्याच्या शारदाप्रसादन-मंडळाचे हे चिटणवीस आहेत. मंडळाच्या मालेचा पहिला भाग यांनींच संपादिला आहे. यांनीं गद्यपद्यात्मक संस्कृत व मराठी उताऱ्यांचीं पुस्तकें शाळा–खात्याकरितां तयार केलीं असून तीं अनेक शाळांतून चालत आहेत. श्री-शारदापीठाच्या शंकराचार्यांनीं यांस यांच्या आयुर्वेद-नैपुण्याबद्दल 'वैद्यपंचानन' ही बहुमानाची पदवी इ. स. १९०८ सालीं दिली. हे हल्लीं पुण्याचे कायमचे रहिवासी असून न्यू पूना कॉलेजांत मराठीचे प्रोफेसर आहेत. यांची स्फुट मराठी कविता काव्यरत्नावली, केसरी, विविधज्ञानविस्तार इत्यादि ठिकाणीं प्रसिद्ध झाली आहे. यांचीं लघु संस्कृत काव्येंही आहेत.

## ७. श्रीयुत केशव विश्वास फणसे.

जन्म—इ० स० १८७१.

या मध्यप्रांतीय सुप्रसिद्ध मराठी कवींविषयीं या मालेच्या तिसऱ्या भागांत माहिती आली आहे. हे कवि सिहोरा-जबलपूर येथें राहतात. यांची 'वैधव्यदैन्य' नांवाची एक सुंदर कविता मागें विविधज्ञानविस्तारांत आली आहे. तिच्यावरून कवींची समाजसुधारणेची प्रवृत्ति दिसून येते. काव्यप्रणयनांत देखील या कवींचा सुधारकी बाणा दिसून येतो. 'निर्यमक कवितेचा अर्ज' ही यांची प्रस्तुत भागांत छापलेली कविता पहा, म्हणजे आमच्या या विधानाची यथार्थता पटेल. असें आहे तरी प्रस्तुत कवि यम-

काचेही शोकी आहेत. उत्तान श्लेषावरही यांची थोडी भक्ति आहे. यांची कांहीं कविता अद्यापि अमुद्रित आहे. यांची वाणी गोड व रसाळ आहे.

## ८. श्रीयुत लक्ष्मण रामचंद्र पांगारकर. बी ए.

जन्म—इ. स. १८७२.

या मालेच्या तिसऱ्या भागांत यांची थोडी माहिती आली आहे. यांचा काव्येतिहाससंशोधन हा आवडता विषय असून मराठी संतकवींवर यांचें असीम प्रेम आहे. हे संतचरित्रकार म्हणून विशेष प्रसिद्ध आहेत. श्रीज्ञानेश्वरादि संतांचीं यांनीं सुंदर चरित्रें लिहिलीं आहेत. शिवाय संतचरित्रमालेंतही यांनीं कित्येक सुप्रसिद्ध महाराष्ट्रिय साधूंचीं चरित्रपुष्पें गुंफलीं आहेत. यांच्या मोरोपंतचरित्रादि वाङ्मयकृति लोकांच्या आदरास पात्र झाल्या आहेत. यांचा भक्तिमार्गप्रदीप फारच लोकप्रिय झाला आहे. ‘ आनंदलहरी ’ व ‘ श्रीतुकारामचरितामृत ’ हे रा. पांगारकरांचे काव्यग्रंथ आहेत. हे ‘ मुमुक्षु ’ नांवाचें धार्मिक मासिक पुस्तक काढीत असतात. यांची वाणी सुसंस्कृत, प्रौढ, मधुर व क्वचित् वक्तृत्वसंपन्न असते. जुन्या मराठी काव्यवाङ्मयाचा तिच्यावर स्पष्ट ठसा उमटलेला आहे. हे भक्तिप्रवण ग्रंथकार पुण्यांत राहतात व काव्यसंशोधनाकरितां व धार्मिक प्रवचनाकरितां पुण्याबाहेर संचार करीत असतात. वाङ्मयप्रणयन हाच यांचा व्यवसाय आहे.

## ९. सौ. सरस्वतीबाई भिडे.

जन्म—इ. स. १८७२.

सुप्रसिद्ध मराठी कवि व ग्रंथकार रा. रा. विद्याधर वामन भिडे, बी. ए., यांच्या या पत्नी होत. यांनीं मराठी कवि चांगले वाचले आहेत. यांना गुजराथी व बंगाली चांगलें समजतें. ‘ सरोजिनी ’ नांवाची एक कादंबरी यांनीं बंगालीवरून मराठींत उतरली आहे. यांना इंग्रेजीचाही संस्कार झाला आहे. इसापनीतींतल्या पुष्कळ गोष्टी यांनीं मराठींत आर्यावृत्तांत रचिल्या त्यांपैकीं सत्तावीस या पुस्तकांत छापल्या आहेत. यांची रचना शुद्ध, सरळ व सुगम आहे. सर्वच गोष्टी फार बोधप्रद आहेत. यांनीं या मालेचा पांचवा भाग संपादिला आहे.

## १०. श्रीयुत मनोहर कृष्ण गोळवलकर. एल्. एल्. बी.

जन्म—इ. स. १८७९

यांच्या विषयीं मालेच्या तिसऱ्या भागांत माहिती आली आहे. हे मध्यप्रांतांत जबलपूर येथें वकील आहेत. हे बहुश्रुत, विद्वान् व रसिक आहेत. हे सार्वजनिक कामांत पुढाकार घेणारे आहेत. यांची भाषा मधुर, सुबोध व सरस आहे.

## ११. श्रीयुत सीताराम वासुदेव पेंडसे. बी. ए.

जन्म—इ. स. १८८०

हे सुप्रसिद्ध कवि हल्लीं बडोदे राज्यांत नायबसुभे आहेत. हे ललितकलांचे रसिक भोक्ते आहेत. हे मार्मिक भाषाभिज्ञ असून गद्यपद्यात्मक रचनेंत निपुण आहेत. ‘ संस्कृतवाङ्मयाचा इतिहास’

हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. यांचीं शिशुसंमेलनादि प्रासंगिक काव्यें मधुर व रसिकमान्य आहेत. यांनीं आपल्या कवितांचें एक स्वतंत्र पुस्तक तयार केलें आहे. त्यावरून यांची रसिकता, काव्यशक्ति व भाषाप्रभुत्व हीं दिसून येतात. यांची भाषा अलंकारमंडित व रसमय आहे. यांच्या कवितेंत कोठें कोठें कल्पनाविलास व रम्य वर्णनें आढळून येतात.

## १२. श्रीयुत मुकुंद गणेशशास्त्री मिरजकर.

जन्म—इ. स. १८८२.

हे कोल्हापूरचे रहिवासी. हे जुन्या पद्धतीनें व्युत्पत्ति, अलंकार व व्याकरण यांत अधीत आहेत. हे पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांत मराठी व संस्कृत हे विषय शिकवितात. या दोन्ही भाषांत शास्त्रीबोवा सहज सुंदर कविता रचतात. यांची भाषा शुद्ध, सुसंस्कृत, प्रौढ व मधुर आहे. यांची कविता ‘ मुकुंदराय ’ या नांवानें केसरी, विविधज्ञानविस्तार, चित्रमयजगत् इत्यादि ठिकाणीं प्रसिद्ध झाली आहे. यांची कांहीं कविता अमुद्रित आहे.

## १३. सौ० मनोरमाबाई गोळवलकर.

जन्म—इ. स. १८८६.

जबलपूरचे सुप्रसिद्ध वकील रा. मनोहर कृष्ण गोळवलकर यांच्या या पत्नी व सुप्रसिद्ध नाटककार रा. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या या भगिनी होत. आपल्या बंधूंप्रमाणें याही विनोदी गद्यलेख लिहिण्यांत कुशल आहेत. यांची या पुस्तकांत घातलेली ‘पाळणा’ हीं कविता मधुर व सरस आहे.

## १४. श्रीयुत माधव गोविंद भिडे.

जन्म—इ. स. १८८८.

हे एकांतप्रिय, बहुश्रुत, लेखन—वाचन—व्यासंगी, कल्पक व प्रेमळ असे पुण्यपत्तनस्थ सुखवस्तू गृहस्थ आहेत. हे कांहीं काल 'मुमुक्षु'-पत्राचे संपादक होते. यांचे 'मननामोद' प्रसिद्ध आहेत. त्यांवरून यांची विचारसरणी दिसून येते. यांनीं स्फुट कविता पुष्कळ लिहिली आहे. तिच्यापैकीं कांहीं मुमुक्षु, काव्य-रत्नावली इत्यादि स्थळीं प्रसिद्ध झाली आहे. या पुस्तकांत छाप-लेल्या यांच्या कवितांवरून यांची तात्त्विक दृष्टि व कल्पनेचें अभिनवत्व यांचा प्रत्यय वाचकांस येईल. यांची भाषा सरळ, साधी व गोड आहे.

## १५. सौ० वेणुबाई साठये.

जन्म—इ. स. १८९१.

या कवयित्रींचा हा काव्यप्रदेशांतील प्रथम प्रवेश अभिनंद-नीय आहे. यांच्या हातून अधिक सरस व मधुर काव्यें निर्माण होवोत असें आह्मीं इच्छितों.

## १६. श्रीमती सारजाबाई बापट.

जन्म—इ. स. १८९१.

यांच्या विषयीं विशेष माहिती मालेच्या पांचव्या भागांत आली आहे. यांचीं सर्व काव्यें प्रेमळ असून सहज स्फूर्तीनें नि-र्माण झालीं आहेत. यांचा, या पुस्तकांत घेतलेला, सिंहगडचा पवाडा सुंदर आहे.

## १७. श्रीयुत शरच्चंद्र वामन रानडे बी. ए.

जन्म—इ. स. १८९४.

कै० वामन बाळकृष्ण रानडे, ज्ञानचक्षु-पत्राचे संपादक, यांचे हे चिरंजीव. यांची कविता कोमल व मधुर आहे. यांची अमुद्रित कविता बरीच आहे. यांची कांहीं कविता चित्रमयजगत् व मनोरंजन यांत आली आहे.

## १८. श्रीयुत 'काव्यशेखर.'

जन्म—इ. स. १८९८.

हे कवि इचलकरंजीचे. पूर्वकवींच्या परिशीलनानें हे चांगली कविता करूं लागले आहेत. यांचीं लहान लहान काव्यें अनेक मराठी मासिकांत 'काव्यशेखर' या नांवानें प्रसिद्ध झालीं आहेत. श्री० बाबासाहेब घोरपडे यांची या कवीवर कृपादृष्टि आहे, ही संतोषाची गोष्ट आहे. या कवीचा 'पुष्पपराग' नांवाचा काव्यग्रंथ प्रसिद्ध आहे. तशीच यांची 'प्रेमपुनर्जीवन' नांवाची कादंबरी खानापूरच्या लोकमित्रानें नुकतीच भेटीदाखल प्रकाशित केली आहे. या कवींची भाषा मृदु व मधुर आहे.

## १९. कु. इरावतीबाई करमरकर.

जन्म—इ. स. १९०७.

या फर्ग्युसन कॉलेजामध्यें इन्टर-आर्ट्स वर्गात शिकत आहेत. यांची प्रतिभा सुंदर आहे.

---

# अनुक्रमणिका.


कवि व काव्यें ... पृष्ठ.

**(१) कै० विष्णु सोमनाथ सरवटे**

१ श्रीशप्रभाव ... ... ७३
२ नागपंचमीचा देखावा ... ७६
३ संसारनाटक ... ... ७८
४ सखीविनोद ... ... ८०

**(२) कै० एकनाथ अण्णाजी जोशी.**

१ तरळयाची लढाई ... ८२

**(३) कै० गणेश कृष्ण गर्दे.**

१ 'अद्भुत' ... ... १२६

**(४) शिवराम महादेव परांजपे.**

१ जलदागम ... ... १०५

**(५) महादेव हरि मोडक.**

१ 'दुरोनी वंदन त्या वैभवा' ... ४८
२ सुभाषितमाला ... ... ४९

**(६) संपादक.**

१ महाराष्ट्रवंदन ... ... १२९

**(७) केशव विश्वास फणसे.**

१ निर्यमक कवितेचा अर्ज ... १०८
२ शेतावरील सहल ... १११
३ कविताकामिनी ... ... ११३

**(८) लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.**

१ श्रीशारदास्तोत्र ... ... १
२ द्वैतावांचून प्रेमभोग नाहीं ... ८
३ उद्यमगीत ... ... १३
४ आपत्तीचें गाणें ... ... १४
५ आनंदाचा क्षण ... ... १६
६ लीला आणि मोरया ... १६

कवि व काव्यें ... पृष्ठ.

**(९) सौ. सरस्वतीबाई भिडे.**

१ सिंह आणि उंदीर ... ८६
२ ब्रह्मदेव आणि उंट ... ८८
३ कावळा आणि कोल्हा ... ८८
४ प्रतिबिंब पाण्यांत पाहणारें हरिण ८९
५ दोन कुतऱ्या ... ... ९०
६ बकरीनें पाळिलेलें मेंढरूं ... ९१
७ लांडगा आणि धनगर ... ९२
८ दोन भांडीं ... ... ९३
९ मुंगी आणि खबूतर ... ९३
१० राजा मागणारे बेडूक ... ९४
११ पोट आणि अवयव ... ९५
१२ मोरांचीं पिसें लावणारा डोंबकावळा ९६
१३ सिंह आणि दुसरे पशु ... ९६
१४ कोल्ही आणि सिंहीण ... ९७
१५ खेकडी आणि तिचें पोर ... ९८
१६ लोणारी आणि परीट ... ९८
१७ दुखणाईत गीध ... ९९
१८ तान्हेला कावळा ... १००
१९ टकल्या ... ... १००
२० नाचणारा उंट ... ... १०१
२१ डुकर आणि घोडा ... १०१
२२ किरडूं आणि कानस ... १०२
२३ कोल्हा आणि बोकड ... १०२
२४ कुत्रा आणि त्याचें प्रतिबिंब १०३
२५ कस्तूरीमृग ... ... १०४
२६ रानडुकर आणि गाढव ... १०४
२७ बेडूक आणि दोघे बैल ... १०५

| कवि व कविता | पृष्ठ. |
|---|---|
| **(१०) मनोहर कृष्ण गोळवलकर.** | |
| १ पौर्णिमेचा चंद्र ... ... | १२४ |
| **(११) सीताराम वासुदेव पेंडसे.** | |
| १ मातेचें पुत्रकौतुक ... | ५३ |
| २ प्रभातसमय ... ... | ५६ |
| ३ प्रेमाचा पाळणा ... ... | ५७ |
| ४ चंद्रावरील कलंक ... | ५८ |
| ५ निद्रा... ... ... | ५९ |
| ६ कल्पनेचा प्रदेश ... ... | ६१ |
| ७ आजवासरोवरावरील चंद्रोदय | ६५ |
| **(१२) मुकुंद गणेश मिरजकर.** | |
| १ कवितारति ... ... | ७० |
| **(१३) सौ. मनोरमाबाई गोळवलकर** | |
| १ पाळणा ... ... | ११८ |
| **(१४) माधव गोविंद भिडे.** | |
| १ चंडोलास ... ... | १९ |
| २ अभागी शिंपलीस ... | २० |
| ३ सूर्यस्तोत्र ... ... | २१ |
| ४ कातरी भ्याली ! ... | २३ |
| ५ रुचिवैचित्र्य ... ... | २३ |
| ६ योग झाला—पण पुढें ? ... | २५ |
| ७ कुटुंबकच्छप ... ... | २५ |
| ८ चंद्रज्योत ... ... | २६ |
| ९ जवाहिऱ्या आणि कवि ... | २७ |
| १० सृष्टिविजय ... ... | २८ |
| ११ तो मराठाच नोहे ! ... | २९ |
| १२ गोपाळ—बाळ ... ... | ३१ |
| १३ मेणबत्तीस ... ... | ३२ |
| **(१५) सौ० वेणुबाई साठये.** | |
| १ उषा ... ... ... | ११६ |
| **(१६) श्री० सारजाबाई बापट.** | |
| १ सिंहगडचा पोवाडा ... | १२० |
| **(१७) शरच्चंद्र वामन रानडे.** | |
| १ मनाचा सम्राट् ... ... | ३४ |
| २ खंडाळयाच्या घाटांत ... | ३६ |
| ३ मंगलाष्टक ... ... | ३९ |
| ४ ‘ लल्या लल्या ब ललथोला’ | ४० |
| **(१८) ‘ का-यशेखर ’** | |
| १ तें गीत ... ... | ४३ |
| २ आशा—निराशा ... | ४४ |
| ३ धुकें ... ... ... | ४६ |
| ४ काल आणि गुलाब ... | ४७ |
| **(१९) कु० इरावतीबाई करमरकर.** | |
| १ ‘निर्झरकांठीं कुठें तरी’ ... | १२७ |
| **(२०) कु. गंगूबाई काळे.*** | |
| १ फूल ... ... ... | १२८ |


---

* यांच्या विषयीं कांहीं माहिती मिळाली नाहीं म्हणून ती मागील प्रकरणांत घालतां आली नाहीं.

संपादक.

दा. २३४०

# अभिनवकाव्यमाला

## भाग चवथा

### लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

### १. श्रीशारदास्तोत्र.

( साध्या लावणीच्या चालीवर )

पाव शारदे ! मला दयाळे ! स्थिर राहे अंतरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ध्रु० ॥

त्वत्पदपंकजभृंग जाहलों गुंजारव करित मी ।
भ्रमलों भ्रमलों मायातमीं ।
सेवेसी सप्रेम लाविली तन धन वाचा मती ।
तुजविण नेणें अन्या गती ॥
संतमुखें गुणकीर्ति ऐकुनी दर्शनास घाबरा ।
झालों न दिसे मुळिचा झरा ॥
दर्शन नाहीं, प्रसादचिन्ह स्पष्ट दिसेना कुठें ।
तरि मग सेवकजनमन तुटे ॥

नानामतपाखंड बंड ऊदंड माजले जनीं ।
पडेना ज्ञानांजन लोचनीं ॥
त्रिखंड धुंडित मनें हिंडलों बहु ब्रह्मांडोदरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ पाव० ॥ १

२

सत्संगीं मज माये ! पडली तुझी ओळखी नवी ।
क्षणक्षण चित्तीं तुज आठवीं ॥
चार सहा अठराहि लागती माये ! तुझिया पदा ।
भोगिती अखंड सुखसंपदा ॥
संत कवीश्वर शास्त्रकारहि प्रेमें वाखाणिती ।
गाती उल्हासें गुणतती ॥
सर्वज्ञ श्रुति शास्त्रपुराणें काव्यनाटकें कथा ।
गर्जती वाग्ब्रह्मेति प्रथा ॥
रूप तुझें हरिहरां न वदवे बाळक मी तों किती ।
शब्दीं वर्णूं कैशा रिती ! ॥
स्फूर्तिरूप तूं स्फुरसि भगवति ! प्रेमें मम अंतरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ पाव० ॥ २

३

निर्गुण निश्चळ परब्रह्म त्या ' बहु व्हावें म्यां ' अशी ।
स्फुरली मति त्या नेणों कशी ! ॥
ब्रह्मीं आदिस्फूर्ति जाहली तेंचि तुझें निश्चिती ।
चंचळे ! रूप विमळ तें अती ॥

जाणिववायुस्वरूप ऐसी सूक्ष्मस्फूर्ती नवी ।
पुरुषप्रकृति वेदांति सत्कवी ॥
गणाधीशशारदादि नांवें दिधलीं तुजला भलीं ।
नांदसी एकचि तूं एकली ॥
शिवशक्तिहि तूं मूळपुरुष तूं एकत्व न मोडितां ।
दाविसी दोन्हीं रूपें स्वता ॥
तुजपासुनि ही सृष्टि चराचर झाली जगदीश्वरी ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ३

४

जगदीश्वर जगदात्मा ईश्वर जगज्योति तूं भली ।
प्रवाहरूपें सृष्टि चालली ॥
गुणक्षोभिणी गुणमाया तूं होसी त्रिगुणात्मिका ।
प्रसवसी हरिहरब्रह्मादिकां ॥
भूतभौतिक सृष्टी सारी उभविसि लीलालसें ।
अन्वयें रूप तुझें तें दिसे ॥
पिंडीं जीव ब्रह्मांडीं शिव दोन्हीं बाळें तुला ।
सारिखीं सकळलोकहेतुला ॥
त्रिगुण पंचभूतांचा कर्दम त्यामध्यें राहुनी ।
असती अलिप्त सर्वांहुनी ॥
देहेंद्रियमनबुद्धिप्राणाहंकृतिपर ईश्वरी ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ४

५

सघन सच्चिदानंद परात्मा भवसागरपारदा ।

प्रज्ञानब्रह्म शारदा ॥
यापरि आळवित श्रुति उगली ठेली, मी तों किती ?
करितों विनम्र शरणागती ॥
ज्ञानकला सर्वांतर्यामी जाणुनि भजती तुला ।
ज्ञानी भक्त सत्यसेतुला ॥
आकाशीं तो शब्द स्फुरला प्रसिद्ध ओंकार हा ।
तेथुनी शब्दसृष्ट ही महा ॥
परादि वाचा प्रेरिसि तेणें लोकव्यापार हा ।
चालतो अखंड कैसा पहा ॥
परादिवाचापर निःशब्दीं राहसि सर्वेश्वरी ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी

६

वाचातीत स्वयें राहुनी वाङ्मय करिसी उभें ।
नर हे तरती तेणें शुभे ॥
परब्रह्मपद पाववि तीतें विद्या म्हणती परा ।
भवार्णवीं जी तारक नरा ॥
क्षराक्षरांसीं अतीत निर्गुणपद देत्ये ती परा ।
ग्रंथ तो उगमीं घाली नरा ।
आत्मज्ञानपरा सद्विद्या निर्विकल्पसुखकरी ।
पावसि मोक्षातें लौकरी ॥
दृश्यप्रपंच सत्यार्थानें दाविती जी कां दुजी ।
अपरा विद्या ती तों खुजी ॥

पराऽपराविद्यांची मूलस्फूर्ती जगदीश्वरी ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ६

७

अपरा केवळ लौकिक विद्या परा अलौकिक खरी ।
वितरी अमृतसौख्य साजिरी ॥
अपरेमाजी सात्त्विक, राजस, तामस दिसती परी ।
पूर्वपूर्वा श्रेयस्करी ॥
परतत्त्वस्पर्शानें सात्त्विक नेत्ये उगमाकडे ।
विलंबें मोक्षनिधी सांपडे ॥
राजस अपरा केवळ लोकव्यवहारीं बावरे ।
प्रपंच सारा दृष्टी भरे ॥
शोकमोह तो न उडे तेणें जन्ममृत्यु ना टळे ।
तामसें अधोगर्ताला मिळे ॥
गढूळ खालीं, मध्यम वरती, स्वच्छ मूळनिर्झरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ७

८

ऋग्वेदादिश्रुतिस्मृतिहि त्या उपनिषदांसह भल्या ।
भाग्यें भव्यजनां लाभल्या ॥
षट्शास्त्रें तासि दर्शनेंहि तीं सूक्ष्मदर्शी सज्जन ।
करिती त्यांचें मतिरंजन ॥
श्रीरामायणभागवतादि ग्रंथ उपासनपरा ।
गमती श्रुतिसम भाविक नरा ॥

कथापुराणें काव्यनाटकें भारत इतिहासही ।
यांहीं मोहिलि अखिला मही ॥
कालिदासभवभूत्यादिक कवि बाण जगन्नाथ ते ।
रसिका बोधामृत तर्पिते ॥
वाङ्मय सारें जगदाधारे ! स्फुरतें तव अंतरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ८

९

श्रीज्ञानेश्वर नाथ तुकोबा समर्थ मुक्तेश्वर ।
मयूर वामन आणि श्रीधर ॥
कबीर तुळशी सूरदास हे भूखन नरसी मिरा ।
घालिती कळिकाळाला चिरा ॥
नाना भाषा ग्रंथहि नाना शास्त्रें नानापरी ।
स्रवते सतत शब्द वैखरी ॥
ओंकाराच्या भुवनीं चक्की मनपवनाची फिरे ।
तेणें स्वरूपभानहि नुरे ॥
शब्दसृष्टिची टांकसाळ ही झडते रात्रंदिनीं ।
नाणीं अमित पडति त्यांतुनी ॥
शब्दब्रह्मीं खेळुनि राहसि निःशब्दाच्या घरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ९

१०

प्रपंचपरमार्थी या जे जे विचार स्फुरती अये ।
निर्मळ ! सर्व तुझ्या आश्रयें ॥

प्राणिमात्र वश होय शारदे ! आम्हां तुझिया बळें ।
मनासि मन हें सहजीं मिळे ॥
भेदपिशाचें पळतीं, टळती विघ्नें, तम वोसरे ।
ज्योतिष्मति ! तूं ! असशी खरें ॥
प्रसाद होतां उचंबळे हें हृदय प्रेमामृतें ।
लोचनीं न धरत तें लोटतें ॥
प्रेमें प्रतिभाझरा पाझरे स्वात्मसुखीं मन निवे ।
निरंतर कृपा असों दे शिवे ! ॥
प्रेमप्रसाद भिक्षा घाली माता विश्वंभरी ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ १०

११

संतसद्गुरुप्रसाद होतां रूप तुझें आकळे ।
शारदे ! शोक मोह तैं गळे ॥
विश्वप्रपंच आटे दाटे ब्रह्म सघन केवळ ।
संपलें जड चंचळ निश्चळ ॥
रूपीं तुझिया अरूपरूपे ! थारा मिळतांक्षणीं ।
झाली जीवत्वा आटणी ॥
परब्रह्मभांडार खुलें हें झालें परमामृतीं ।
सुखाची लूट लागली हातीं ॥
देहस्मृति ही असो नसो तूं राहें मत्संगती ।
आहें अनन्यशरणागती ॥
माय शारदे ! पाय लक्ष्मणें दृढ धरिले अंतरीं ।
स्वरूपीं ठाव मला दे तरी ॥ ११

## २. द्वैतावांचून प्रेमभोग नाहीं.

( पुढील उतारा 'द्वैताद्वैत–संगति–स्तोत्र' या प्रकरणांतला आहे. पुढील अवतरणांत द्वैतावांचून जीवांना प्रेमसुखानंद भोगतां येत नाहीं, अद्वैतांत द्वैत व द्वैतांत अद्वैत हा देवाचा खेळ आहे हें, पतिपत्नींचें अन्योन्य प्रेम व उभयतांचें अपत्यावर प्रेम या दृष्टांताच्या रूपानें सांगितलें आहे. प्रेमाची महती, प्रेमाची देवावरही सत्ता चालते व प्रेमानंद द्वैतावांचून नाहीं इ० विषयही पुढें आहेत. )

### गीति.

सर्वात्मका ! नसे बा तुजमजमध्यें सख्या ! तिळहि भेद ।
जीव ब्रह्मचि न दुजा, ऐसें तो ज्ञानराशि कथि वेद. १
आह्मीं तुह्मीं तसें ना ? हेमीं नग, सागरीं तरंग जसे ।
सच्चित्सुखरूप तुह्मी नित्य निरंजन, अह्मी कसे न तसे ? २
अमर तुह्मी ? आह्मी ही ! सत्य तुह्मी ? मीहि ! लटिक? मीहि तसा ।
आह्मां तुह्मां न नांव न रूपहि, गुजगोष्ट कथिन मी हितसा. ३
साखर गोड खरी परि साखर होऊनि राहण्यापरिस ।
बा ! राहुनी निराळें खाण्यांतचि मौज शाहण्या ! परिस. ४
साखर तूं मुंगी मी, मुंगी तूं मीहि शर्करा होतों ।
द्वैतीं आनंद गड्या ! रसिकवरा प्राप्त बा ! खरा होतो. ५
देवा! अभेद असतां, जाणत असतांहि आवडे भेद ।
द्वैतावांचुनि सखया ! मौज कसि घडे, कसा सरे खेद ? ६
जळ न जळातें सेवी, पिउनि तृषार्तचि निवे मनें अंगें ।
वृक्ष न खाय फळातें, तद्रस सेवूनि पक्षिगण रंगे. ७
माता न सेवि अपुलें दूध, पिउनि तोष पावतें तोक ।
वृक्षच्छाया सुखदा, येति च्छायेसि तप्त जरि लोक. ८

वाडे सुंदर, बगिचा सुंदर, माड्या महाल आहेत ।
    स्त्रीपुरुषलेंकुरें नच भोगिति तरि तें अमंगल प्रेत ! ९

सोनें शुद्ध नवें, परि सरी ठुसी गोठ पाटल्या घडती ।
    जडती अंगा त्या जरि सुंदरिच्या तरिच सार्थकीं पडती. १०

द्वैतावांचुनि कैचा प्रेमसुखानंद भोगवे जीवा ! ।
    नसतां तो रसिकवर भ्रमर पुसे कोण सांग राजीवा. ११

राजा प्रजानुरंजन न करी तरि राजपण कसें तगतें ? ।
    उद्धरि शिष्य, गुरुत्वहि शिष्यगुणें त्यासि लाभतें मग तें. १२

होउनि अनन्य माये अनुसरते वत्स तनुमनप्राणें ।
    स्मरणेंहि फुटे पान्हा मायेसी ! प्रेम विमल जग जाणे ! १३

पतिवांचुनि सतिचे गुण यौवन सौंदर्य काय कामाचे ? ।
    सतिवांचुनि पतिलाही प्रेमें रिझवील कोण गा ! वाचे ? १४

आषुकमाषुकरूपें प्रेमसमुद्रासि येतसे भरती ।
    सरती संसृतिदुःखें, आनंदाची उदंड भरभर ती ! १५

द्वैतीं अद्वैत तसें अद्वैतीं द्वैत हा तुझा खेळ !
    दोन्हीं तुझींच रूपें, तुज जाणे तोचि पाहतो मेळ. १६

पतिपत्नीप्रेमांत द्वैत मुरे, एकता उरे खाशी ।
    तेंव्हां त्यांतचि निपजे आनंदग्रंथि बाळ सुखराशी. १७

प्रेमालिंगन देती, सुखठेवा चुंबिती, किती रमती, ।
    आनंदजळें वर्षति, होती बाळ स्वयें अधीरमती. १८

हास्य अकारण करितां पसरे दिव्यप्रभा मुखावरि ती ।
    तैं ध्यानभान हरपे, पितर ब्रह्माधिका सुखा वरिती. १९

मिळवुनि मुखासि मुख ते चुंबिति, लीलेसि त्याचिया भुलती,
खुलती हृदयकपाटें, भ्रमरभ्रमरी फुलावरी झुलती ! २०
रिझवी ' गुलाम चिमण्या ' त्यांतें तो सहजसुभग लीलांनीं ।
गानीं वानिति त्यातें, ऐकविती ऐकती सुगुण कानीं. २१
शिशुलीला तच्चित्ता देति रसें प्रेमरज्जुचे झोले ।
खोले लोल नयन तंव उभयांचें विमल हृदय आंदोले. २२
कधिं हांसेहि रडे कधिं पडे उडे बोल बोबडे बोले ।
ते ऐकुनि पितरांचे होती प्रेमामृतें नयन ओले. २३
तन्मुखदर्पणिं पाहाति दोघे गुण रूप एकमेकांचें ।
गालीं हांसुनि पटविति खूण, मनीं सौख्य तेधवां नाचे. २४
प्रेमाची ती त्रिपुटी नाचवुनि तिघांस होय एकपुटी ।
दिव्यप्रेमरसायन सेवी त्याच्या सुखा कधीं न तुटी. २५
देवा ! साजुक सुख हें कौसल्येला दिलें यशोदेला ।
करधृतकंकण मंजुस्मित करुनि तयांपुढें जधीं ठेला. २६
प्रेमें विश्व चळे हें, प्रेम तुझें रूप माधवा ! धन्य ।
प्रेमामृत जीवविना तरि जीवा जाळितें भवारण्य. २७
प्रेमामृत पिउनि पहा ! आनंदें जीव डोलती सकळ ।
सर्व चराचर भरलें प्रेमें, प्रेमेंचि जन्म हा सफळ. २८
पशुपक्षिकीटदानवमानवदेहादिकांसि आधार ।
एक प्रेमाचे जाणा, देवा ! प्रेमेंचि सार संसार. २९
सामर्थ्य असे प्रेमीं तैसें अन्यत्र आढळेना कीं ।
नाकीं देवाच्या ये लवतां बाळापुढेंहि नव नाकीं. ३०

शक्ति प्रेमाची गा ! अद्भुत तुजवरिहि करितसे सत्ता ।
भूषण मिरविसि लोकीं भृगुनें जी मारिली उरीं लत्ता ! ३१
शबरीस बरी म्हणसी, काय तिचें ज्ञान? कोण योगबळ ?
दाव्यानें बांधियलें गोपीनें, काय जाहला दुबळ ? ३२
विदुरस्त्री प्रेमपिशी, केळीं खाऊनि चारिल्या साली ।
हविषान्नाहुनि मानुनि अधिक रसें उतरल्या घशाखालीं. ३३
ताकपिरें गवळ्यांचीं पोरें तोंडांत तोंड घालोनी ।
पाजिति शक्रसुदुर्लभ तक्र पहा ! हस्त धरुनियां दोनी ! ३४
प्रेमाची सोसवते जबरी, उपचार बाह्य नावडती ।
पोहे फिके शिळे प्रिय जसि कां रामेश्वरासि कावड ती. ३५
गोडी प्रेमरसाची अमृतासीही कधीं न यायाची ।
ज्ञानी उद्धव रडुनी गोपींशीं गलितगर्व या याची. ३६
बा ! ज्ञान सत्य जप तप पूजन योगादि सर्व जें कांहीं ।
प्रेमाविणें फिकें तें ग्राह्य तुला कधिंच जाहलें नाहीं ! ३७
ऐसें दिव्य प्रेम प्रगटे द्वैताविना कुठें सांगा ! ।
द्वैतींच रंग माजे, अद्वैतीं मौज ही कुठें हां गा ! ३८
देवा ! अद्वय तुम्हीं असुनि प्रेमासि जागते नसतां ।
साकार न होतां तरि कैसें भक्तासि लाभले असतां ? ३९
भक्तोद्धार न करितां, त्यांच्या कार्यासि वाहिले नसतां ।
तरि मी निर्भय पुसतों, प्रांजळ बोला, तुम्हां कवण पुसता ?
लोकाचार दिसे तों, सोडुनि मी स्पष्ट भीड, सांगेन ।
लोक न त्यासि नवाजिति परकार्यीं जो झिजेचि आंगें न ४१

कैवल्याहुनि वाटे अधिक शतगुणें असे परोपकृती ।
परदुःखवारणीं जो सर्वस्वेंसीं झटेल तोचि कृती. ४२

माझें सर्वहि जावो परि पर वांचो म्हणोनि जो अर्पी ।
कायावाचामन, त्या परकार्यरतासि विश्वजन तर्पी. ४३

ऐकत दुःखार्तांची हाक उडी घालितोचि कळवळुनी ।
प्रिय लोकीं तो नच जो निश्चळ राहे उगा सकळ कळुनी ४४

देवा ! तुह्मीच जाणां प्रेममया ! हें परोपकारित्व ।
ताराया स्वजनांतें अवतरतां विवश विसरुनी स्वत्व. ४५

भक्तां घालुनि पाठीं, झुंजां दुष्टांसि एकले वीर ।
कळिकाळ तळीं दडपां, दावां दासासि देव ! परतीर. ४६

आपण खाय शिळे परि माय मुला दे दुधावरिल साय ।
तैसा स्वकाय कष्टीं टाकुनि दासासि सुखवि यदुराय. ४७

भक्तांसाठीं आला नांवारूपासि जाहला सोपा ।
हो पा ! गोपाळ प्रिय मज अतितर जेंवि गोपिकागोपा. ४८

घनसांवळा रमाधव रुळते वक्षःस्थळींहि वनमाळा ।
माथां मुकुट झळाळी भाळीं तो टिळक रेखिला पिंवळा. ४९

कंठीं कौस्तुभ झळके कटिं तळपे दिव्य पीत पाटोळा ।
पार्श्वीं वेल्हाळ उभी कमळा, कमळासि लाजवी डोळा. ५०

पुंडलिकास्तव सदया ! कटिं कर ठेवुनि विटेवरी नटलां
चट लाविली समस्तां, भव हटला, प्रेमळा जना पटलां. ५१

श्रीमूर्तिदर्शनानें डोळ्यांचें पारणें फिटे राया ।
होय महानंद, बुडे वृत्ति सुखीं, दूर ती पळे माया. ५२

त्वद्दर्शनें अघ गळे ताप टळे त्रिविधकर्म सर्व जळे ।
किंतु पळे मार्ग कळे; देव वळे तरिच होय हें सगळें. ५३
तप सत्य दान सम्यग्ज्ञान इहीं मार्ग गा ! तुझा निवळे ।
परि निःसंशय न कळे जंव करुणार्द्र प्रभु स्वयें न वळे. ५४
जय निर्गुण गुणसागर संतकमलवनवसंत भगवंत ।
जय शरणागतवत्सल निगमागमगीत इंदिराकांत. ५५
जय दानवजनभंजन ! सज्जनरंजन ! करूनि अंगलगा ।
पादास दास लक्ष्मण वंदी याचें करीं सुमंगल गा ! ५६

---

## ३. उद्यमगीत.

( अनुष्टुभ् )

उद्यमें चित्तवृत्ती या पुष्पापरि विकासती ।
मालिन्य जाउनी त्यांचें होती संशुद्ध पावन. १
उद्यमें दृढ होती हे नेत्रपादकरादिक ।
उद्यम श्रेष्ठ जीवांचें मुखमंडलमंडन. २
उद्यमें झळके तेज कोण पाहे मुखाकडे ।
आरोग्य भाग्य तेंही या उद्यमें प्राप्त होतसे. ३
उद्यमें बुद्धि फांके ही शास्त्रजाती कळांतरीं ।
उत्साह यश संपत्ती उद्यमें द्वारिं खेळती. ४
उद्यमेंचि चढे जीव परमात्मपदावरी ।
जे जे विख्यात या लोकीं ते सारे उद्यमींचि गा ! ५
दारिद्र्य कष्ट भोगोनी गांठावें सुमहत्पदा ।

क्लेशां कंटाळतां प्राणी करंटा वोळखा सदा
टाकीचे घांव सोसोनी शिळेचा देव होतसे । ६
पाहोनी क्लेशखडका रडका त्रासतो मनीं.
विघ्नांच्या उठतां फौजा लोटावें त्यावरी बळे । ७
दळें रिपुगुणांची जो लोळवी वीर तो खरा.
आळसें बुद्धिसामर्थ्य ज्याचें त्यासीहि नाकळे । ८
वडिलीं ठेविलें द्रव्य करंट्यासी न भोगवें.
उद्यमी विजयोत्साहें बुद्धिशस्त्रें पराजिती । ९
पराजिती विघ्नशतां शेखीं ऐश्वर्य पावती.
निरुत्साही स्त्रीहृदयी विघ्नें त्यासीच दापिती । १०
कांपती वीर पुरुषापुढें यायासि लाजती.
उद्यम श्रेष्ठ कार्यार्थीं यावज्जीव घडो मला । ११
श्रीपांडुरंगचरणीं मागे लक्ष्मण दान हें. १२

---

## ४. आपत्तीचें गाणें.

(शालिनी.)

आपत्तीनें लोक होती शहाणे, सोतें नेणे तें जिणें दैन्यवाणें ।
आपत्तीचा लागला नाहिं सोटा, ज्याच्या पाठीं तोचि मोठा करंटा. १
आपत्ती ही ऊडवी झांज सारी, तेणें डोळे देखती दृष्टि न्यारी ।
नेत्रीं प्रेमें लेवुनी अंजनासी, आपत्ती ही मायसी मोह नासी. २
आपत्तीच्या ज्ञान जन्में कुशीला, धीला धैर्य स्थैर्य तें तेचि शीला,
आपत्तीच्या आठवूनीहि लीला, वंदीं मी या सद्गुरू माउलीला ३

अज्ञानाची नीज निःशेष झाडी, संसाराचें स्वप्न मोडोनि पाडी ।
आत्मारामीं जागृती दे सदाही, नोहे नोहे निंद्य आपत्ति कांहीं ४
आपत्काळीं चित्त अक्षोभ्य ज्याचें, आघातीं ही धैर्य अन्यंग साचें ।
प्रज्ञास्फूर्ती शांतिदांती विवेक, ज्याच्या चित्तीं धन्य तो वीर एक ५
जो तो बोले शूर मी वीर धीर, धर्मज्ञाता मीच मोठा उदार ।
ऐसे लोकीं बोलती लक्षकोटी, आपत्ती हीं सद्‍गुणांची कसोटी ६
ढुंगाभोंतीं काजवा फेर घाली, जेथें तेथें चालते हीच चाली ।
पोटीं मी मी वोठिं त्या ज्ञानगोठी, आपत्ती ही सद्गुणांची कसोटी७
मोठे मोठे देशभक्त प्रसिद्ध, ज्ञाते दाते भक्त वा साधु सिद्ध ।
योगी रागी वीतरागी समस्त, आपत्तीनें तारिले पंत संत. ८
संपत्तीचा लाभ ज्या सर्वकाळ, जाणा त्यासी कोपला लोकपाळ ।
आपद्धीना सांग वैराग्य कोठें, लाभे? सांगा ज्याविना ज्ञान खोटें !९
आत्मज्ञानावांचुनी मोक्ष कैंचा, मोक्षागारीं अद्वयानंद साचा ।
आपत्तीची केवढी वानुं थोरी, तारी जी या घोर संसारपूरीं १०
भाग्यें मातें बोळला पद्मनाभ, आपत्तीचा जाहला संगलाभ ।
तेणें वागे प्रेम अन्योन्य भारी, याची गोडी काय जाणे भिकारी !११
जन्मोजन्मीं सोडुनि त्वां न जावें, म्यांही तूतें निश्चळत्वें भजावें ।
आपत्ती गे ! नेसि तूं सद्गतीला, बाई ! तूझ्या भूललों संगतीला१२
माते ! मातें देइं सत्संगतीला, ब्रह्मानंदीं तो विसांवा मतीला ।
चित्तीं प्रीती कृष्णसंकीर्तनाची, अन्या वांछा नाहिं गा लक्ष्मणाची.

---

## ५ आनंदाचा क्षण.

हरी हरी राम हरी हरी हरी, हरी हरी कृष्ण हरी हरी हरी ।
असा मुखीं ओघ अमोघ चालला, रघूत्तम प्रेमसमुद्र पावला. १
यन्नाममंत्रावलिछंद लागला, अत्यंत पुण्योदयकाल पातला ।
चित्ता रमाकांतपरीस गावला, रघूत्तम प्रेमसमुद्र पावला. २
चित्तीं सुखानंद अपार दाटला, गमे क्षणीं या भव सर्व आटला ।
नेत्रीं सुखोर्म्युत्थित पूर लोटला, रघूत्तम प्रेमसमुद्र भेटला. ३
नेत्रीं मुखीं पाद करादिकांतरीं, कर्णीं त्वचीं राहुनि चालवी हरी ।
हा चारही देह भरोनि राहिला, रघूत्तम प्रेमसमुद्र पाहिला. ४
सर्वेंद्रियीं श्रीहरि एकला वसे, असोनि सर्वत्र कुठेंहि ना दिसे ।
तरी पहा मद्‌हृदयीं प्रकाशला, रघूत्तम प्रेमसमुद्र पावला. ५
श्रीरामसौख्यांत विलीन जाहला, हा लक्ष्मण प्रेमसमुद्रिं नाहला ।
अनंत हा एकरसात्म जाहला, जिथें तिथें भासत एक चित्कला. ६

---

## ६. लीला आणि मोरया.

( तीन वर्षांच्या अंतरानें जन्मलेलीं हीं भावंडें आपापसांत बोलत आहेत. या बाळगीतांत पुढें येणारे मामा म्हणजे कवीच. कवींचीं मुलें त्यांना मामा या नावानेंच संबोधितात. )

**लीला**:—दादा ! दादा ये इकडे, मौज दावितें तुला गडे ॥
**मोरया**:—कां गे लिले ! बलावते ? हा मी आलों पहा इथे ॥
**लीला**:—पहा पहा रे ! ढगाकडे, चांदोबा हा ये इकडे ।
चाले माझ्या सवें कसा, जातें तिकडे पळे जसा ॥

**मोरया**:—जातो तो गे आइकडे, घेइल त्यासी आइ कडे ॥
खाऊं खाया हा जाई, मांडीवरि करि अंगाई ॥
**लीला**:—आई त्याची कुठें असे ? आम्हांला ती कां न दिसे ?॥
**मोरया**:—दिसतो ढग जो तो तिकडे, राहे ती त्यापलीकडे ।
पहा घरांतचि हा शिरला, मुळीं दिसेनासा झाला ॥
**लीला**:—चैन त्याची झालि अहा ! शिरला गेला घरीं पहा ।
आई येइल । पाप्पा घेइल ।
नाहूं घालिल । खाऊ देइल ।
निजविल त्यातें मांडिवरी, गाणीं गाइल गोड बरीं ! १

× × ×

**दादा**:—काय अरेच्या ! हे पडले, थेंब अंगावरि तरि कसले ।
**लीला**:—आहे ठाउक मज सारें, दादा वेडा मोठ्ठा रे ॥
**दादा!**—कां गे वेडा मज म्हणसी ? फू गडी मी करिन तुसी ॥
**लीला**:—दादा अमुचा शहाणा हा । आहें वेडी मीच पहा ॥
**दादा**:—थेंब पुन्हां हे आले गे । कपडे होतिल ओले गे ॥
सांग बघूं हे काय तरी । शाहणि मग तूं होसि खरी ॥
**लीला**:—सांगतें मीं मज सारें । ठाउक आहे बाप्पा रे ॥
मुतला चांदोबाच वरी । त्याची लागे धार खरी ! ॥
गुलाम हांसुनि बघे मला । दादा दिसतोना तुजला ॥
टोपी डोक्यावर बघ ती । लुकलुक डोळे करितातीं ॥
**दादा**:—प्रकाश अंधुक कसला तो । त्याच्या मागुनि गे! दिसतो।
**लीला**:—आई त्याची । प्रेमळ साची ।

मूर्ति दयेची । देवाजींची ।
घेउनि दीपक रे हातीं । प्रकाश त्याला दाखविती ॥१॥

× × +

**दादा**:—लीले अपुले मामा हे । आले आले तूं पाहें ॥
**लीला**:—मामा मामा ! सांग मला । विचारितें मी एक तुला ॥
चांदोबाची आइ कशी । कोठें राहे सांग मशी ॥
**मामा**:—सांगतों मी तुज बाळे । ढग हे दिसती जे काळे ॥
त्यामागें आकाश निळें । वर्तुल दिसतें बघ सगळें ॥
आकाशाच्या पलीकडे । ती राहे घर तिचें बडें ॥
आहे ती बहु कनवाळ । सकळांचा करि सांभाळ ॥
**मोरया**:—चांदोबाला भाउ किती । पुत्र तिला हो किति असती॥
**मामा**:—तेजस्वी सुत तीन हिला । विश्वप्रकाशक रवि पहिला ॥
दाहक पाचक अग्नि दुजा । शीतल कोमल चंद्र तिजा ॥
आहे ती बहुपुत्रवती । बाळ तिचे बा ! ही जगती ॥
सकळा जीवांची आई । आई ह्मणतों ती दाई ॥
आह्मि बाळे । लाडिवाळे । प्रतिपाळे ।
दास कृपाळे । ये आई ।
लक्ष्मण प्रेमें तुज गाई ॥

———

# माधव गोविंद भिडे.

## १. चंडोलास.

आलासी सखया ! फिरोनि विहगा ! गायास येथें अहा !
    माझें भाग्यचि थोर कीं प्रिय तुझा सद्वृक्ष पैलींच हा.
येवोनी घनवृंद कुंद बघ ही झाली हवा त्रासदा.
    आपत्तींतच भेटण्या सुखविण्या सन्मित्र येती सदा. १
चंडोला ! रडक्या मुलास जन ते देती अफू बा ! जशी
    तूतें अर्पितसे मदीय जननी मातें पहा हे तशी.
तारेमाजि अफूचिया मग उगीं तीं बाळकें राहतीं.
    गानीं मी तव गुंगुनी विसरुनी जातों मदीय स्थिति. २
विश्वांबा मम थोर ती म्हणुनियां दे शांतवाया सुधा
    पाहे भूल न आणण्या अफुपरी घाया विषें ती मुधा
व्हावी ते जननी तरी बघ अशी ज्ञानेंच जी तोषवी
    रामाईविण सांग तूंच विहगा ! चंडोल ती कोण वी ? ३
चंडोला ! तव वर्णही निरखितां खासा अफूसारिखा
    तूंही वृक्षिच वाढसी गमसि तूं त्या आफिमीचा सखा,
निद्रा आणितसे अफू शिशुजनीं ती योगनिद्रा खरी
    आणोनी कविची प्रवर्तविसि तूं गानीं पहा ! वैखरी. ४
तूं मातें प्रसवावया मधुमधु प्रोत्तुंग आलाफ ते
    चंडोला ! रसिका ! समर्थ करिसी गावोनि गीतीपते !

सृष्टीच्या प्रिय गायका ! रसवती ऐसी तुझी कोमला
 तत्रापि प्रियवल्गुवाग्वितरणीं देते मला ती बला. ५
म्यां गावें तुजमागुनी खगवरा ! त्वच्छिष्य होवोनियां
 इच्छापूर्ति करावयास्तव तुला मी प्रार्थितों गावया.
गा ! गा ! गा ! विहगा ! सुधामधुर तीं स्तोत्रें प्रभूचीं नवीं
 स्तोत्रास्त्रा-परि तें बळी नच दुजें काळास जें कांपवी ! ६

---

## २. अभागी शिंपलीस.

मोत्यांनीं निर्दयांनीं त्यक्त अशी शिंपली ।
मन्नयनीं ती जलांनीं अवनि पहा ! शिंपली ॥ ध्रु० ॥
धड बळकट पूर्वींपरि हे
चांदीपरि चमकत आहे
जवळ तिला कुणि नच बाहे
दुर्दैवी हो ! भली. १
उदराची करुनी झोळी
करि गोळा वेळोवेळीं
यामिनी भामिनी भोळी
ग्रहतारे ते बळी. २
किंवा ती तितिणि मोठी
मधु मधुर ऐकण्यां गोठीं
विहगास वसायासाठीं
भारानें वांकली ! ३

दिन येतां तारे गेले
खग वृक्षीं कोणी नुरले
स्मरण मात्र दुःखद उरले
स्थिति तैशी ज़ाहली. ४

मोत्यें तुज जरि नाठवती
तूं कृतघ्न नच आठव तीं
या कवितेसह तूं निगुती
राहि मुदा भूतलीं. ५

थोर जगिं झाले असती
किंवा यापुढतीं होती
आप्त जयां आव्हेरीती
स्तविति कवी त्यां वली. ६

---

## २. सूर्यस्तोत्र.

विश्वात्मा परमेश भास्कर जगत्त्राता जगच्चालक
माझाही सकलापरी करितसे सांभाळ जो पालक
बुद्धिप्रेरक नित्य नूतन मला दे स्फूर्ति जो गावया
त्या श्रीसूर्य-जगत्पतिप्रति नमीं प्रेमें दुवा द्यावया. १

प्राची दिग् मधुरा रवि-प्रियकरा आराधनीं तत्परा
चातुर्यें नटली भली अनुसरे छायेपरी भास्करा.
सोडीनाच जरा चले भरभरा श्रांता तरी ही पहा !
आली अस्तधराधराप्रति सती धन्या वदान्या अहा ! २

पाहेना परतोन तो प्रभु तरी ही सस्मिता कौतुकें
पाठोपाठच चालली, नच दुजी शालें हिशीं जी तुके
पातिव्रत्य असें बघोनि हृदयीं संतोषला हर्षला
थांबोनी क्षण सौम्यहस्तनिवहक्षेमांबु तो वर्षला ! ३

प्रेमालिंगन पावतां हृदयींची संरुद्ध शोकाद्रिजा
सारे बांधचि फोडुनी निघतसे फोंफावुनी ती निजा
तेंव्हां भीति करीतसे प्रगट दिक् प्राचीहि लज्जावती.
धीरोदात्त दिवाकरा द्रववितो झाली पहा ती सती. ४

प्रेमें देत निरोप गद्गद तिला निःशब्द सांकेतिक
तों ऐकोनि मनीं विषण्ण हृदयीं हो पूर्वदिग् भाविक
"येतों निश्चित मी उद्यां तुजकडे मोठ्या पहाटेस गे !"
कांहीं यापरि सांगुनी करि गमे त्या सुंदरीला उगे. ५

लोकाराधन-तत्परा प्रियकरा त्या सत्यसंधा न ती
घेई थांबवुनी म्हणोनि सदना जाई पुन्हां मागुती.
श्रद्धा पूर्ण असे रवीवरि तिची तत्रापिही लोहित
होई तन्मुख शोकसंकुल तिला सोसे न अत्याहित. ६

सारे सौर समान विव्हल मनीं पूर्वेपरी चिंतनीं
होती मग्न तदा तया न कळतां शोकाश्रु ये लोचनीं.
आम्हां लोकहितार्थ सोडिसि सख्या तूं निग्रहें भास्करा !
देवा ! दर्शन देउनी सुखाविणें तूतें समस्ता धरा. ७

जा ! जा ! जा ! पुढती तुझ्यास्तव किती पाश्चात्य खोळंबले
त्वां आवश्यचि पाहिजे सकळिकां सर्वत्र सांभाळलें.

स्वांतीं रूप तुझें धरून रजनी आम्ही प्रभो ! घालवूं
ठेवूं चिंतनदीप तेवत, न तो अल्पावधीं मालवूं. ८

---

## ४. कातरी भ्याली !

कातरी कौतुकें पाहतां घेतली
मित्रवृत्ती तिथें तत्क्षणीं रातली;
कातराया बघे जें करीं सांपडे
मोगऱ्याचें तयां फूल दृष्टी पडे. १
तेंच हातीं तदा घेउनी कातरी
कातरी कातरूं ती शकेना तरी !
कोमला प्रेमला निर्मला त्या फुला
स्पर्शतां कातरी होय ती निर्बला ! २
मार्दवामाजि जें तेज मोठें असे
तेंच ये प्रत्यया सत्त्वकालीं असें
एरव्हीं पाहतां फूल जें कोंवळें
कीटकाही निवारूं शके ना बळें !

---

## ५. रुचिवैचित्र्य.

बाळे ! तुला ढग रुचे वद कोणता तो
माझ्या अहो ! धवल फार मनास येतो.
धांवे किती भरभरा गगनांत सांगूं
त्याच्या गमे कितितरी नित पाठिं लागूं ! १

होऊन आपण वदे तंव तेथ बाळ
तें आवडे मजसि लालचि हो ! अभाळ
पत्रे नवीन जंव तांबट आणितो ते
जैशापरी दिसति त्यापरि मेघ होते. २

ते काजळी ढग मला रुचतात फार
बोले बनी मग करून मनीं विचार;
येती सरीवर सरी मज मौज वाटे
ती वीज नाचत तयामधि थयथयाटें. ३

आडून ऐकत उभा तंव तेथ माळी
तोडून देइ बनिला मग फूल–ढाळी;
काळ्या ढगांतिल मनोज्ञपणा जियेला
तो ओळखे उचित तोषण हो ! तियेला ४

आंबूस तोंड करिती तंव बाळ बाळी
पाहोन त्या कळवळे कवि अंतराळीं
पुष्पें किती उमलतीं नित अस्तमानीं
तीं उन्नतिप्रद जगाप्रत हो ! निदानीं ! ५

ते धावरे धवल मेघ न कां रुचावे ?
ते लाल काय म्हणुनी न मनास यावे ?
बाळे ! तुला धवल घे मृदु पुष्प जाई
हें घे गुलाब–फुल कोमल बाळ भाई ! ६

मुलांनो ! जिथें प्रेम वाटे करावें
तया वस्तुला नित्य चित्तीं धरावें;

जया जें रुचे तेंच त्या उद्धरील
बुडे तो दुज्याच्या भरीं जो भरील. ७

---

## ६. योग झाला—पण पुढें ?

बेण्याचे म्हणुनी जपून चिरसी जे हे बटाटे सख !
त्यांतें पाहुनिया विभक्ति गमते ऐश्वर्यदा मन्मना
अन्नग्रास असोन एक बसती तो खात नाना मुख
उद्योगप्रिय सृष्टिला न रुचते आलस्यसंस्थापना
कोठें आणित ती रसातलगता भूतें वरी पारखे
त्या भूमीप्रति साहसी मिळविण्या ते भोगिती यातना
तों अन्यत्र समुन्नतां बुडविते देशा पहाती सुखें
उत्कर्षास्तव सृष्टिच्या प्रतिदिनीं गे ! चालती कल्पना
योगायोग मिळोन साधत असे तो योग विश्वीं महा
बिंदूचे घन येथ एकवटुनी होती पुन्हा वेगळे
त्या धारा बनतात निर्झर पुन्हां फांटे तयांचे पहा
होती भिन्न परंतु तज्जल पुन्हां सिंधूमधें तें मिळे
व्हाया योग म्हणून भिन्न कुळिंचीं झालों तरी योग हा
आतांचा सुचवी भविष्य पुढचें मद्धैर्य तेणें गळे !

---

## ७. कुटुंबकच्छप.

येथें एक कुटुंबकच्छप पहा कैसें उगें बैसलें
निर्व्यापार समस्त होत करणें नाहीं कुणी पैसलें.

स्वामीशीर्ष निवांत पूर्व उगळी टेकोन भूमीवरी
तैसी स्वामिनिबुद्धि त्यासह हळूं संसारवार्ता करी. १
येथें पुत्र सुबाहु विक्रम अहा ! ते विस्मरोनी भले
वृद्धा त्या पितरा समुत्सुकपणें पोटाळण्या कोभले
हें ही पश्चिमपादसेवक तसे मागें धन्याच्या परी
प्रेमाश्वासित बैसतात निकटीं वैषम्य गेलें दुरी ! २
ज्यांना विश्वहि थोडकेंच दिवसां तें वाटलें इंद्रियां
ज्यांची शांत समस्त अस्तसमयीं होवोनियां विक्रिया
तीं आतां गृहभाग विस्तृत पहा कैशापरी मानिती
ऐक्यपृष्ठगुहेंत सर्व जुडुनी संतुष्ट या राहती. ३
हा संकोच बघोन येत हृदयीं अद्वैततत्त्वांकुर
केव्हां कोविं घडेल भारतिं अहो ! शास्त्रोक्त हा संकर
दैवें होइल सिद्ध अर्थ जरि हा नाहींच वांछा दुजी
या ऐक्याविण जे प्रवृत्ति मज ते निःशंक वाटे खुजी ! ४

---

## ८. चंद्रज्योत.

बत्ताशापरि आळुनी चिकटली ही चंद्रबिंबानना
येथें पाझरिला निजद्युति अतां अत्यल्प हो ! दाविना,
राहे गंधक आंतला पघळुनी बिंबास या वेष्टुनी
गेली प्रेक्षकमंडळी निरखुनी हीतें इथें सोडुनी ! १
शोभा भास्वरता समस्त सरली एका क्षणार्धामधीं
चंद्रज्योत ह्मणोन वर्तविल ही आतां न तो गे कुधी.

त्यानें पेटविली पुढें सरकला तो पेटवाया दुजीं,
पाहेना परतोनियां नर जगीं स्त्रजित मानी खुजी ! २
चाले संथ वरात, इंदु गगनीं पाहे वरोनी मजा
चंद्रज्योत नभा प्रभा वितरण्या ही लांबवी मूर्धजा.
दृष्टादृष्ट पुरी नसेल घडली गेली विझोनी अहा !
स्पर्धा ही अबला करूं बघतसे चंद्रासवें ही पहा ! ३
चंद्रज्योति ! विलास दावुनि जनां गेलीस तूं भामिनी !
रक्षा येथ बघोनियां तव अशी मी स्तब्ध झालों मनीं.
बैसोनी क्षणमात्र पाह्यरिवरी तूझ्या गुणा आठवीं
सोशीं गंधकदर्प, चित्र हृदयीं मी आपल्या सांठवीं. ४

---

## ९. जवाहिऱ्या आणि कवि.

जवाहिऱ्यानें रत्न अमोलिक, हृदयाजवळी बाळगिलें
सदा आवडे त्याची जवळिक, कधीं न कवणां दाखविलें. १
एके समयीं प्रसंग पडला, तें रत्नाचे हो ! विकण्याचा
क्षणामधें तो सवदा पटला समय पातला शिकण्याचा. २
तें हौसेनें एक नृपानें, विकत घेतलें ज्या वेळीं
न कळत केली जवाहिऱ्यानें, निजकर्माची तंव होळी. ३
जवाहिऱ्याच्या समक्ष राजा, आणवि रत्नें अमित दुजीं ।
जवाहिऱ्या पाहे ती वोजा, लुप्त होत तद्वृत्ति खुजी. ४
नव नवसाचें रत्न हरपलें, मिसळुनि गेलें रत्नांत ॥
जवाहिऱ्याचें नेत्र उघडलें, विवेकतीर्थीं हो स्नात. ५

जवाहिऱ्यापरि कवि मनिं उमजे, निजकवनीं ममता न धरी॥
जना अर्पितां कवनें लाजे, अमित असति त्यांचिया घरीं ६

---

## १०. सृष्टिविजय.

काव्यग्रंथ मदीय एक न दिसे गाहाळ झाल्यामुळें
शोधीं दाहि दिशांस मी तंव तया चित्तें अहा! व्याकुळें,
काडीचा बुडत्यास जेंवि गमतो आधार मोठा जसा
" आहे तो सदनांत " बंधु वदतां वाटे मलाही तसा. १
पेटी एक कशी तरीच पडली होतीहि ओटीवरी
औत्सुक्यें हुडकावयास सजलों तीच्या तदा भीतरीं,
तों व्याली दिसली तिच्यांत चिमणी ती आमुची मांजरी. २
होतीं खेळत शेपटीसह तिच्या तीचीं पिलें गोजिरीं.
क्रीडा पाहत तिष्ठलों बहु तयामाजीच मी रंगलों
होतीं खेळत पुस्तकावरिच त्या पिल्लें, सुखी जाहलों
होतों पाहत वाचण्यास्तव जिथें मी काव्यरत्नें भलीं
तेथें इष्ट मिळोन यापरि मला काव्यें दुजीं लाभलीं. ३
पिल्लांना हळु युक्तिनें रिझवुनी बाहेर मीं काढिलें
त्यांहीं चोंहिकडोन नाचत मला प्रेमें तदा वेढिलें.
डाव्या हातिं धरोन पुस्तक सुखें वाचीत मी बैसलों
खेळाया उजव्या करें मग पिलांसंगें पहा सज्जलों. ४
तीं पिल्लें मज खेळतां खिदळतां वाचों न देती क्षण
ग्रंथीं फेकिति दृष्टि तीं मग अहा! होवोन कोपेक्षण.

वाराया धजला न हात परि हो ! पिल्लां तयां गोजिऱ्या
क्रीडा त्या गमल्या जणों मम मनां कीं काव्यपंक्ती बऱ्या ५
पाहे पुस्तक तें गळोन पडलें तेथेंचि भूमीवरी
बैसे मांजरि हो ! तयावर भली येवोन ती साजिरी
नेणों आचरणें कशी मज " तुझ्या ग्रंथाहुनी चांगलीं
बाळें हीं मम साच वृत्ति तंव ही पाहे कुठें रंगली " ? ६
बोलों काय ? खरेंच सृष्टिसखिचीं काव्यें जशीं मोहिती
माझ्याही हृदयास तेवि चटका काव्यें न तीं लाविती.
वाचोनी करुनी विचार पढतां काव्येंहि जीं अर्थद
तीं टाकोन दुरी प्रसन्न भजणें हीं ईक्षणीं शर्मद. ७
पांथस्थापरि येथ राहत असों अल्पावधी आपण
शब्दांचें अतिघट्ट वस्तुवरि तें आहे अहो ! झांकण.
तेव्हां होइल तेतुली मिळविणें ओलीच भिक्षा भली
सृष्टी घालितसे उदार सकलां ती प्रेमला माउली ! ८

---

## ११. तो मराठाच नोहे !

बाहिर अंधःकारा बघुनी
भिउनि घरीं राहे !—
तो मराठाच नोहे ! १
रजनिनाश करणारा भास्कर
न कळे तों मी हें—
तो मराठाच नोहे ! २

परिस्थितीची फिरवाफिरवी
करूं न जो साहे—
तो मराठाच नोहे ! ३
भागूबाई–परी मुळुमुळू
जो जो रडताहे—
तो मराठाच नोहे ! ४
स्वजनदु:खशमनार्थ बावळा
परास जो बाहे—
तो मराठाच नोहे ! ५
निजरीतीचा त्याग करोनी
इतर रीति चाहे—
तो मराठाच नोहे ! ६
निजराष्ट्रातें आव्हेरुनियां
परास भजताहे—
तो मराठाच नोहे ! ७
कालचक्र–नेमिक्रम नेणे
उगा क्रंदताहे—
तो मराठाच नोहे ! ८
पारतंत्र्य दु:स्वप्न कायसें
नेणें क्षणभर हें—
तो मराठाच नोहे ! ९
धक्के चपेटे दु:ख संकटें
धैर्यें नच साहे—

तो मराठाच नोहे ! १०
माधव सकल जगाला भारी
त्रिकालांत राहे—
तो मराठाच आहे ! ११

---

## १२. गोपाळ–बाळ.

लडिवाळ बाळ हें गोपाळाचें मुग्ध
   चाललें चिमुकल्या चरवींत घेउनि दुग्ध;
रस्त्यांतुनि निर्भय मार्ग क्रमितें कैसें
   नक्षत्र एकलें नभोवितानीं तैसें.
कुणबाऊ परि मृदु लाल पदीं जो जोडा.
   चाललें घालुनी गरिबाचा तो घोडा.
त्यावरी घातला डाव्या पायीं तोडा
   कटिं धोतरावरी सुंदरसा करदोडा.
अंगांत मलमली सदरा सुंदर फार,
   शिरिं फेंटा हिरवागार वरी जरतार.
रंगीत लाल ती खिटी तयांच्या करिंची
   वाटते आणिली नंदबालका घरिंची.
पय यशोधवल त्यावरी धवलतर फेंस
   हिंदोळतसे अतिमंद लहरिच्या परिस.
अति मधुर लावणी शृंगाराची खाणी
   गुणगुणत चाललें अस्फुट मृदुतर वाणी.

निष्काम काम महिमान गात अनुरागें
त्या गुणें रम्य तें गीत रम्यतम लागे.
जाइच्या कळ्यांहुनि कोमल याच्या ओष्ठीं
त्या नवनीत प्रस्निग्ध प्रेमरस गोष्टी.
तव मुखीं बालका ! आलाप प्रेमाचे
तव करीं अमृत हें सुधावीचिसम नाचे.
जयदेवपदांसम ललित गती चरणाची
स्फटिकोज्ज्वल सुषमा तव अंतःकरणाची.
अशि रम्य वामनीमूर्ति नयनीं मम भरली
ती हृदयाकाश व्यापुनि माझ्या उरली.
मम दृष्ट तुला लागेल बाल गोपाळा
झरझरा चाल रे ! ललितपदा वेल्हाळा !
रे पुरे करीं तव नृत्यगतीचा चाळा
वाजतो मधुर तव पदिंचा घुंगुरवाळा.
चालला बाळ हा ! झाला दृष्टीआड
भोंवला मनांतिल विनोद माझ्या द्वाड !

---

## १३. मेणबत्तीस.

बाई ! दुरुनचि दावीं प्रकाश
दुरुनचि दावीं प्रकाश ॥ ध्रु० ॥
प्रकाशदानीं तम भेदोनी
तूं स्मरूं नेदिसि ग्रह ते दोनी

लखलखाट करिसी मम सदनीं
अज्ञानाचा नाश । कराया । अज्ञानाचा नाश १
स्वाधिष्ठानीं दृढ परि बैसें
पदिहुन चळणें अनुचित ऐसें
साक्षिणि ! जरि तनु लव तव पैसे
कोसळेल आकाश ! । नंदिनि ! । कोसळेल आकाश ! २
पुस्तक पोथ्या चोंहिकडे गे !
तेजोमय हे झळकति अंगें
तेजीं सहजीं तन्मति रंगे
मिळणीचा अवकाश ! । यांना । मिळणीचा अवकाश ! ३
उदासीन हे यांना नाहीं
जीवनवांछा अल्प हि पाहीं
मदर्थ रक्षीं तूं दुरि राहीं
घालुं नको यमपाश ! । यांना । घालुं नको यमपाश. ४
क्रीडा होइल तव क्षणभर जरि
पीडा होइल मज युगांतवरि
हे उपकारिणि ! धरिं तूं अंतरिं
फळ चाखवि अविनाश । लीले ! । फळ चाखवि अविनाश ५
श्वेतवर्ण तूं गे ! सत्त्वाढ्ये !
स्नेहमूर्ति तूं गे ! स्नेहाढ्ये !
गुणें गुणातीतास गुणाढ्ये !
दाउन करिंच विकाश । माये ! । दाउन करिंच विकाश. ६
अनन्यगतिकां लेखन वाचन

घडेल तुझिया साह्यें चिंतन
विनति तुज करी हा कर जोडुन
दे मज दुरून प्रकाश। दीपिके !। दे मज दुरून प्रकाश. ७
कृतज्ञ माधव करुणावाणीं
आळवितों तुज अजि निर्वाणीं.
स्वयें पेंगतो सांगे वाणी
लोळाया अवकाश। नाहीं। लोळाया अवकाश. ८

---

## शरच्चंद्र वामन रानडे.

### १. मनाचा सम्राट्.

असें मनाचा मी मम राजा, करिन तिथें मज माने तें,
‘साम्राज्याचि’ मम मानस माझें, ‘अधिराजा’ मी असें तिथें.
मम इच्छेपरि घडे न जगतीं, येथें मज ना लव सत्ता,
प्रतिसृष्टि परि मनीं निर्मितां मजसि न कोणी विचारिता;
असे माझि ही मानस सृष्टी, अहा, किती तरि रमणीया !
काय कल्पना जडजीवातें वैभवसौंदर्यांचि तया.

म्हणाति असे हा परमेश,
विश्वीं सकल सत्ताधीश,
तरि कां जगतीं या दोष ?

कां मम मानस—सृष्टिपरी ना तत्कृति झाली मनोरम ?
जगत कष्टमय, परि मम मानस सृष्टि कशी हो सुखधाम. १

असे माझि ही मानससृष्टी सकलहि भरली आनंदें,
हास्य–तोषची दिसे चहुंकडे, प्रेमगानिं सर्वत्रहि कोंदे.
येथ निराशा आपत्ती ना, जुलुम न येथें शक्तीचा,
दुर्दैवाचा खेळ न येथें, पक्षपात ना कवणाचा;
दुर्बलता ना येथ मनाची, कठोरता ना हृदयाची,
दुष्ट बंधनें नसती येथें, चिन्हें जनिं जीं दास्याचीं.
बाह्य सृष्टिच्या उपाधिनीं,
होतां खिन्न उदास मनीं,
जातों मी या मनभुवनीं,
शुद्ध पवित्र प्रेमा दिसतो जो या माझ्या सृष्टींत,
येइल कोठुनि तो या कपटी, वरपांगी जड जगतांत ? २

जेथें जेथें जड जगतीं या, दिसे मज कुठें मधुरपणा,
जेथें सद्गुण दिसतो कांहीं, तोषवि जो अंतःकरणा,
लवहि सुजनता, सत्य, मधुरता, प्रेम, मोद जो जगिं विलसे.
नेतों तो मी मम साम्राज्यीं, अंश जरी मज कुठें दिसे,
मानस-कृतिचें मम कौतुक परि, येथ न तो गुण हो लुप्त ,
द्विगुणित होउनि ये मम विश्वीं, रहात माझी जगतांत.
श्रेयस जें जें जगिं विमल,
तें तें मम विश्वीं सकल,
आनंदें भरलें अखिल,
जड जगतीं जें सौख्य लेशही, सकलहि तें मज मम राज्यीं,
दुःखनिधीचा परि जगतींच्या, नसें बिंदुही त्यामाजीं. ३

मानससाम्राज्यीं मम सकलहि प्रेमाचाची व्यवहार,
सकल वस्तु, जन असाति प्रेममय, सकल सहजची मोदकर.
ज्यांचे विषयीं मजसीं आदर, पूज्य बुद्धि वा समानता,
सहानुभूती उपजे चित्तीं ज्यांचे विषयीं वा ममता;
त्या सकलांसी नेतों मीं या साम्राज्यीं मम मानसिंचे,
प्रेम आपुलें नजर करोनी करितों स्वागत मी त्यांचें.
प्रेमाचि भेटी, प्रेम देणगी, प्रेमचि आदरही माझा,
प्रेमचि सकलां पारितोषक प्रेमें वितरीं मी 'राजा.'
प्रेमचि दें मी गुरूजनां,
प्रेमचि बंधू—भगिनींनां,
प्रेम प्रियजनां, मित्रगणा,
म्हणा भिकारी मजसि हवा तरि मी लवही ना त्या लाजें,
अमोल या मम प्रेमधनापरि त्रिभुवनिं सांगा काय दुजें?
नको नको मज जगत् कष्टमय जड जीवहि नलगे येथ,
सुखसंचारा मजसि करूं द्या, मदिय मनोमय राज्यांत,
'क्षुद्र एक मी या जगतींचा पामर मानव' याहून,
"मानससाम्राज्याचा सम्राट्" हाचि अधिक मजसी मान ! ५

---

## २. खंडाळ्याच्या घाटांत.

चाल०—येथेंची मी राहुं का ? वनजीवित हें सेवुं का ?

कृष्ण कृष्णतर जलधरपंक्ती
नभस्तलातें सकल व्यापिती

त्यांच्या वरती जाऊं का ? तेथिल शोभा पाहूं का ? १

उंच उंच उत्तुंग शैलवर
शिखरीं वाटे भेदी अंबर

त्यांच्या वरती जाउं कां ? तेथिल शोभा पाहुं कां ? २

रुचिर सुवर्णा या घनमाला
आलिंगिति या शैलवराला

त्या स्थानीं मी जाऊं कां ? त्यांच्या प्रणया पाहूं कां ? ३

कादंबिनि ही नगराजातें
विद्युन्माला कंठिं घालिते

त्या स्थानीं मी जाऊं कां ? त्यांच्या प्रणया पाहूं का ?

जलकणमिश्रित शीतल मारुत
मंदगतीनें स्वैरचि विहरत

अंगावरि तो घेऊं का ? उल्हासातें लाधूं का ? ५

हरित शैलतल, हरित भूमितल,
सृष्टि ल्यालि जणुं हरितचि दुकुल,

येथें थोडा थांबूं का ? ही वनशोभा पाहूं का ? ६

वर्षागम–नव–वृष्टी सिंचित
तरु–वेली, या दिसति प्रफुल्लित.

येथें थोडा थांबूं का ? ही वनशोभा पाहूं का ? ७

गिरीवरुनि जलप्रवाह पडती
तुषार त्यांचे उडति भोंवतीं

त्या खालीं मी बैसूं का ? त्या आनंदा सेवूं का ? ८

लहान मोठे झरे मिळोनी
वाहे मोठा जलौघ होउनि
बुद्‍बुद त्यावरि होऊं का ? स्वच्छंदानें पाहूं का ?
जलमय दिसते सकला जगती
त्यांत वरुनि जलधारा पडती
येथ उभा मी राहूं का ? अनुभवुं या सौख्यासि का ? १०
बांध घालुनी, पाणि तुंबवुनि
भाताची करि त्यांत रोंवणी
शेतकरी तो होऊं का ? कृषि--जीवित हें सेवूं का ! ११
धेनू वत्सें चरति भोंवतें
नव तृणांकुरें भक्षिति हरितें
येथ उभा मी राहूं का ? अनुभवुं वनवसतीस का ? १२
फेन--धवल जल--निर्झर निकटीं
धुकें दाट खालीं वरि भंवतीं
दरीमधें त्या बैसूं का ? सृष्टिश्री अवलोकूं का ! १३
तरुस्कंधिचे विविध पक्षिगण
हर्षें काढिति मंजुमधुर स्वन
त्यांपरि मीही गाऊं का ? अनुभवुं तोही हर्ष का ! १४
जल--धारांनीं त्रस्त पाक्षि किति
शांत निवासस्थाना शोधिति
उडूं तयांसह मीहि का ? अनुभवुं तीही मौज का ? १५
निसर्गश्रीच्या साम्राज्यीं या
सकलहि वस्तू परम रम्य या

दिसाति उण्या वा नच अक्षिका । पाहात यांना राहूं का ? १६
सकल रम्य, मधु, सकलहि मंजुल
सकल मोदकर, सकलहि सोज्ज्वल
हें पाहूं तें पाहूं का ? हें स्तवुं का तें वानूं का ? १७
अकृत्रिम किति हें वनजीवित
सहचर येथें निसर्गनिर्मित
येथेंची मी राहूं का ? जीवित हेंची सेवूं का ? १८

---

## ३. मंगलाष्टक.

राहे मूषक नित्यची अहि-भयें मोरासवें, जाणुनी
त्यातें वाहन आपुलें करितसे बुद्धीश चिंतामणी,
कीं हो सन्निध आपुली प्रणयिनी होऊं तुटी ना पळ,
तो **गौरीसुत** युक्तिमान तुमचें साधो सदा मंगल ? १
मांदारा धरि पृष्ठिं सिंधु--मथनीं तो कूर्मरूपें हरी
तोषे ना परि कौस्तुभें म्हणुनियां लाधे रमा सुंदरी.
सांनिध्यांत तिचे जयासि प्रिय हो वासार्थ सिंधूतल,
तो **लक्ष्मीपति** शेषशायि तुमचें साधो सदा मंगल ! २
पत्नीशीं शिव सारिपाट प्रणयें खेळे पणा लावुनी,
हारी येत पुनःपुन्हां म्हणुनिया कोपोनि जाई वनीं.
मोहूनी परि त्यासि गौरि चतुरा आणीतसे प्रेमल,
भोळा भिल्लिण--प्रेमि **शंभु** तुमचें साधो सदा मंगल ! ३
आणी स्वर्णमृगाजिना पुरविण्या छंदासि पत्नीचिये,
ना तीं आश्रमिं पाहतांचि करितो आक्रोश 'सीते !' 'सये';

तद्वृत्तासि पुसे मृगां, तरु--शिला आलिंगितो विव्हल,
तो सीतापति **रामचंद्र** तुमचें साधो सदा मंगल ! ४
नाथा पाहुनि हांसतां प्रणयिनी तारा--गणीं वेष्टिला,
क्रीडा त्यांजसवें अनेक करितां तो चंद्रमा रंगला;
देवो चंद्रबला तुम्हांसि **शशि** तो, **तारा** हि ताराबल,
तज्ज्योत्स्नायुत **यामिनी**हि तुमचें साधो सदा मंगल ! ५
हस्तीं हस्त धरा वधूवर तुम्ही, माळा गळां अर्पुनी
जोडा मैत्रि अखंड, 'सप्तपदि' त्या पुण्यस्थलीं चालुनी.
अग्नीसाक्ष परस्परांसि वचनें द्या प्रीतिचीं निर्मल,
तो स्नेहप्रिय **अग्निदेव** तुमचें साधो सदा मंगल ! ६
स्फूर्तीनें सहजीं स्वयें अवतरे शून्यामधें एकलें,
माया लाधुनियां प्रिया सहचरी तें ब्रह्म आनंदलें.
ज्या या दंपतिपासुनीच अवघें हें दिङ्नभोमंडल
तें चित्कारण **आद्ययुग्म** तुमचें साधो सदा मंगल ! ७
ज्यानें सर्व चराचरीं अनुपम स्नेहामृता ओतिलें,
ज्याचे कोमल पाशिं पुष्पशारिंही सर्वां जनां मोहिलें;
त्रैलोक्यीं फडके सदैव विजयी ज्याची ध्वजा उज्ज्वल,
तो सर्वंजय **कामराज** तुमचें साधो सदा मंगल ! ८

---

### ४. "लल्या लल्या बा लल थोला–" ।

( **चाल**—आनंदी आनंद गडे० )

लल्या लल्या बा लल थोला । वास वास बा भोकाला ॥ ध्रु० ॥

लल तुज आजी खेळवितां । मांडीवरती डोलवितां ॥
हिंडवितां घेउनी कडे । एकसारखा सतत रडे ॥
निजवितांहि वा थोपटुनी । रडे रडे बा ओरडुनी ॥
रडतां रडतां ।
दमुनी जातां ।
झोंप लागतां ।
झोंपेमाधिंही मुसमुसुनी । देइ हुंदके क्षणोक्षणीं ॥ १
रडे रडे बा बहु जोरें । डोक्यावरि घे घर सारें ॥
कां रडसी ना कळो कुणा । समजो जें ज्या येइ मना ॥
कोणि चोळुं दे तव पोट । लावुं कपाळा कुणि सुंठ ॥
दृष्ट काढिती ।
मान चोळिती ।
देति वा घुटी ।
देवो औषध कुणि कांहीं । रडतां थांबे ना लवही ॥ २
अजी म्हणे "पाय जों मोडला" । तुझा आपुला चालुं गळा ॥
"अडगूले वा मडगूलें" । तुझें चालुं रडणें अपुलें ॥
"नाच बाइ नाचा" कोणि म्हणे । तरिही चालों दे रडणें॥
"येथें काऊ"! ।
"तो बघ बाऊ !"
"देऊं खाऊ ?"
कोणि म्हणो तुज कांहींही । रडणें तव चालू देई ॥ ३
पाळण्यांत देउनि झोंका । ओंऽया म्हणतां तुज अक्का ॥

एकसारखें तव रडणें । " अं अं अं " चालू गाणें ॥
चुटक्या वाजवितां पुढतां । लव ना थांबसि तूं रडतां ॥
वाजवि भांडें ।
जरी तुजपुढें ।
तरिहि तव रडें ।
" कुर्रर " करीतां कानाशीं । रड अधिकचि ओक्साबोक्शी ॥४
प्रेमें अंकीं निजवून । माता देतां स्तनपान ॥
अथवा घेउनियां हातीं । खेळवितां झेलुनि वरती ॥
हृदयाशीं वा कवळूनी । घेतां पापे हंसवूनी ॥
हंसत खेळतां ।
मुठी चोखितां ।
गोष्टी करितां ।
लागसि बाळा भुतासम । रडावयासी एकदम ॥ ५
रडा रडा आं रडुबाळा । शहाणा अमुचा तो छकुला ॥
आतां कां ना तरि रडसी । असा मकजडे कां बघसी? ॥
कां वांसुनि बोळकें अतां । उगिच हांससी तरी वृथा ॥
रड ना थोडा ।
अतां लबाडा ।
गर्जी वाडा ।
लुच्चा, अजुनी हंससी का ? । घेऊं पापा--एक मुका ? ॥६

ग्रंथ संग्रहालय नं. ता.

# काव्यशेखर

## १. तें [illegible]!

( चाल:—फुलर्लि फुलें—विनायक. )

सकाळची । वेळ मनोहर सौख्याची.
बागेंत । सहजचि गेलों मौजेंत !
वाऱ्यानें । तरू डोलती मोदानें.
दरवळुन । गेलें सगळें उद्यान !
किती तरी । सुमनें फुललीं, मौज खरी !
मोलाचीं । मोत्यें नव ! दंवबिंदूचीं—
चोंहिंकडे । पडलेलीं मज दिसलिं गडे !
डौलांत । तिथेंच एका कोन्यांत !
फुललेली । कळी गुलाबी मज दिसली !
भूल पडे । धांवत गेलों मी तिकडे.
सुंदरशा । नवी पालवी आलेल्या—
तरुवरती । डोलत होती कलिका ती !
वैभव तें । पाहुनि रमलें मन तेथें !

× × ×

जगतींचीं । नको कांचणी दुःखाचीं !
स्वार्थानें । सडुनी गेलीं जिथें मनें.
रात्रंदिन । द्वेष घालतो थैमान !
फूत्कार । गर्व सोडितो अनिवार !!

हाय ! किती । विधवा ढळढळ रडताती !
गरिबास । मिळे न पोटापाण्यास.
नको ! नको !! अशा समाजीं वास नको.
त्यापरिस । बरा गमे हा वनवास !
स्थानीं या । सुम एकादें होउनियां
डोलावें । वाऱ्यासंगें खेळावें.
हांसावें । जगताला बहु सुखवावें !
एक दिनीं । जावें ईशपदीं मिळुनी !
गड्या फुला! मिळेल सुख हें काय मला ?
खरोखर । बहार होइल कीती बरं ?
तों आला । भ्रमर गात मधुगानाला.
मधुगीतीं । रिझवुं लागला कलिका ती !
तें गीत । बुडवी ब्रह्मानंदांत !

---

## २. आशा—निराशा.

( चाल–सुवर्णकेतकी परि जो० )

शुद्ध बिजेचा चंद्र चिमुकला नीलाऽऽकाशीं मोहरला,
सरोवरांतलि मृदुकुमुदांचा वृंद कपोलीं मधु हंसला ! १
दोन यामिनी सुधास्यंदिनी इंदुदर्शना मुकलेल्या
वेड्या नलिनी कोर नभींची बघुनी हृदयीं किति रिझल्या! २
“ रोज वाढुनि कलेकलेनें पूर्ण अम्हां शशि भेटेल. ”
आशा मनिं ही बळकट त्या मग कां नच सांगा हंसतील ! ३

* * *

प्रदोषकाळीं प्रसन्नतेचें राज्य पसरलें चोहिंकडे
दक्षिणवायु सुटे, दृष्टीला कोणि न कष्टीं जीव पडे ! ४
अर्ध्या मिटल्या अर्ध्या फुलल्या असल्या कलिका डौलानें
डुलतातीं किति मंद समीरें, मोदें भरती खिन्नमनें ! ५
गुलाब हंसतो स्वैर डोलतो लीलें रमवी सकलांला,
निशिगंधाचा वास मनोहर उपवनिं सगळा दरवळला ! ६
नूतन पल्लव कुसुमाभरणीं लतिका झाल्या नम्र किती !
वसंत-राज्यीं कशी पडावी सौंदर्याला वद कमती ? ७
निसर्ग हंसतो तारा हंसती सगळें उपवनही हंसतें,
हाय ! परी ही हंसऱ्यावेळीं मुग्धाबाला कां रडते ! ८
प्रासादाच्या सौधावरती बसली आहे खिन्नमनें,
भिरभिर वारें सुखवि न, अवघें जग हें भासे तिला सुनें ! ९
शून्य दृष्टिनें चंद्रा बघते, चळते, हृदयीं बहु कढते,
दु:खें सोडी दिर्घ उसासे डोळे पदरानें पुसते !
जरा जाउनी सौधाजवळीं निरखुनि बघतां बालेला
ठिकऱ्या उडल्या हृदयाच्या, शिरिं प्रहार वज्राचा झाला ! ११
कुंकुमविरहित भाल पांढरें माझ्या नयनांला दिसलें,
गलित जाहलों, नयनांतुनि बहु घळघळ अश्रू ओघळले १२
कराल कालें चंद्र तियेचा अस्ता नेला अति त्वरें
मुखनलिनी मग कशी हंसावी सांग समाजा ! तिची बरें ! १३
" रोज वाढुनी कलेकलेनें पूर्ण अम्हां शशि भेटेल "
आशा बळकट नलिनीच्या मनिं कां नच मग त्या हंसतील ! १४
आशा-तंतू या देवीचे जावे ना सगळे तुटुनी !

बोल समाजा ! दया येउं दे थोडीतरि अंतःकरणीं ! १५
चंद्र बुडाला वसुधेवरती पडदा काळोखी पडला ! ! !
जिकडे तिकडे गाढ निराशा मूर्च्छा आली बालेला ! ! १६
बघुनि समाजा ! करुण चित्र हें विचार कर थोडका मनीं
भूतदयेनें त्वद्हृद्दयाचें जावें होउनियां पाणी ! १७

---

## ३ धुकें.

[ चाल—अंबरगत परि पयोधरातें० ]

पहा थोडकी मजा सुंदरी ! ऊठ ! ऊठ ! ! सत्वरीं
धुकें हें पडलेलें महिवरी ॥ ध्रु० ॥
चूर्ण रुप्याचें पडतें जणुं कीं अविरत गगनांतुनी
व्यापिली त्यानें ही मेदिनी !
जगद्रंगभू दिसो न कोण्या क्षण प्रेक्षकदृष्टिला
धवल हा पडदा जणुं सोडिला !
जिला आणण्या श्रमी भगीरथ झाला बहु राजसे
सहज जणुं श्रीगंगा येतसे !
कीं स्वर्गींच्या सारितापात्रामाधिं फ़ेस न मावुनी
येतसे खालीं हा उसळुनी !
दशदिशा धुक्यानें व्यापुनि गेल्या गडे- ग
या खिडकीमधुनी अवलोकीं चहुंकडे
निकटवर्ति तरु मंदिराशिखरें लोपुनि गेलीं पुरीं
दूरचें दिसणें राहो दुरी ॥ १ ॥

असेंच आयुः प्रभातकाळीं मोह पडुनि मानवा
भुले या असार केवळ भवा !
विमूढ मानवनयनांवरती मोहपटल येतसे
वस्तुचें सत्य स्वरूप न दिसे !
सरळ वीथिका सोडुनि जातो कंटकमार्गावरी
भटकतो सदैव वेड्यापरी !
रत्न म्हणोनी मुदें धरावे करिं गारेचे खडे
नव्हे का वेडेपण हें गडे ?
परि हृदीं दीप्तिमान् ज्ञानसूर्य उगवतां- ग
हा मोहहि जाइल जाण सत्य तत्त्वतां
अतांच जैसा भगवान् भास्कर येतां क्षितिजावरी
धुकें हे विरेल वरच्यावरी ! २

---

## ४. काल आणि गुलाब.

( शा. वि. )

उद्यानीं सगळ्या गुलाबसुमनें उत्फुल्ल झालीं तुझ्या,
कांहीं श्वेतहि लाल त्यांत असती, चित्तास वाटे मजा !
आहेत प्रिय तीं कितीतरि मला हें ज्ञात आहे तुला,
मी मेल्यावरती नकोत म्हणुनी आतांच द्यावीं मला १
आहे जीवित लोल हे भरंवसा त्याचा नसे कीं लव.
पुष्पें जातिल अल्पकाल सरतां कोमेजुनी पेलव !
मी हा येथ उभा, फुलें उपवनीं आहेत आनंदद
घ्यावा लाभ गड्या ! अतांच मग हें नाहीं बरें का ? वद २

जें माझ्यावरती तुझें बहु असे तें प्रेम दावावया
आतांचाच सुरेख काल दिसतो, पुष्पें मला द्यावया.
आहे काय उद्यां मला मरुनियां गेल्यावरीं फायदा ?
व्हावीं तीं मज याक्षणींच पुढचा आतां नको वायदा ! ३

---

## महादेव हरि मोडक.

### १. " दुरोनी वंदन त्या वैभवा ! "

( कोणी आंग्ल सरदार वैभव-तृष्णेची निंदा करून पुढील उद्गार काढीत आहे. )

[ चाल—भला जन्म हा तुला लाभला० ]

राम राम आजि शेवटचा हा करितों नृपवैभवा,
न सोसे मजला त्याची हवा. १
मानवजीवित क्षणभंगुर हें, रंग तेरडा जसा,
धरावा तेथ कसा भरंवसा ? २
आशांकुर जे कोमल सुंदर नयनां दिसती अजी,
होति ते पुष्पित अल्पावधी. ३
पाहुनि त्यांतें दंग होउनी डुलतों सौख्यामधीं,
मानितों ' धन्य धन्य ' मी जगीं. ४
आकस्मिक तों दुर्दैवाचें वारें सोसाउनी
मत्सम पाडी त्या उमलुनी. ५

घेउनि चुकलों पूर्णपणें मी या देहीं अनुभवा,
दुरोनी वंदन त्या वैभवा ! ६

---

## २. सुभाषितमाला.

( या मालेंतलि पुष्पें भिन्न भिन्न जातींचीं, वर्णांचीं व गंधांचीं आहेत. त्यांचा रसिकांनीं यथारुचि आस्वाद घ्यावा. )

श्लोक.

सदाचार चातुर्य हीं दोन रत्नें, जगीं धन्य ते मेळवीती प्रयत्नें;
उणें त्यांपुढें राज्य लोकत्रयाचें, मणी हेम रौप्यादि तेथें कशाचें? १

दीर्घायुता धनिकता बहुमान्यताही
चातुर्ययुक्त मनुजास अलभ्य नाहीं.
आनंद शांति सुख सौहृद सर्वदाही
स्वर्वल्लरीकरगताच विदग्धता ही २

चातुर्यें रचिली धरा विपुल ही त्या विश्वशिल्पाकरें,
तैसें बुद्धिबलें अनंत उपरी आकाश हें निर्मिलें.
त्याच्या ज्ञानबलें अधोंऽतरिं नभीं मेघव्रजातें स्थिति,
तच्छब्दोंचि तुषार वारि करका पाथोद हे वर्षती. ३

ये एकदाचि उदया अनुकूल वेळा,
ती साधिल्या करि अखंड समुन्नतीला;
जो मंदबुद्धि परि ती दवडील वायां,
आजन्म दुःखचि तया, शिणवूनि काया. ४

कार्य कराया, युद्धा जाया; किंवा स्वाभ्युन्नती कराया

सद्य:कालचि साधक जाणा,उद्यां करूं, हा व्यर्थ बहाणा ५

ज्योत्स्ना किती मधुर हे विहरे तटांतीं !
एथें प्रिये ! बसुनि आपण एकचित्तीं,
ऐकूं मनोहर मृदु स्वन गायकांचे,
जे होति रम्यतर शांतिभरें निशेचे. ६

जें क्षुद्र पुष्प फुलतें गिरिकंदरांत,
जें मंजु गीत पडतें श्रवणीं वनांत.
हा सूर्य, हें गगन, हे क्षिति सर्व वाटे
कीं स्वर्गिंचीं उघडितीं मजला कपाटें. ७

स्वर्गाचीं रम्य हर्म्यें, परिजनहि बहु, गीत वादित्र जथ,
पुष्पांचा नित्य चाले परिमल, नटती अप्सरा दिव्य जेथें,
मंत्र्यांच्या एक शब्दें सकलहि परि तो थाट जाई लयाला,
जैसी कीं स्वप्नसृष्टी ! उरत मग तिथें एकली भग्नशाला!८

वृक्षाखालीं बसुनि दयिते ! तूझिया संनिधानीं,
प्रेमालापां करित, गिळितां भाकरी आणि पाणी,
मध्यें गीति श्रुतिसुखकरा ऐकतां त्वन्मुखींची
वाटे स्वर्गीं क्वचितचि सुरां जोड ऐशा सुखाची. ९

सर्वांभूतीं प्रेम करावें, पात्र पाहुनी विश्वासावें.
उपद्रवातें न कुणा द्यावें, निजकार्यासाठीं. १०

सामर्थ्यानें शत्रु जिणावे, मित्रा संरक्षावें जीवें,
मौख्यर्याहुनि मौनचि बरवें, कोणि म्हणो कांहीं ११

जो अंतरीं होउनि गर्क गेला, हाटीं वनीं भेद उरे न त्याला.

करी स्वकर्तव्य विशेष नेटें, कीं अंतरीं प्रेम पवित्र दाटे. १२

सूर्यकिरणें पाहुनी अब्धिपृष्ठीं
चंद्रिकाही बिंबतां निर्झरान्तीं,
समुद्रोर्मी उसळतां अद्रिपादीं
सख्या! होतें मज स्मरण तुझें आधीं १३

[ गडे अक्रुर० ही चाल ]

या शून्य जगीं कोण करिल रे वसती
जरि स्नेही सगळे जाती ॥ धृ० ॥
जरि प्रीतीचीं हृदयें नष्टचि होतीं
तरि काय असे या जगतीं? १४

विपत्संपत्कालीं बहुदिवस एकत्र वसलीं
तरी ना अन्योन्यां वळख हृदयांतलि दिसली.
कळेना कां केली सहवसति त्यांनीं बहु दिन
जरी नाहीं केलें उभय मिळुनी प्रेमभरण. १५
सुपरीक्षित जो असे मित्र त्या दृढप्रेमरशनांहीं
आंवळुनीयां ठेवीं हृदयीं; रत्न तयासम नाहीं. १६
दुर्बलाशीं वागुनी प्रेमभावें
तद्गुणांसी कौतुकें आदरावें;
जरी दिसती तत्कृतीमाजि दोष
उपेक्षावे ते सांडुनियां रोष. १७

( पद. )

तरुण येरडा यांचा जोडा कधीं सुखानें नांदे ना।
तारुण्याचा वार्धक्याचा तुल्यभाव हा साधे ना ॥

तरुण लढाऊ, कृपण थेरडा; तरुण गुलाबी खल्लड बुढा ।
तरुण खिलाडू, वृद्ध लंगडा; गरम तरुण तो अणि रंगेला ।
थंड वृद्ध तो आणिक दुबळा, जरठ शिथिलतर तरुण चळवळा ।
कविवर बोले यांची तुलना, कशी करावी मज समजे ना. १८

देहक्षेत्रा काल हा नांगरोनी
चिंताबीजें देतसे पाभरोनि ।
अंतीं मृत्यू सर्व जीवां नियंता
कापोनि तें क्षेत्र दावी स्वसत्ता ! १९

खाया प्याया द्याया घ्याया असेल मुबलक पैसा
तरि मग सुंदर भासे जग हें, आम्हां न दुजी आशा ॥
परि भिक्षाशन अथवा याचन अथवा धन तुटपुंजी,
नको नको तरि दुष्ट जगत हें, जीव येतसे रंजी. ॥ २०

दृढोद्यमें उज्ज्वल कीर्ति राहे, आलस्ययोगें वरि डाग लाहे,
कृपाण कीं खुंटिस टांगियेला, शूरास आणी उपहास्यतेला. २१

कटिगत कांचीवलय प्रियेचें अल्प वर्तुलाकार ।
निखिल सुखाचें, सौंदर्याचें मज भासे आगार ॥ २२

नाहीं मागत दुसरें कांहीं, द्या मज इतुका प्रांत ।
हीन भासतें मजासि त्यापुढें, जें जें या लोकांत ॥ २३

दिव्य स्वनें लाजवि किन्नरीतें, पदार्पणें पूत करी धरेतें
क्षेत्रीं वनीं वा विजनीं असो तें, तत्संगमीं नंदन तुच्छ मातें २४

हर हर ! वैभव सत्ता परिजन चंद्रानना सपरिवार ।

होणार मृत्युकवलित ! देई चित्तास दुःख हें फार ॥ २५
भीत नसों मृत्यूतें, भीतों आम्हीं तदुत्तरस्थितितें ।
न कळे जाऊं कोठें, पावूं अन्यत्र कोणत्या गतितें ॥ २६
हे निद्रे मधुरे, प्रजाजन तुवां सप्रेम आलिंगिले ।
घेती झोंप सुखें, करोनि दिवसा उद्योग जे भागले ॥
भीशी कां नकळे, मला न शिवशी पक्ष्मांतिही कोमले ।
दुःखा विस्मृति ना पडे, मम जिणें दुःसह्य हें जाहलें ॥ २७
नेत्रीं पुत्तलिका मसूरदलशी अत्यल्प जी नांदते ।
वर्णूं शक्ति तिची अचाट किति मी ब्रह्मांडही ग्रासिते.
जातां सूचिमधूनि वारण कमी आश्चर्य तें याहुनी ।
देवा ! कौतुक हें तुझ्याविण दुज्या कोणा न साधे जनीं २८

---

## सीताराम वासुदेव पेंडसे

### १ मातेचें पुत्रकौतुक.

हा फार खोडकर बाई ॥
मज मुलिंहि आंवरत नाहीं ॥ बाळ हा ॥ १
वायुसा चपळ पळताहे ॥
धरितांही हातिं न राहे ॥ सोनुला ॥ २
रांगतां करपदीं मृदुलीं ॥
तीं रक्त सुकमलें फुललीं ॥ भासती ॥ ३
हा सस्मित वळुनी पाहे ॥

कौतुका न सीमा राहे ॥ मन्मनीं ॥ ४
दुड दुड दुड धांवत येई ॥
मज चुंबन देउनि जाई ॥ गोजिरा ॥ ५
वरिवरी चुंबिती बाई ॥
परि मन्मन तृप्त न होई ॥ नवल हें ॥ ६
थकतां मुखिं घर्म विराजे ॥
हिमयुक्त सरोजचि साजे ॥ रुचिर हें ॥ ७
शिरिं कुंतल उडती मृदुल ॥
मुखकमलीं भृंगाचि लोल ॥ वाटती ॥ ८
आरक्त रुचिर मृदु गाल ॥
कीं गुलाब फुलले लाल ॥ सत्य हे ॥ ९
नेत्रांनीं बघुनी कांती ॥
मृगशावक लज्जित होती ॥ खचित गे ॥ १०
बोबडे बोल बाळाचे ॥
कीं स्रवति बिंदु अमृताचे ॥ श्रवणिं या ॥ ११
रमणीय मधुर अव्यक्त ॥
बोलतां विरल लघु दंत ॥ चमकती ॥ १२
जणुं हिरकण्याच या लसती ॥
कीं कुंदकळ्यांची पंक्ती ॥ राजते ॥ १३
खेळतो परोपरि बाई ॥
ये प्रेमपूर किति हृदयीं ॥ माझिया ॥ १४
ही बघतां लीला याची ॥
कधिं हौस पुरे न मनाची ॥ माझिया ॥ १५

हीं सुंदर बालकमूर्ती ॥
करि आनंदाची पूर्ती ॥ जन्मुनी ॥ १६
कीं मूर्तिमंत हीं साची ॥
सफलताचि मम जन्माची ॥ अवतरे ॥ १७
बाळा या घेतां अंकीं ॥
सुख सत्य न दुसरें लोकीं ॥ यापरी ॥ १८
ईश्वरें भवीं जणुं मजला ॥
ठेवाचि सुखाचा दिधला ॥ बाळ हा ॥ १९
या दुस्तर भवसागरिंचें ॥
बाळ हें द्वीप सौख्याचें ॥ अद्भुत ॥ २०
संसारीं पति-पत्नींचा
हा प्रेमरज्जु हृदयाचा ॥ अद्भुत ॥ २१
बाळाचें प्रेम अपार
जननीस जीविताधार ॥ भूतलीं ॥ २२
जागें मातृसुकृतफल थोर
जननीचें जीवितसार ॥ बाळ हा ॥ २३
निधि बाळ सकळ सौख्याचा
कीं फुलला आनंदाचा ॥ गेंद हा ॥ २४
जननीच्या मुखकमलाचा
मित्र हा उगवला साचा ॥ बाळ हा ॥ २५
मम नम्र विनति ईशातें
दीर्घायु करीं बाळातें ॥ माझिया ॥ २६

———

## २. प्रभातसमय.

ऊठ ऊठ ! रमणि ! अतां उषःकाल झाला
ईश–नयन–तेज सुखद न्हाणितें जगाला ॥ ध्रु० ||
शांतिरसोदधिंत विश्व, मग्न पूर्ण दिसे सर्व
योग होय हा अपूर्व, ईशदर्शनाला १
स्मितवदना चारु उषा, उजळलिसे पूर्व दिशा
अनुरागें दिवसेशा, देति स्वागताला २
बालारुण रुचिर करीं, तिमिरपटा दूर करी
देइ नवी सौख्यकरी, चेतना जगाला ३
भुवनेश्वर–सुखद–दृष्टि, करि अमोघ कृपा-वृष्टि
चराचरा तिनें सृष्टि-, देह दिव्य झाला ४
दिव्य तरणिकिरणद्युति, उज्ज्वल करि जलदपंक्ति
प्रभुंविभवें व्यक्त करिति, रम्य मेघमाला ५
जागृत सारे द्विजवर, गगनिं उडति, किति तरुंवर
कूजताति मधुरस्वर, स्तविति ईश्वराला ६
तरु हरिखें डोलताति, शिंजितरव मधुर निघति
जणुं कृतज्ञ सकल चित्तिं, गाति प्रभु-गुणांला ७
हिमसीकरिं न्हाउनियां, लता मधुर-दर्शन या
पौरयुवति-सम, सदया, नमिति जगत्पाला ८
स्मितमय विकसित वदनें, प्रसन्न हीं किति सुमनें
स्फुट करिती हरिखानें, विश्वंभर-लीला ९
परिमलयुत मंद अनिल, शांति मना देइ अतुल

प्रभुकृपाप्रवाह विपुल, पवनरूप आला १०

श्रवण-मनोहर वाचे, सृष्टि मुखें विहगांचे
गाइ पवाडे प्रभुचे, नाद घुमुनि गेला ११

कृपाघना सुखधामा, प्रभुराया अभिरामा
सकल भुवन-विश्रामा, करूं वंदनाला १२

कुशलाची जी माउलि, जगताची जी साउलि
जगिं अखंड सुखवल्ली, गाउं नाममाला १३

ईश-यशोगायन हीं, भावें करि सृष्टि पाहिं
तन्मय ही डुलत राहि, सुखवि मानसाला १४

प्रिये ! इच्या सवें चाल, लावुनियां चित्तताल
भावें स्मरुं विश्वपाल, नमुं पद-कमलाला १५

---

## ३. प्रेमाचा पाळणा.

[ चालः—चंद्रकांतराजाची० ]

मदंकसिंहासनिं बैसुनियां रुचिर बालराजा,
प्रेमें करितो दुग्धपान ज स्तनिं यथेच्छ माझ्या. १

मम जीवाचा आधारचि तत्प्रेम मला भावे;
आनंद मला तैं होई, तो ब्रह्मांडि न मावे. २

आंवरे न हा पान्हा, पाना करिं माझ्या बाळा;
पोट भरुनि घे तृप्ति आपुली करूनि लडिवाळा. ३

अंकावरि या निजुनी बाळा ! निद्रासुख घ्यावें;

माता, धात्री, तोवि पाळणा तुझा म्यांच व्हावें. ४
गृहकार्यांतुनि अल्पाचि अवसर लाभे तुजसाठीं;
साधे ना लावाया दिन तव लालनिं, मी कष्टी ! ५
योजिन सर्वहि तव कार्यीं दिन; मोठी आस अशी,
आशा परि ती निष्फळ होई ! म्हणुनी दुःख मशी. ६
तथापि जोंवरि, सत्य सांगतें, जिवांत जीव असे,
तोंवरि वाहिन देह कार्यीं हा तव बाळा परिसें. ७
घेइं घेइं तूं झोंप सोनुल्या ! अंकावरती या;
तुझ्या सुखास्तव तुजवरि टाकिन ओंवाळुनि काया. ८
सुखें निजसि तैं वत्सलतेचा पूर हृदयिं लोटे !
मजसम सत्य न एक भूवरी अन्य धन्य ! वाटे. ९
शांत, मधुर, तव घर्मबिंदुयुत मुखारविंदातें
पुन्हा पुन्हा अवलोकीं मी परि तृप्ति न नयनांतें. १०
आनंदाचीं स्वप्नें तुजला दिसतीं सुंदरशीं,
मधुनि मधुनि तव मंदस्मित हें व्यक्त करी मजसी. ११
मंद निघाति तव मधुर मधुर जा हे श्वासोच्छ्वास !
सुखास ये मम पूर, ओहटी ये भव-दुःखास ! १२
नीज सुखानें गोजिरवाण्या ! मम हृदयानंदा !
हेंचि गीत तुज गाउनि निजविन माझ्या सुखकंदा ! १३

---

## ४. चंद्रावरील कलंक.

कृष्ण अंक दिसतो सुधाकरीं, अंक तो परि न सत्य त्यावरी.
श्रांत केलि रजनी करूनि ती झोंपली तदुदरीं खरोखरी. १४

होय हा निधि कला सकलांचा दृष्टिदोष नच होउ खलांचा
लावि यास्तवचि रेखुनि नीट भालिं तज्जनानि कज्जलतीट. २
ना निशारमण, अंकहि हा न, दिग्वधूमृदुकपोलचि जाण.
हा असे तिलकबिंदु मनोज्ञ, हृष्ट दर्शनिं तदीय रसज्ञ. ३
सत्य जाण अथवा न तो शशी, स्वर्णदींतिल मनोज्ञ सारसीं;
तन्मरंदरत भृंग गुंजतो तोचि तत्कमलिं डाग दीसतो. ४
अस्त मित्र किं तदीय पावला, खेद यास्तव तयासि जाहला
व्यक्त तोचि विधु भाव दावितो, खेदचिन्ह जणुं देहिं वाहतो !

## ५. निद्रा.

तूं जीवनाधार जनांस निद्रे, कृपा जनां दे तव शर्म भद्रे !
सुशांतिची तेंवि खऱ्या सुखाची, विश्रांत तूं या जननीच साची. १
योग्यांस तूं एकच शांतिधाम, ज्ञान्यां परंधामहि तूंचि नाम.
विश्रान्ति तूं श्रान्त जनां अपार, तूं दुःखिताधार जगांत थोर. २
त्रस्तां जनां तूंचि सुरंजयित्री, रोगाभिभूतां सुकृपाळु धात्री;
आर्तां खरी मूर्तिच तूं सुखाची, विश्राम उद्विग्न मनास साची. ३
तूं थोर गे दौलत निर्धनांची, तूं मुक्ति कारागृहवासियांची;
तुझ्या प्रसादें जन सौख्य पावे, दुःखें तुला पाहुनियां पळावें. ४
समान दृष्टी तव रावरंकीं, त्वन्न्याय तेंवी सम सर्व लोकीं;
तूं नाशिसी गे जनपापवृत्ती, दासी तुझी होय मनःप्रवृत्ती. ५
होई तुला अंकित भूपचित्त, तुलाचि आराधिती वीर मत्त;
तुझ्यापुढें होति सुनम्र मस्त, तुझ्यापुढें दीन जगीं समस्त ६
तुझ्यापुढें कोपमतंगजाची, गे ! दीनवाणी स्थिति होय साची;

भीती तुला सर्व मनोविकार, चिंतेस तूझें भय होय फार. ७
ज्वाला महातापद काळजीची, त्वद्दर्शनीं नष्ट अशेष साची ;
कृपामृताची तव होइ वृष्टी, तैं मानवाला परिपूर्ण तुष्टी. ८
आशा निराशा तशि घोर चिंता, व्यालीच ज्या गांजिति लोकचित्ता
जाती लया सत्वर सर्व पाहीं, देवी ! तुझ्या आगमनींच बाई. ९
मोहास तूं घालिसि मोहनी गे ! तुझ्याचि संगें भवशीण भागे;
तुझी कृपा संसृति—विस्मृतीचें,प्राण्यास दे सौख्य अपार साचें.१०
निवारुनी सर्व अघप्रवृत्ती, देशी जनां मंगल शांतवृत्ती;
विश्रान्ति—सौख्यामृत इंद्रियांना,पाजूनि देसी बल पुष्टि त्यांना.११
देवी तवानुग्रह थोर होतो, उशीस पाषाणहि लाजवीतो;
शिला कठोरा मृदु भासती या, तुझ्याविणें दुःखद ती सुशय्या१२
असोत चारू मृदुलोपधानें, महार्हही सुंदरशीं वितानें;
शय्या असो चारु मऊ परांची, तुझ्याविणें ती न जनां सुखाची१३
शिंपोनियां थंड गुलाबपाणी, शृंगारुनी कोमलशा फुलांनीं;
सुशीत शय्यागृह पूर्ण शांत, तुझ्याविणें तापद तें नितांत. १४
आर्द्रोशिराचे पडदे सुशीत, स्पर्शूनि ये शीतल मंद वात;
तयांत पंखे भर घालितातीं, हीं व्यर्थ तूझ्याविण सर्व होतीं १५
शय्या सुगंधी जरि अत्तरांनीं, सुगंध राहे गृहिं तो भरोनी;
प्रसन्नतेचीं जरि साधनें हीं, तुझ्याविणें निष्फल सर्व पाहीं १६
यांच्या अभावींहि परी जगांत, यथेच्छ ते त्वत्सुख भोगितात;
जे सेविती मार्ग सदा नयाचा, यदंतरीं लेश न किल्मिषाचा १७
जे जोडिती कष्ट करोनि वित्त, संतोष ज्यांचें वरि थोर चित्त;

पीडी न ज्यां दुर्धर वासना ती, निद्रे! तुझा ते सुखलाभ घेती १८
स्वमानसक्षोभ मनोविकारें, ज्यांना न, जे हृष्ट परोपकारें;
जे बोलती सत्य सुनम्र वाचा, त्यांना मिळे लाभ तुझ्या सुखाचा १९
यन्मानसीं थोर विचारहंस, क्रीडा करोनि पुरवी स्वहौस;
ज्यांच्या शिवे पाप न मानसातें, पीती तुझ्या तेचि सुधारसातें २०
जे आंत तेवीं सरल स्वभावें, सन्मार्ग जे सेविति एक भावें;
पडोत कोठें स्थळिं ते कशाहीं, त्यांनाचि लाभे तव सौख्य पाहीं २१
जगीं खटाटोप अपार ज्यांचा, व्यापें महाक्षोभहि मानसाचा
ज्यांचें सदा चित्त जयांस खातें, ते पूर्ण तूझ्या मुकती सुखातें २२
अल्पांत जे तुष्ट मनांत होती, साधेपणानें जगिं नांदताती
चित्तीं न ज्यां मत्सर लेशमात्र, निद्रे तुझ्या तेचि सुखास पात्र २३
विश्वंभराचे उपकार नाना, कृतज्ञ चित्तें स्मरताति माना;
स्तोत्रें तयाचीं दिनरात गाती, जे तेचि निद्रे तव सौख्य घेती २४
येरीति तूं सत्पथ दाखवीसी, लहान थोरां सम वागवीसी.
जशी असे तेविं कृपा असों दे, निद्रे! कवी मागत हेंचि मोदें २५

---

## ६. कल्पनेचा प्रदेश.

[ साकीवृत्त ]

असे कल्पना जन्मभूमि हो हृदय कवीचें सत्य ।।
स्वैरगतीनें तेथुनि विहरे यथेच्छ मग ती नित्य ।। १
स्फूर्ति--किल्लिनें हृदयपंजरा कवी उघडुनी देई ।।
बाणासम ती निघे कल्पना गगानीं भरारी घेई ।। २

चेतोहर ती जर्धी विहरते हरतें दुःख भवाचें ॥
तिच्यासवें मन विहार करुनी मिळवी सुपद सुखाचें ॥ ३
असंख्य कविच्या हृदयिं कल्पनातरंग जैं उचमळती ॥
हर्षनिर्भरें कविवपु पुलकित गात्तें किति थरथरती ॥ ४
कविदेहाला व्यापुनि यापरि टाकि कल्पनावारें ॥
शिराशिरांतुनी धावति सहसा विद्युत्प्रवाह सारे ॥ ५
संसाराचें भान मग तया क्षणभर राहत नाहीं ॥
काव्यविषयिं तादात्म्यचि पावे दुसरें सुचे न कांहीं ॥ ६
एकीमागुनि एक उसळती रसोर्मि त्याच्या हृदयीं ॥
प्रबंधरूपें तत्कंठांतुनि उदित होति ते समयीं ॥ ७
काव्य–कल्पना अशी स्फुरुनियां अनन्य कविहृदयांत ।
संचार करी चपल मारुतासमाचि तिहीं भुवनांत ॥ ८
अपरिमित अशा तेजोमय त्या विचार वातावरणीं ॥
उंच उंच उड्डाण करी ती सोडुनियां ही धरणी ॥ ९
असे निरंकुश अनियंत्रित ती केवळ सदा स्वभावें ॥
प्रदेश आहे अनंत तीचा स्वच्छेनें ती धांवे ॥ १०
अज्ञेय महा अगम्य अथवा अतर्क्य असो प्रदेश ॥
प्रतिबंधाविण सुकर होतसे तेथें तिचा प्रवेश ॥ ११
अनेकरंगी विविधरूप ती रमणीया विविधांगी ॥
हरूनि चित्ता क्षणभरि नाशी संसृतिखेदालागीं ॥ १२
निजप्रभावें काळाच्याही अखिल बंधनां तोडी ॥
निर्भयतेनें स्वैरकल्पना विधिनियमांनां मोडी ॥ १३

वसंतकाळीं शिशिराच्या कधिं दावी आभासातें ॥
शिशिरसमयिं कधिं ती स्वेच्छेनें भासवि मधुमासातें ॥ १४
असो हिंवाळा असह्य होउत विशीर्णपर्ण द्रुम ते ॥
विद्रूपा वनराजि असो ती उध्वस्तहि कानन तें ॥ १५
विस्मृति याची पाडि कल्पना थोर चमत्कृतिखाणी ॥
निजप्रभावें वसंतविभवें नेत्रांपुढती आणी ॥ १६
नवलपरीची हिची सृष्टि ही सदैव अभिनव भासे ॥
निजलीलेनें निर्विशेष त्या विधिचातुर्या हांसे ॥ १७
होती रूपांतरें सृष्टिचीं स्थित्यंतरेंहि नाना ॥
रूपचमत्कृति परि न विधीच्या सृष्टींतिल विषयांना ॥ १८
बहर ऋतूंचा होई जाई अशेष तो विलयाला ॥
सुरूपता कधिं कुरूपता ये सृष्टीच्या मुद्रेला ॥ १९
तारुण्य क्षणिं विलया जाई सौंदर्याचा नाश ॥
होउनियां ही सृष्टि विधीची नीरस भासे खास ॥ २०
पुन्हां पुन्हां तत्परिवर्तन हो चमत्कृती नच लेश ॥
रसहीन असा दिसे, सदाही विधिसृष्टीचा वेश ॥ २१
नवल पहा परि असे कल्पना रमणी ही चिरतरुणी ॥
हिच्यासम हिची सृष्टि मनोरम चिर,किति अगाध करणी २२
अखंडतरुणी हिच्या सृष्टिचें सौंदर्यहि अविनाशी ॥
नीरसतेचें नांव नाढळे हिच्यांत कधिं मनुजांशीं ॥ २३
हिच्या सृष्टिचे अखिल विषय चिर आनंदप्रद चित्ता ॥
अनिवार्य तशी अचिंत्य कैशी पहा कल्पनासत्ता ॥ २४

अवर्णनीयाचि हिचा समागम लाभे कविहृदयाला ॥
अनिर्वाच्य आनंद किति मिळे उपभोगाया त्याला ॥ २५
प्रौढ असो कवि परी तयाला क्षण बालक बनवीते ॥
नयनमनोहर शिशुलीला ती तयाकरवि करवीते ॥ २६
क्षणांत हंसवी क्षणांत रडवी क्षणांत करि उद्विग्न ॥
अन्य क्षणीं उत्साहा देउनि करि आनंदीं मग्न ॥ २७
बसुनि कल्पनापक्षपुटीं कविमानस घेइ भरारी ॥
नभोंऽगणीं उडुगणीं उच्चतम फिरतें प्रमोदकारीं ॥ २८
कधिं तेजोनिधि सूर्यमंडळीं कविमानस संचरतें ॥
भुवनसुंदरा कधिं शीतकरा भेटुनि तेथेंचि रते ॥ २९
विहार केंव्हां करि मोदें तें सुखद थोर सुरलोकीं ॥
कैलासींच्या लास्यानंदीं केंव्हां मग्न, विलोकीं ॥ ३०
दुर्गम ऐसे पर्वत कंदर तेंही हुडकुनि येतें ॥
यथार्थदर्शन पूर्ण तयांचें मनुजा करूनि देतें ॥ ३१
नवपल्लवसुमयुत वनलक्ष्मीवैभव अवलोकोनी ॥
हृदयंगम तच्चित्र रेखुनी दे रसिकांलागोनी ॥ ३२
भिन्न भिन्न नाना प्रकृतींच्या हृदयगव्हरीं शिरुनी ॥
मनोविकार प्रवृत्ति यांचें सूक्ष्म निरीक्षण करुनी ॥ ३३
परोपरींचीं स्वभावचित्रें यथार्थ तें रंगवितें ॥
दावुनियां तीं बोध करोनी मनुजांना रंजवितें ॥ ३४
यापरि जेंव्हां कविचें मानस रमे कल्पनासंगें ॥
तैंच रंग ये काव्यालागुनि रसिकचित्तही रंगे ॥ ३५

अशी कल्पना कविची दावी अपरिमित चमत्कार ॥
अपार करुनी विहार सुंदर उडवुनि देइ बहार ॥ ३६
सृष्टिनिरीक्षण करुनि कल्पना दावुनि दे मनुजांला ॥
जगज्जनक जो थोर तयाच्या अतर्क्य चातुर्याला ॥ ३७
अगाध सुंदर चमत्कृतिमयी ती विश्वंभरलीला ॥
हिच्याचि योगें व्यक्त होतसे पहा मनुजनयनांला ॥ ३८
हीच कल्पना ब्रह्मानंदीं लावुनि देई टाळी ॥
चिरसुखानुभव दावुनियां ही संसारभय पिटाळी ॥ ३९
रूप दाखवी परमेशाचें गुणनिधान अभिराम ॥
अमृततुल्य तत्प्रतीति मधुरा करवी, पुरवी काम ॥ ४०

---

## ७. आजवा-सरोवरावरील चंद्रोदय.

[ श्लोक. ]

नितांत यद्देश असे प्रसन्न; मनोज्ञ ज्या वेष्टितसे अरण्य;
विशाल ऐसा ऱ्हद आजवा हा, विश्रांतिचें स्थान सुगंधवाहा १
आरक्त संध्या रमणी विकासे; संध्यानुरागें ऱ्हद रक्त भासे;
वक्षस्थळीं शांत सुरम्य त्याचे, लसे नभश्रीस्मित मंद साचें २
वाटे सुराचें जणुं हें अरण्य, कासार त्यांतलिचि हा प्रसन्न;
कीं स्थान हें सुंदर नंदनाचें; यद्दर्शनीं चित्तमयूर नाचे ३
मंजुध्वनी काढिति ऊर्मि वातें; नारी करीती गुजगोष्टि वाटे;
कीं सुंदरी प्रेमसुविभ्रमांनां, दावूनि आकर्षिति मारुतांना ४
ऊर्मींचिया त्या परिरंभणाचें, घेताति मंदानिल सौख्य साचें;

आनंदें त्या मग्न समीर होती; या शांत कालीं जणुं झोंप घेती ५
तो शांतिचें धाम सरःप्रदेश; वेली तरू निश्चलही अशेष;
हाले न तें एकहि पान वातें; शांती करी बद्ध समीर वाटे ६
तीरस्थ सुस्तब्ध दिसे वनाली, कीं श्रांत निद्रावश ती जहाली;
जों जों क्रमें होइ दिनावसान, गांभीर्य तों तों झाणिं वर्धमान ७
शांत्येकतानत्व सरःप्रदेशीं, चराचरां बद्ध करी स्वपाशीं;
स्वमोहिनीचें पसरीत जाळें; त्यामाजि हें व्यापृत विश्व झालें ! ८
संपूर्ण भासे स्थल चित्स्वरूप ! आनंद दे मन्मतिला अमूप;
कीं व्यक्त विश्वंभरतेज झालें; तद्रूपिं ही तन्मय सृष्टि डोले ! ९
संसारदुःखांबुधि एथ आटे; हर्षाब्धि हेलावत सत्य वाटे;
तल्लीन मी सत्वर त्यांत झालों; स्वदेहभाना विसरूनि गेलों ! १०
प्रदोष ऐसा रमणीय भारी ! मच्चित्तनेत्रां बहु मोदकारी!
प्रसन्न सारा न्हददेश साजे; प्रसन्नता मूर्तिमती विराजे ! ११
संधिप्रकाशक्षय हो क्रमानें; व्याप्त क्रमें भूतलही तमानें;
विश्वावरी जों तम झेंप घाली, तों चंद्रमूर्ति क्षितिजांत आली १२
दंडावया त्या तिमिरासुराला, सवेग धांवूनि सुधांशु आला;
स्वमित्रनाशोद्यत त्या रिपूचा, घेई न कां सूड सुमित्र साचा ? १३
जाई जगा सोडुनि मित्र जेव्हां, सुधाकरा दे निज तेज ठेवा,
तया ऋणांतूनिच मुक्त व्हाया, धांवे तमाचा वध तो कराया १४
आरक्त मुद्रा विधुची प्रकाशे; तत्प्रेमरक्तांतर कीं विकासे;
कीं कोप मित्राहितअंधकारीं, तो रागिं या व्यक्तचि होय भारी १५
डोकावला जो विधु पूर्वभागीं, भयें पळे तो तम शीघ्र वेगीं;

शुभ्रांशु जों त्या वधि अंधकारा, भूगोल तों उज्ज्वल सद्य सारा १६
द्याया निशा स्वागत वल्लभाला, नक्षत्रमाला नभ–मंडपाला
बांधूनि, मोदें नटुनी निघाली; नक्षत्रमोत्यें उधळीत आली १७
सुनीलवर्णा हबशीण राणी, हिऱ्यांचिया भूषित भूषणांनीं;
तेवीं निशा श्यामल ती नगांनीं; शोभे बहू हीरकतारकांनीं १८
सुधांशु कारागिर कीं रसज्ञ, प्रेमें विणी चंद्रकळा मनोज्ञ;
तारा–बुट्या लावुनि गुंफियेली; वाटे निशा नेसुनि तीच आली १९
शोभे तिला चंद्रकळा कशी ते ? या कौतुकानें अनुरक्त चित्तें
पहावया चारु निज प्रियेला, प्रेमें निशावल्लभ शीघ्र आला २०
आनंद साऱ्या भुवनत्रयाचा, आनंदसिंधूच चराचरांचा,
कीं प्रेमकंद प्रणयी जनांचा, पूर्णेंदु तो ये नभिं पौर्णिमेचा २१
कृपामृताचा कलश प्रभूचा, कीं पुंज विश्वंभरसद्यशाचा,
निधी महीच्या अखिला सुखांचा, तो नाथ आला सकला कलांचा २२
सुदीप्तिखाणी गगनश्रियेची, सौभाग्यमूर्ती कुमुदश्रियेची,
विलासपूर्ती जणुं दिग्वधूची, ती सौख्यदा मूर्ति लसे विधूची! २३
जो अंबरीं दिव्य शशी रिघाला, वाटे ऱ्हदांतूनिच तो निघाला;
ऱ्हदांतरस्थांबरिं जो प्रकाशे, त्याचें नभीं हें प्रतिबिंब भासे ! २४
कीं सृष्टिलक्ष्मी गगनश्रियेस, लावी टिळा तो विधुरूप दृश्य;
कीं राखडी दिव्य सुरांगना जे, घाली शिरीं तीच जणो विराजे! २५
झांकी पटें ज्या जग अंधकार, ओढी करीं त्या विधु सूत्रधार;
दूरी जधीं कृष्ण पटास सारी, भूश्री झळाळे झणिं चित्तहारी ! २६
विलासिनी सृष्टि अहा ! सुदृश्य ! खुले तिचा मंगल धौत वेश !

कीं इंदुच्या शांत रुचिप्रसादें, संतुष्ट सृष्टी डुलते प्रमोदें २७
मृगांक जेवीं विलसे नभांत; दुजा लसे तत्सम त्या ऱ्हदांत.
कीं जादुगार ऱ्हद हा विशाल, दावीत नानापरि इंद्रजाल ! २८
द्विचंद्र दावी रमणीय फार, सुतारकासंघ तसे अपार;
नीलांबराची तशि दिव्य शोभा, हो व्यक्त ज्यांत प्रभुची यशोभा! २९
प्रसन्न दृग्गोचर भूप्रदेश, जो चंद्रिका दीप्त करी अशेष;
प्रमोदकारी सुमनोज्ञ चित्रें, त्याचीं ऱ्हदें दावियलीं विचित्रें ! ३०
सुधांशु जें जें करि दृश्यमान, दावी दुजें तो झणिं तत्समान;
वस्तूंचिया त्या प्रतिमाद्वयातें पडे बघोनी भ्रम मानसातें ! ३१
जैं चंद्रमा ये वरि दीप्तिमंत, प्रभा तयाची पसरे नभांत;
तैं तारकांची मृदु पांडु दीप्ती, वाटे सुमंदस्मित त्या करीती ! ३२
कीं, पाहुनीयां निजवल्लभाला, मुखें त्रपेनें लपवीति बाला !
भासे अपांगप्रणयेक्षणांचें, तें तेज मंद स्फुरतें तयांचें ३३
इंदुप्रिया सुंदर चंद्रिका जे, नभीं स्वसाम्राज्यपदीं विराजे;
स्वस्वामिनीदर्शनिं तत्पदासी, त्या नम्र होती विनयेंचि दासी ३४
जों जों खुलें दीप्ति सुधाकराची, तों म्लान होई च्छवि तारकांची;
महानुभावां पुढती अहो ! तें फिकें त्वरें पामरतेज होतें ! ३५
सुप्राज्य वृष्टी सित कौमुदीची, नभांतुनी भूवरि हो सुखाची;
प्रवाह तो धौत सरांत लोटे; कीं स्वर्णदीपूर तयांत दाटे ! ३६
कीं कामधेनु प्रगटे नभांत; ज्योत्स्नामिषें सुंदर दिव्य शांत;
अमोघ वर्षे निज दुग्धधारा; भूगोल न्हाणी, करी धौत सारा! ३७
कीं चंद्रकांत द्रवरूप वाहे; पियूषवर्षावचि होत आहे;

कीं, मौक्तिकांचें सित दिव्य पाणी, ये बाष्परूपें, भुवनास न्हाणी! ३८
कीं चंदनाच्या सुरभी रसाचा, प्रवाह हा शीतल रम्य साचा;
वर्षाव किंवा रजतांबुदाचा, भरतिसे आशय तो जलाचा ! ३९
पाऊस कीं मंद पडे हिमाचा; किंवा प्रभूच्या सुकृपामृताचा;
दिव्यौघ हा फेनसुशीकरांचा, ज्योत्स्नामिषें वाहतसे सुखाचा !४०
सुरम्य शांतिप्रद चंद्रिका ते, मोहूनि टाकी मम मानसातें;
सुधाकराचे कर कर्षिती ते, न्हदोर्मितें त्यांसह मन्मतीतें ! ४१
सुधाकराच्या विभवा बघोनी, लाटा न्हदीं येति उचंबळोनी;
पाहोनियां वैभव हो ! परांचें, संतोषतें चित्त महाजनांचें ! ४२
वाटे नभा प्रेमकुतूहलानें सुगुप्त केलें हृदयीं सरानें;
परी तयाच्या विमलत्वयोगें, तें दृश्य वक्षस्थलिं होय वेगें ! ४३
न्हदें नभोवैभव देखियेलें, स्वप्रेमरंगीं हृदिं रेखियेलें;
तदंतराच्या जणुं आरशांत, तच्चित्र हें चारु लसे प्रशांत ! ४४
अतीव तीं सौख्यद इंदुमुद्रा, खुले न्हदीं; लाजवि जो समुद्रा;
गंभीर वक्षस्थलिं निश्चलीं तो, कीं चंद्र निद्राच सुखें करीतो ४५
कासार कीं सत्य न, हा चितारी, चंद्रोदयाचें बहु मोदकारी
स्वहृत्पटीं रेखुनि दावि चित्र; जें रंजवी पूर्ण रसज्ञनेत्र ! ४६
हें चित्र चेतोहरसें तयानें, जें रेखियेलें बहु कौशलानें;
तें नाशिलें मत्सरि शीघ्र वातें ! दुष्टां परोत्कर्ष असह्य वाटे ! ४७
खंडें तयाचीं लहरींवरी तीं, कासारपृष्ठीं विखरोनि जाती !
त्याच्या सुवक्राकृति रौप्यवर्ण, कीं हंस हे क्रीडति धौतवर्ण ४८
मनोहरें दृग्विषयें अशा या, प्रमोदरोमांचित सर्व काया !

बघोनि लीलाप्रिय कौमुदीतें, सोल्लास लास्या करि मन्मती ते ४९
सुधांशु लीला करि ऊर्मिसंगें; ती पाहतां सद्गदितांतरंगें
तत्कौतुकीं तन्मय मी तटाकीं, तों मोहनीपाश सुषुप्ति टाकी ५०
अत्यंत शांतिप्रद जे स्वभावें, त्या इंदुच्या सौम्य करप्रभावें,
तेंवीच गंधानिलवीजनानें, निद्रा मला सत्वर ये सुखानें ५१
ही रम्य शोभा, परि लुप्त नोहे, स्वप्नांत ती सांग सुदृश्य पाहें;
नेत्रीं मनीं जी ठसली असे ते, जावी विनाशाप्रति हो ! कशी तें ?

---

# मुकुंद गणेशशास्त्री मिरजकर.

## कवितारति.

[ वियोगिनी ]

इतुकें तव रूप गे ! रुचे, न मला भूक तहानही सुचे;
जरि षड्रस पातले पुढें, नच तत्स्वादनसौख्य या घडे. १
जनकाग्रजपुत्रही जरी, परलोका मम पावले तरी,
कविते ! तव संगतींत मी, गणिलें तें गुरु दुःखही कमी. २
विषयांतर-वाचनामुळें, सुख चित्ता घटिकाभरी मिळे.
कवितेंत तपेंहि लोटिलीं, नचि इच्छा परिपूर्ण जाहली. ३
जरि निर्धनता वसे घरीं, तुजसंगें गणिली न ती परी,
घडतां त्वदभाव संप्रती, मम झाली विषमा मनःस्थिति. ४
सहसा मज हाक मारुनी, करिसी जागृत तूं निजेंतुनी,
न गणोनि निशीथही तदा, गुजगोष्टी करिशी अनेकदा; ५

बघतों जंव नाटकादिकें, मजला जागर बाधतें निकें,
परि मेलन होय आपलें, कविते ! तैं न कळलें उजाडलें ! ६

सदनीं शयनीं वनांतरीं, करितां भोजन पान चाकरी,
जनतेंत सभेंत वा पथीं, रचिल्या म्यां कविता अहा किती ! ७

गुरुकार्यवशें कुणाकडे, निघतां ये कविता पथीं पुढें,
चुकलों गृह भूल ये मना, पडलें कार्य तसेंच त्या क्षणा. ८

वदुनी वदतों जनीं जरी, मम चाले कविता हृदंतरीं !
जरि दुंदुभिनाद कोंदला, न करी व्यग्र तथापि तो मला. ९

अचला शरमोक्षपद्धति, उपदेशी गुरु अर्जुनाप्रती,
मज येत तदीय कल्पना, रचितां काव्य नवें क्षणक्षणां १०

तनयाप्रती घेउनी कडे, बघुनी तन्मुखनीरजाकडे,
सहजासहजीं किती तरी, वदलों मी कविता परोपरी. ११

बहु लेखनसाधनें जरी, असती सिद्ध घरामधें तरी;
कविता लिहितां न तीं मला, दिसती, जीव सुखांत रंगला १२

कधिं रोजनिशी कधीं वही, कधिं पाटी कधि वृत्तपत्रही,
कधिं नाटक हस्तपत्रिका, मज लाभे जनहो ! हसूं नका १३

न मषी नच लेखनी दिसे, मग मी घेत करामधें शिसें,
प्रतिबंध लिपींत ना धरीं, कधिं मोडी कधिं देवनागरी १४

उलटी कधि लेखनी धरीं, जरि कर्णावरि शोधितों घरीं
कधिं मौन धरीं कधीं सुखें, करितों गानहि गुंगुनी मुखें १५

लिहिलें पद खोडिलें न मीं, तरि होते न कधीं त्वरा कमी,
शिकलों न कसा करद्वयें, लिहिण्या संतत हा विचार ये १६

लघुलेखनपद्धती नवी, मजला यास्तव वाटते हवी.
चतुरा मिळवीन लेखका, कधिं मी ? व्यास जसा विनायका १७
उदरार्थ करील चाकरी, मज तो लेखक कासया तरी ?
नच काळहि वेळ ठाउकी, कविता जैं मम येतसे मुखीं १८
निजुनी बसुनी कधीं उभा, लिहितों सर्व असे मला मुभा.
मज या समयास पाहतां, जन वेडा म्हणतील तत्त्वतां १९
चिटक्या किति वाजवी करीं, धरितों ताल दिसेल त्यावरीं.
अनिमित्त कुठें तरी बघें, जन आला बसला मनीं न घें २०
मनिं येत विचार जैं नवा, करितों मी करतालिकारवा;
हसतों मिटितोंहि लोचनें, गणितें ब्रह्मसुखासही उणें. २१
प्रतिभा जंव नावरे मना, मज तैं येत समाधिकल्पना.
कवितामय विश्व भासतें, लिहिणें वा वदणेंहि खुंटतें २२
मज याच सुखांत ईश्वरा, न कसा ठेविसि नित्य पामरा ?
दिधलें तितुक्यामधें तृषा, न शमे वाक्य गणीं न हें मृषा २३
कधिं सार्थक जन्म वाटुनी, त्यजितों भूरि सुखाश्रु मेदिनी
गमते धरणीहि धाकुटी, अपुली आपण पाठ थोपटीं २४
बहुकाल घडें निजों असें, वदतांही मज संचरे पिसें
जरि मालविला दिवा तरी, रसनाग्रीं कविता वसे बरी २५
फिरुनी मग दीप लावितों, लिहितों मालवितों पुन्हाहि तो.
किति कागद ते उशागती, पडती जाति अशा निशा किती २६
कधिं कामुक वीरही कधीं, असतोंही विरही अधीं मधीं,
कधिं देवहि भक्त होय हा, बहुरूपी नटवा म्हणा महा ! २७

करुणास्पदवर्णनीं किती मम ये लोचनिं अश्रुसंतति
न दिसो इतरांस हे स्थिति, म्हणुनी मत्कर दार लोटिती २८
अवितृप्तमनें कितीकदा, वदनीं एकचि पद्य ये सदा;
वदतां वदतां यथोचितें, किति म्यां रंगविलीं सुभाषितें २९
पडलें जरि या स्थितीमधें मजला स्वप्नहि पद्य मी वदें.
लिहिणार उठोनि तोंवरी, विसरें अन्य असें पुढें परी ३०
मज घालुनि मोहिनीं अशी कविता ठेवित आपुल्या वशीं,
परि कष्ट कधीं न वाटले, अजि दुःखाश्रु परंतु लोटले! ३१

---

# विष्णु सोमनाथ सरवटे.

## १. ईशप्रभाव.

श्लोक.

आकाशीं सविता दिवा विलसतो रात्रौ शशी तारका,
कालीं वर्षति मेघ, भूमि फलते सर्वत्र धान्यादिकां.
प्राणी चालति बोलती क्षितितलीं त्यां ज्ञानबुद्धी असे,
सत्तेनें प्रभुच्या पहा सकल हें ब्रह्मांड चाले कसें ! १
नाना वृक्षलतांस पल्लवफुलें येती वसंतीं किती,
वायू शीतल मंद मंद गतिनीं त्याच्या सवें क्रीडती.
रानीं चोंहिकडे सुगंध सुटती खोरीं दरीं व्यापिती,
शोभा ही सुखहर्षदायक किती ? रम्य प्रभूची कृती ! २

ग्रीष्मीं भास्कर पूर्ण-तेज तपुनी ओढे नद्या आटती,
 द्राक्षाम्रादि रसाल सुंदर फळें नाना पिकूं लागती.
आकाशीं ढग नीलवर्ण लसती विद्युद्द्युति स्फूरती,
 गर्जोनी जल वर्षते चहूंकडे सस्यांकुरा हो क्षिती ३
हेमंतीं क्षितिपृष्ठ विस्तृत कसें झांकून जात पहा,
 ओंब्या, लोंबरिं कंधराच लवल्या सस्यादिकांहीं अहा !
देते जीवन जीवमात्र अवघ्यां जी धान्यसंपत्ति ती
 रानोमाळ उदार हस्तिं वितरीं कीं अन्नपूर्णा क्षिती ४
चक्रावृत्ति अनुक्रमें करुनिया निर्बंध पृथ्वीवरी,
 होती हे सुखद त्रिकाल रविच्या तापें चि संवत्सरीं.
सारा हा क्रम साहजीक दिसतो, कौशल्य भारी तरि
 स्रष्ट्याच कळतें तुह्मी जसजसें शोधाल अभ्यंतरीं ५
अब्धी थोर अफाट ज्यांत शतशः नौका सदा पोंहती,
 ज्यामाजी जलजंतु मीन सुसरी नक्रादि हे राहती.
ज्याच्या खोल विशाल कोशजठरीं रत्नें बहू लाभती,
 ज्याचें वारि पिऊन मेघ फिरुनी भूमीवरी वर्षती ६
अद्री भव्य विशाल तुंग शिखरें नानाकृती शोभती,
 वेळू चंदन आइनादि बरवीं झाडें नभा चुंबिती;
ओढे निर्झर वांकुडे नद नद्या सर्पाकृती वाहती,
 भेटाया जलधीस जाति म्हणुनी "घो घो" रवें गर्जती ७
मैदानें कुरणें सपाट हिरवीं विस्तीर्ण वाळू कुठें,
 कोठें त्यांत सरोवरें विलसती, उत्कृष्ट गांवें कुठें;

झाडी किर्रे अशीं भयंकर वनें ओसाड कोठें गुहा,
कोठें रौप्यहिरण्यरत्नमणिच्या खाणी विशाला अहा ! ८
पक्षी चित्रविचित्र वर्ण नटले नानापरी शोभती,
कांहीं सुस्वर मंजु शब्द करिती गाती किती नाचती.
विंचू सर्प पतंग भृंग कृमि हे स्वच्छंद हो क्रीडती,
हस्ती केसरि वाघ वानर ससे पश्वादि वर्णूं किती ९
प्राणी चौंहिकडे अगण्य वसती संचारती भूतलीं,
ज्यामाजी मनुजासमान दुसऱ्यां बुद्धी नसे आगळी;
जीर्णें तो सकलेंद्र होऊन तयां योजी स्वसेवे वर
यांचें काय ? जलाद्रिवातवसुधासूर्यादिही चाकर १०
सिंधू पर्वत वृक्ष आदिकरुनी सर्वत्र पृथ्वीवरी
देखावे बहु त्यांत जीव अवघे पात्रें च कीं साजिरीं;
प्रेमें आपण सूत्रधार बसुनी जो त्यांजला खेळवी
ऐसा नाटकरूप थाट बरवा प्रेमें प्रभू चालवी ११
वर्णी तांबुस शुक्ल शाम पिवळीं रूपें धरी मानुषी
भाषा प्राकृत संस्कृतादि किति त्या बोले तयांच्या मुखीं !
कोळी कर्षक भिल्ल नाविक अशा नानारुपीं कष्टतो,
कोठें भूप समर्थ होऊन धनी सिंहासनीं राजतो १२
कोठें घोर रणें जितून विजयी स्वातंत्र्य ही भोगितो,
कोठें भव्य विचित्र यांत्रिक कला योजून श्री पावतो.
कोठें ग्रंथ नवीन नित्य पढुनी विद्येंत आनंदतो,
कोठें राजमहाल झोंपडि असा नाना गृहीं नांदतो १३

सर्वांभूतीं असे कृपाघन असा व्यापून जो राहिला,
उत्पत्तिस्थितिनाशविश्वघटनाहेतू च जो जाहला.
त्या श्रीशा सकलात्मका सुखकरा सद्भाव ठेवोनियां
ध्यावें ध्यानिं मनीं जनीं निशिदिनीं तल्लीन होवोनिया १४

---

## २. नागपंचमीचा देखावा.

(अ) [ साध्या एकताली लावणीची धाटी. ]

कामिनी हंसगामिनी किं सौदामिनी चमकती व्योमीं ।
सखिवृंद जाति वारुळा गात आरामीं ॥ ध्रु० ॥
लावुनी उटण न्हाउनी केंस उदवुनी गुंफुनी वेणी ।
मुद चंद्रकोर केवडा फुलांची श्रेणी ॥
मुरडुनी मस्तकीं वेणि नागिणीवाणि खोंवुनी बुचडा ।
उजु भांग शुभ्र शोभतो चंद्रमा मुखडा ॥
कज्जलें नयनमंडलें कि नीलोत्पलें भासती फुललीं ।
स्मरचाप निपट फांकड्या भोंवया खालीं ॥
साजिरी कपाळीं चिरी तिलक पिंजरी रेखुनी नामी ।
सखिवृंद जाति वारुळा गात आरामीं ॥ कामिनी० ॥ १
नेसुनी शालु बैंगणी कांचि पैठणी मिराणी सुरळी ।
मुगि गुंजि वेलि रुइफुली अंजिरी खवली ॥
कंचुकी बहुत नेटकी लेउनी निकी फुटाणी पिवळी ।
जरिकांठि मंदिली निळी बसंती ढवळी ॥
सारून मस्तकावरुन पदर करिं धरुन चालतां झोके ।

स्मरध्वजा गोल नारळी पाठिवर फडके ॥
क्षितितलीं पंकजावली मृदुल पाउलीं उमटल्या दामी ।
सखिवृंद जाति वारुळा गात आरामीं ॥ कामिनी० ॥ २
कोंदणीं जोडिले मणी मौक्तिकें गुणीं झळकती कंठीं ।
ठुशि चंद्रहार तन्मणी पोत सरि पेटी ॥
नासिकीं चौकडी टिकी साधि मौक्तिकी मोरणी नथणी ।
बाळि बुगडी काप भोकरें घालुनी श्रवणीं ॥
बिलवरी चुडे सोनेरी गोजिऱ्या करीं विलसती लसण्या ।
जवे छंद गोट पाटल्या कि तोडे कंगण्या ॥
सांखळ्या जोडवीं चुळ्या गेंद मासोळ्या रवति पदपद्मीं ।
सखिवृंद जाति वारूळा गात आरामीं ॥ कामिनी० ॥ ३
ही झुंड पाहुनी बंड शहरचे गुंड कैक अलबेले ।
जणु प्रफुल्लाब्जपथसरीं भृंगचय तुटले ॥
शृंगारथाट अनिवार नटुनि सरदार फांकडे फिरती ।
किती ह्या बाग देति ते थयथया उडती ॥
निरखुनी त्यांत देखणी चटकचांदणी कोण स्मित करती ।
भिडतांच चौनिगा चंद्रकांतसे द्रवती ॥
श्रीरंगपदाब्जीं दंग पंतकविभृंग गुंजतो रामीं ।
सखिवृंद जाति वारुळा गात आरामीं ॥ कामिनी० ॥ ४

(ब) [ ठुंबरीची धाटी.]

कोणि सुंदरी मदनमंजरी । चालालि उपवनकेलिविहारीं ॥ध्रु० ॥
नटुनि थटुनि अति वसनाभरणीं । सखिसह बोलत मंजुलवाणी १

धरुनि करीं कर जिवलग सखिचा। गात मधुर मृदु सवन पिकाचा २
फुलें चमेली बकुल मालती। शिरसिं गुंफिलीं गळत खालतीं ३
चंचल चपला कनकवल्लरी। नाजूक मृदु तनु सुबक गोजिरी ४
दयित विलोकुनि मुदित अंतरीं। सस्मित मुरकुनि पदर सांवरी ५
प्रथमचि संगम वनक्रीडेचा। चकित मृगाक्षी भाव व्रिडेचा ६
पाहुनि पंचायुध हो अंचित। त्या कुचलकुचीं हार विराजित ७
श्रमजलकणपुलकांकितशारिरा। मंदगती घन जघन सुरुचिरा ८

## ३. संसार—नाटक.

[साध्या एकताली लावणीची धाटी.]

मृत्युलोक ह्या रंगभूमिवर मानव नाटकि खेळ करी।
स्ववयोवस्था रूपें बरवीं सोंगें नटुनी परोपरी॥
अन्य नाटकासमान ह्यांतहि प्रवेश निर्गम ते असुनी।
सात अंक मुख्यत्वें होती मनुजवयाच्या स्थिति धरुनी॥
मनुष्य एकचि अनेक सोंगें निज आयुष्यावस्थांनीं।
नटुनी अद्भुत वेष करितसे अनुरुप पात्रीं बतावणी॥ मृ० १
प्रथमारंभीं बाल्यावस्था पात्र रम्य गोजिरवाणें।
आइदाइच्या कटिखांद्यावर वागे बालक अति चिमणें॥
निजे पाळणीं कधीं क्षणोक्षण ट्याहां ट्याहां कीं रडणें।
कधीं ओकणें लाळ गाळणें कधीं मुकुलमुख मृदु हंसणें॥मृ० २
नंतर पौगंडावस्था ये तंव तो विद्यार्थी होई
उठे पहाटें खुषींत बहु परि हौस खेळण्याची हृदयीं
रुमाल कांखे मारुन शाळे जुलुमें रेंगाळत जाई

होतां सुटि मग कुल्यास लाउनि पाय उडत कीं घरिं येई ॥मृ० ३
तृतीय अंकीं यौवन हे स्थिति येतां कामानल भडके.
ध्यानिं मनीं मग ध्यान युवतिचें रमे मनोहर मंजु निकें
प्राणसखीच्या कटाक्षपातें विव्हल हो बहु जीव पिके.
वेड्यापरि मग गाइत फिरतो तत्पर श्रृंगारिक चुटके ॥मृ० ४
चतुर्थ अंकीं रोजगारि हो बोल चाल मानी तोरा.
मिशा फांकड्या वेष नेटका ऐट मिजासी बहु नखरा.
हेवा मानापानाचा अति क्षुद्र गोष्टिवर तंडणारा.
मृगजलकीर्तीस्तव तोफेच्या साहुं सिद्धही भडिमारा ॥ मृ० ५
पंचम अंकीं प्रौढावस्था यथेष्ट शाल्योदन गाढें,
राजश्रीचें दोंद सुटे मग प्रस्थ बहुश्रुतिचे वाढे.
जेठा बांधुन बसे, वांकडें पाहि बोलतां स्फुरण चढे,
यंव् करावें त्यंव् मरावें श्लोक दाखले झोंकि पुढें. ॥मृ० ६
अंकिं सहाव्या येत जरास्थिति दोंदबोंद वपु झडे तदा,
पंज्या हलका ढुंगाला मग नाकावर उपनेत्र सदा.
ढगले ज्वानिचे पोतीं होती धीर काठिचा पदोपदीं,
गांभीर्याचा बोल पालटे निघे मुलापरि स्वर मंदा ॥ मृ० ७
सप्तम अंकीं वृद्धावस्था जरख पात्र हें शेंवटिचें
चरित्र संपवि जणु मनुजाच्या अचाट नाना खटपटिचें !
श्रोत्रनेत्रमतिहीन विलक्षण, शुद्ध बोळकें तोंडाचें
बाल्यावस्था दुजीच हे जणु भान नुरेही देहाचें, ॥ मृ० ८

---

## ४. सखीविनोद अथवा प्रेमालाप.

नकळो रहस्य तिसऱ्या म्हणुनि सखी अन्य वस्तु आलीला.
वर्णुनि छेकापन्हुति—वचनें सुंदर कथी दयित—लीला. १
सातांसहां मासिं गृहास येतो, डुलें स्वतां डोलविही मला तो.
बोलावया वाटतसे हि शंका, सखे सखा कीं?सखि नाहिं पंखा २
सदा सुखें वर्धविणार कांतिला, कधीं नहो दूर चुकून दृष्टिला,
असे सदा कीं मम चित्तरंजन. सखे सखा कीं? सखि नाहिं; अंजन ३
निशींत साऱ्या मजसंगि जागला, प्रभात होतां मग जाऊं लागला,
वियोग त्याचा हृदयास वेधक.सखे सखा कीं ? सखि नाहिं; दीपक ४
ये मध्यरात्रीं भुवनीं तयाचें, सौंदर्य कोणा वदवेल साचें ?
होतो मला त्या बघतांचि मोद, सखे सखा कीं ? सखि नाहिं; चांद ५
अहर्निशीं ये सदनीं सये तो, तशांत सर्वांहि समक्ष येतो;
कथूं किती तत्सुखहर्षमात ? सखे सखा कीं ? सखि नाहिं; वात ६
बाहींत बाहीं भिडवून दोनी, उरोज दाबून धरी वरोनी,
हो त्रास तद्योगवियोगकाळीं.सखे सखा कीं ? सखि नाहीं; चोळी ७
ऱ्यां रात्र सारी उरिं वागवोनी बहार त्याचा अवघा लुटोनी
केलें प्रभातीं मग त्यास दूर.सखे सखा कीं? सखि नाहिं; हार ८
अढी पडे घट्ट गळां सुटेना, डुले हि जैं तैं मजशीं हटेना,
उरीं न त्याचा मज होय भार. सखे सखा कीं? सखि नाहिं; हार ९
अंगीं कसा गांठळ देखण्यांत, रसाळही फारचि चाखण्यांत,
चुंबावया पात्रचि तो सुचक्षू. सखे सखा कीं? सखि नाहीं; इक्षू १०

दासीकरीं म्यां गृहिं आणवील, सर्वांग त्यानें मम मर्दियेलें,
तत्संगमीं होय मलीन चैल. सखे सखा कीं ? सखि नाहिं; तैल ११
दाही दिशा त्याविण चित्त दोले, पुनःपुन्हा चातक जेंवि बोले,
येतां न तो होय अनर्थ दीर्घ. सखे सखा कीं ? सखि नाहीं; मेघ १२
माझ्यासवें बैसुन सर्वकाळ, वदे बहू मोहक मिष्ट बोल,
रातोत्पलाक्षी तनुकृष्णवर्णा. सखे सखा कीं ? सखि नाहिं; मैना १३
चांचल्य देहीं अतिरम्य कांती, विलोकितां नेत्र दिपोनि जाती.
तद्वाग्विनोदें मज ये न नीज. सखे सखा कीं? सखि नाहिं, वीज १४
भेटे मला येउन शीत काळीं, निशीं न सोडी मग ही सकाळीं,
वर्णूं किती ते सुख गे विशाल ? सखे सखा कीं? सखि नाहिं शाल १५
बांधा कसा सुंदर गोल नामी ! रूपास त्याच्या बहु भाळलें मी.
शोभे गुणीं शोभवि रम्य कांती. सखे सखा कीं? सखि नाहिं; मोंती १६
पोषाग नामी हिरवा अमोल, सदा विराजे मुख लाल गोल.
कंठी नवी कंठिं तशी वहावा! सखे सखा कीं? सखि नाहिं; रांवा १७
सुंदर मुख तेजस्वी सकल सुखांचें निधान किति वानूं ?
दुर्दिन त्याविण गमतो. सखे सखा कीं? सखी नव्हे; भानू १८
निजलें असतां शयनीं रात्रीं आवचीत येउनी निकट
चुंबन घे हळु गालीं. सखे सखा कीं ? सखी नव्हे; चिलट १९
जागवि सर्व निशिभर पर्यंकीं त्रासवीच येऊन.
चपल न हातीं गवसे ! सखे सखा कीं? सखी न; मत्कूण. २०
घेउनि कटिभागावर देतां कंठास घट्ट परिरंभ
बोले मंजुलवाणी सखे सखा कीं ? सखी नव्हे; कुंभ २१

स्पर्शें तनु रोमांचित करि थरथर अधर कडकडां खंडी,
करवी सीत्कार मुखें. सखे सखा कीं ? सखी न्‍हे; थंडी २२
ह्या प्रिय वसंतकाळीं व्याकुळ त्यावीण जीव मम भारी,
घडिघडि गमे वरावें. सखे सखा कीं? सखी न्‍हे वारी. २३
रिझवी रमवी शमवी रूपस्पर्शोपभोगगुण यांनीं,
रुचिर गमे मज भुवनीं. सखे सखा कीं? सखी न्‍हे; पाणी २४
झाला प्रथमचि संगम घाबरला जीव घाम डवडवुन
आला, तनुवसन भिजे. सखे सखा कीं ? सखी न्‍हे ऊन २५
गुणगणवर्णालंकृत मंजुल रसभरित बोल हर्षविता,
रिझवी पदोपदीं मन. सखे सखा कीं ? सखी न्‍हे; कविता. २६
मंजुल सुस्वर वाणी ऐकुन मद्बुद्धि तद्गुणीं मुरली,
सत्यचि सुवंशसंभव. सखे सखा कीं ? सखी न्‍हे; मुरली. २७

---

# एकनाथ अण्णाजी जोशी, करकबकर.

## तरळयाची लढाई.

[ अमझरा व धार यांच्यामध्यें तरळें या नांवाचें खेडें आहे. तेथें मल्हारराव होळकर व दयाबहादर यांचें इ. स. १७३२ सालीं घनघोर युद्ध झालें. त्यांत मल्हाररावानें दयाबहादराचा शिरच्छेद केला. तो प्रसंग खालील सुंदर पद्यांत वर्णिला आहे २१ व्या, २२ व्या, व २३ व्या पद्यांतील बुळे, लांबहाते, गावडे, वाघ, वाघमारे, फणसे, बारगळ, भागवत हीं शूर मराठे सरदारांचीं आडनांवें आहेत. यांचे वंशज इंदूर-प्रांतीं आहेत. ]

तोफा धडाडा किति गर्जतात, ढगें धुराचीं जणु दाटतात !
गोळे विजेचे जणु लोळ त्यांत, दिव्यप्रभें फार झळाळतात १
कृतांतदंडाकृति बंदुकांचे, झडोनियां फेर बहू भयाचे
असंख्य गोळ्या मग फार तप्त, पर्जन्यबिंदूसम वर्षतात २
जे दारुचे बाण बहू भयाण, ते क्रूर सर्पापरि सर्सरून
विषापरी ओकत अग्निधारा, जाती रणीं वक्रगती सरारा ३
सुतारनाले किति हस्तनाले, जेजाल यांचा रणि मार चाले.
ते रेकलेही किति ! गंजिफांचे, होतात गाडे रणि रिक्त साचे ४
होतात विच्छिन्न शिरें कुणांचीं, वक्षःस्थळें भग्न तशीं कुणांचीं.
वियुक्त होती कुणि हस्तपादीं, भाजूनि कोणी पडतात युद्धीं. ५
मी मी म्हणोनी लढणार मोठे, घोड्यांवरी स्वार असे मराठे,
फेंकीत भल्लद्युति ह्या धुमींत, सर्सावलेले जणु भासतात ६
कीं सूर्य एकेक तदा प्रतापी, अश्वावरी बैसुनि उग्ररूपी
फेंकीत नाना किरण स्वकीय, आहे निघाला लढण्यास काय ७
गर्तींत घोड्यांवरि भूमधील, ह्या वाजिचे होउनि घृष्ट नाल
खणाणसे नित्य निनाद होत, ज्या व्यक्त होती ठिणग्या रणांत ८
ऐशा प्रतीचें रण होत होत, योद्धे मराठे यवन प्रमत्त
छातीस छाती भिडवोनि होते, झुंजावया नंतर लागले ते ९
भासे तदा दोन ढगें अफाट, कीं खेळती झुंज रणीं अचाट.
कीं हस्तिचे दोन समाज मस्त, निर्धास्त कुस्ती करिती प्रशस्त १०
कीं मृत्युजिव्हा तरवार ऐशी, कोणी मराठा उपसोनि रोषीं.
जो हिंदुनारींस अविंधहस्त, गांजी तयातें उखडी समस्त ११

स्वहस्त मांडीवर थाडथाड, हाणोनि दंडाप्रत काडकाड
ठोकोनि कोणी यवनास कुस्ती, देऊनि त्याची हरि सर्व मस्ती १२
ऐसा रणीं एकसहा सपाटा, उडे विराजे विजयी मराठा.
अविंधही कंबर बांधुनीयां, झुंजे न मागें हटतां रणीं या १३
खेंकाळणें कर्कश घोडियांचें, ते नाद तैसे गजघंटिकांचे
हस्ती तसे उष्ट्र अनेक ह्यांचा, 'ची, ची' असा शब्द कठोर साचा १४
खणाखणी ती बहु आयुधांची, ती युद्धवाद्यध्वनि थोर साची.
तो 'दीन! दीन!' स्वर उच्च फार, तो शब्द तैसा 'हर! शंभु!' घोर १५
हे शब्द एकत्र मिळोनि सर्व, कल्लोळ अत्यंत असा अपूर्व
उत्पादणारा भयकंप चित्तीं, माजोनि जाऊनि जिथें सभोंतीं १६
युद्धांगणाभीतरिं मध्यभागीं, होऊनि गर्दी बहु जेथ जंगी
अत्यंत ईर्षेस चढोनि वीर, रंगांत होतें रण जेथ घोर १७
जेथें सभोंतीं उडुना धुराळा, तोंडाप्रती तोंड दिस न डोळां;
जेथें मराठे आणि ते अविंध, होते बहू एकवटोनि कुंद १८
जेथें तदा येउनि अभ्र त्यांत, होऊनि भानू बहुवेळ लुप्त
काळोख तेणें पसरोनि अल्प, येई जिथें घोर रणास रूप १९
मल्हारजीवीर तिथें प्रचंड, ठोकोनि छाती दृढ देउं तोंड
राही उभा घेउनि थोर थोर, जे जीव कीं प्राण असे स्ववीर २०
बुळे विठोजी बलभीमरूप, मल्हारजी दाशरथी समीप,
ते लांवहाते रिपुगर्वहर्ते, ते गायढे संगरकीर्ति—कर्ते, २१
ते वाघ नानापरि वर्तणारे, वाघासही मारुनि टाकणारे.
ते वाघमारे जणु भीमशौर्यें, ते गाजलेले फणसे स्ववीर्यें २२

प्रख्यात ते बारगळ प्रतापें, दुर्जेय ते भागवत स्वदर्पें,
असे असे घेउनि थोर वीर, उभा असे होळकरप्रवीर २३
उभा असे चोपित शत्रुलागीं, अविंध विध्वंसित अग्रभागीं,
ज्या शत्रुच्या येति अखंड झुंडी, चालोनियां त्यांस उदंड खंडी २४
घडोनि थोबाड, धरोनि कल्ले, दाबोनि कंठास करें स्वभल्लें
फोडी रिपूंचीं रणिं टाळकींच, कीं नारळ मेखसुनें खरींच २५
कीं मृत्युचें तीक्ष्ण नख प्रचंड, तद्भल्ल ऐसा विजयी अखंड.
करी रिपूंचीं नरडीं दुखंड, प्राशी सदा रक्त, भरून तोंड— २६
म्हणून आरक्त तदीय भल्ल, नागांतकाची जणु चोंच लाल,
कीं होउनी, नागच जे अविंध, त्यांचीं विदारी उदरें सबंध २७
संसप्तकांचा गण कीं प्रमत्त, हे म्लेच्छपक्षीय रणांगणस्थ,
मल्हारजी अर्जुन कीं द्वितीय, कापी जसा तो कडबाच काय २८
तद्भल्लसामर्थ्य असें बघोनी, तो म्लेच्छपक्षीय बहूत मानी
दयाबहादूर समीप तेथ, संतप्त चित्तांत असे बहूत २९
फोडीत मोठ्या डुरक्या गभीर, भूमी खुरानें उकरीत फार
निश्वास सोडीत बहूत थोर, पृष्ठावरी ताडित पुच्छभार ३०
कधीं कधीं थार वसंड पुष्ट, थरारवीत स्वमनांत रुष्ट
उभा जसा सांड तसाच आतां, दयाबहादूर दिसे समस्तां ३१
मल्हारजी दारुण सिंहनाद करीत होऊनि कृतांत शुद्ध,
सर्वत्र भीती पसरीत धाक, धांवे त्वरें त्यावरती विशंक ३२
दयाबहादूरहि वीर जंगी, धांवे पुढें सर्सुनि ह्या प्रसंगीं.
ते भूष्ठ दोघे मग तप्तचित्त, होती त्वरें द्वंद्वरणीं प्रवृत्त ३३
दयाबहादूर लगेच रोषीं, भिडोनियां होळकराग्रणीशीं

पाडावया त्या बहु देइ झोले, परंतु हा काय तयास तोले ? ३४
धरोनि शेंडी, असडोनि मुंडी, त्याची गचांडी धरुनी, घमंडी
हरोनि गुद्दा मुखिं त्या प्रमत्ता, देऊनि वक्षीं तशि एक लत्ता ३५
मल्हारजीवीर बलाढ्यमल्ल, सुदर्शनातुल्य अजिंक्यमल्ल
सर्वप्रदेशीं भ्रमवीत आतां, कीं होउनी कृष्णच युद्धकर्ता. ३६
घोळोनि ऐसा जणु वक्रदंत, कुस्तींत त्याचे करि वक्र दंत.
विध्वंसुनी तो शिशुपाल काय, खरा स्वभूचा शिशुपाल होय ३७
कीं कृष्ण कंसांतक भीतिदाता, कीं भीम दुःशासननाशकर्ता
दयाबहादूरविनाशकर्ता, मल्हारजीवीर तसाच आतां ३८

---

## सौ० सरस्वतीबाइ भिडे.

[ इसापाच्या जगत्प्रसिद्ध बोधप्रद व सुंदर कल्पित गोष्टींपैकीं कांहीं कवयित्रींनीं गीतिवृत्तांत रचिल्या आहेत. त्या यापुढें दिल्या आहेत.]

### १. सिंह आणि उंदीर.

सिंह गुहेमधिं निजला असतां उंदिर तयाजवळ गेला ।
बागडला सहजपणें न धरोनि मनांत लवहि शंकेला १

तेणें करून जागा झाला तो सिंह; उंदरास तयें ।
पंज्यामध्य धरिलें, भरला उंदीर हीन दीन भयें २

कोपाकुल तो सजला तेंव्हां त्या उंदरास माराया ।
परि काकुळती केली सिंहाची मूषिकें मन वळाया ३

ग्रंथ संग्रहा… नं.

" वनराज तुह्मी, क्षुद्र प्राणी मी, वधुनि मज तुह्मां यश न
मज जीवदान द्यावें, कामा येइन खरें म्हणा वचन " ४

ऐकूनि मूषकाचें भाषण आलें हंसेंच सिंहास ।
परि औदार्याचा पथ अवलंबुनि सोडिलें तयें त्यास ५

सिंहें त्यजिला मूषक गेला सुखरूप तो निजगृहास ।
आप्तेष्टांतें झाला आनंद विलोकितां परत त्यास ६

जों लोटला न यावर काळ बहुत तोंच एकदा रानीं ।
भक्ष्यार्थ सिंह फिरतां पडला पाशीं, न आपदा सानी ७

पाशामधुनि सुटाया बहु धडपडला परी न तो सुटला ।
तो क्रुद्ध गर्जला बहु तेणें भूभाग सर्व हादरला ८

ऐकुनि ओळखुनि ध्वनि मूषक तेथें कृतज्ञ तो आला ।
सुटका क्षणांत करितो ह्मणुनि दिला धीर थोर सिंहाला ९

मग दोऱ्या कुरतुडुनी सोडविला सिंह मूषिकें त्वरित ।
उपकाराची केली फेड अशी मूषिकें तयें विहित १०

बालांनो, ह्या गोष्टीपासुनि सारांश हाच निघत असे ।
थोरांस लहान तसे थोर लहानांस सुखद होति जसे ११

रावास रंक तैसा रावहि रंकासि होय उपयोगी ।
तो ह्यास हा तयास त्यजुनि कधींही न शांति सुख भोगी १२

हा क्षुद्र कसा प्राणी येइल कामास ही वृथा शंका ।
झिडकारोत अबुध परि बुध नचि झिडकारिती कधीं रंका १३

## २. ब्रह्मदेव आणि उंट.

ब्रह्माची काकुळती करुनि असं उंट बोलला त्यातें ।
" शिंगें बैलास दिलीं त्वां तेंवि दिलीं न का प्रभो ! मातें १
शत्रूपासुनि रक्षण व्हाया साधन नसे मुळींच मला ।
बैलास दाविली त्वां तेंवि कृपा दाविली न कां मजला ? " २
ब्रह्मा कोपूनि असें वदला, " मज निंदितोस तूं वाया ।
कान तुला लांब दिले शत्रूची हालचाल ऐकाया ३
मी देणग्या न साऱ्या प्रत्येकाला समर्पिल्या जाण ।
एकचि एकास दिलें साधन रक्षावया निज प्राण ४
तूं पशु अतृप्त यास्तव इतरांहुनि अधिक मागसी म्हणुनी ।
दंडार्थ तोकडे मी करितों तव कान आजपासोनी." ५
दाता विचारपूर्वक दे जें त्याहून अधिक मागे तो ।
दात्याला कोपवुनी आहे त्याहुनि उणें करुनि घेतो ६

---

## ३. कावळा आणि कोल्हा.

मुखिं धरुनि मांस कोणी उडुनि द्रुमशिखरिं कावळा बसला ।
इतुक्यांतचि तो एका कोल्ह्याला दैवगतिमुळें दिसला. १
त्यातें त्या कोल्ह्यानें फसवायाचा विचार मनिं केला ।
मूर्खातें अवलोकुनि योजिति जे धूर्त ते प्रशंसेला. २
वदला कोल्हा ऐसें तेंव्हां त्या कावळ्यास पाहून
" मित्रा ! मज नाढळला पक्षी जो अधिक रम्य तुजहून. ३
तुजला बघतां बघतों वाटे विधिसृष्टिचें सकल विभव ।

तव मान, पंख, चंचू, अवयव सारे प्रमाणशुद्ध तव. ४
चुबुळ तुझें तेजस्वी, गोंडस तव दे रुचिर मृदु भारी !
सारांश कीं रि, वा मित्रा ! तूंच बहु मनोहारी ५
सुंदर तव देह तसा मधुर स्वर तव असेल हें खास।
यास्तव करोनि गायन माझ्या आनंद देच कानांस" ६
ऐकुनि अशी प्रशंसा चित्तीं तो मूढ कावळा हंसला।
तो देहभान विसरुनि गायाला मूर्ख सुखभरें सजला ७
परि "काव ! काव !" करितां तन्मुखिंचा मांसखण्ड भुवि पडला।
तो उचलुनियां कोल्हा गेला हर्षे मनामधें भरला. ८
बालांनो ! ह्या गोष्टीपासुनि घ्या मूल्यवंत बोध असा
साधाया निज कार्या स्तवितात लबाड, परि तयां न फसा ९

---

## ४. प्रतिबिंब पाण्यांत पाहणारें हरिण.

जल पित हरिण असतां प्रतिबिंब विलोकिलें तयें त्यांत
पाहुनि शिंगें त्याचा मावेना हर्ष थोर गगनांत १
परि मळके बारिकसे पाय बघुनि दुःख जाहलें त्यास
तेव्हां काकुळतिनें तो हें वदला मनांत देवास २
" माझ्या सौंदर्याला आणिति हे बहु उणेपणा पाय
ओबड धोबड बारिक हें घेउनि पाय मी करूं काय ? ३
शिंगांचेपरि देशिल पाय मला जर मनोहराकार
तर जन्मोजन्मीं तव देवा ! विसरेन मी न उपकार " ४
हे त्या हरिणाचे मनिं घोळत होते विचार इतुक्यांत

मृगया करावयास्तव आले ह्या दुष्ट भिल्ल रानांत ५
शर सूं सूं शब्द करुनि तेथें शतसंख्य लागले याया
भ्याला हरिण पळाला वायुगतीनें शरांस चुकवाया ६
हां हां म्हणतां गेला दूर जणों काय चमकली बिजली
परि वेलीमधिं शिंगें गुंतुनि त्याची समस्त गति खुटली ७
मागूनि भिल्ल आले त्यांनीं धरिला हताश तो प्राणी
चिरिला कंठ तयाचा, मरतां तो हा विचार मनिं आणी ८
" वाईट पाय माझे आले कामास भिल्ल टाळाया
परि सुंदर शिंगांस्तव मुकलों प्राणास शिणुनि मी वाया ' ९
बालांनो, न भुलावें सौंदर्या, तो खराच हृद्रोग.
वस्तूच्या सौंदर्याहुनि जाणा अधिकमूल्य उपयोग १०

---

## ५. दोन कुतऱ्या.

कोणी कुतरी वदली काकुळती करुनि अन्य कुतरीला
" मी व्याया झालेली, माझें घर योग्य न प्रसूतीला १
यास्तव तुझें घर मला दे कांहीं काळ तरि रहायातें ।
महिना भरतांच तुझें परतुनि देईन गे ! घर तुला तें " २
शेजारधर्म बघुनी स्वगृह रिकामें इणें दिलें करुनी
झाली तिची प्रसूती, महिना गेला तयावरी भरुनी ३
तेव्हां धनीण वदली हें बालवतीस वचन विनयानें
" मज हर्ष होइ बहु तूं हातीं पायीं सुखें उतरल्यानें ४
शेजारधर्म आणुनि मनिं उपयोगास मी तुझ्या आलें

मज पुण्य लागलें, तव सहजासहजींच कामही झालें ५
आतां कृपा करुनि मम देइं रिकामें करून घर मातें "
ऐकुनि हें वच वदली बालवती तीस ह्यापरि वचातें ६
" माझीं लहान पिल्लें, त्यांना घेऊन जाउं मी कोठें ?
दुसरा महिना दे मज, होतिल उपकार गे ! तुझे मोठे " ७
घरधनिण भिडस्त, तिणें दुसराहि दिला रहावया मास
मग पुनरपि मागितलें तीणें घर न त्यजून विनयास ८
तेव्हां ती व्यालेली कुतरी होऊनि कुपित हें वदली
" हें माझें घर, येथें राहतसें मीच, सांग तूं कुठली ? ९
माझ्या घरापुढें कां कटकट करिसी ? इथून कर काळें,
तुझिया ओरडण्यानें मम घाबरतील लाडकीं बाळें " १०
भाळुनि मृदु वचना गृहिं थारा देणें परास उचित नसे;
कीं बहुधा बळकावुनि तो तें स्वामीच मी म्हणूनि बसे ११

---

## ६. बकरीनें पाळिलेलें मेंढरूं.

पोरास मेंढराच्या बकरीनें पाळिलें दया करुनी
कीं तन्मातेनें तें होतें टाकुनि दिलें दया त्यजुनी १
एके दिवशीं बकरीसंगें वनिं तें चरावया जातां
चिडवूनि लांडगा हें वदला त्यातें,"तुझी न ही माता २
माता तुझी खरी जी ती आहे बघ समोरच्या रानीं
जा तिजकडे, तुझी ही कोणीच न,सत्य मद्वचन मानीं "३
ऐकूनि लांडग्याचें वचन असें मेंढरूं तया वदलें

"पालन पोषण करि जी ती माता हेंच तत्त्व कथिति भले ४
जन्म जिणें मज दिधला ती असुनि नसून सारखी मातें
मजवरि न प्रेम जिचें मातृत्वाचें न तिज सजे नातें" ५
पुत्र भजति त्यां पितरां जीं पुत्रविषयक कारिति कर्तव्यें
पितरां पुत्र न मानिति जर पुत्रांचें न कारिति तीं भव्यें ६
जनहो ! पुत्रविषयकें कर्तव्यें जागतीं मनीं ठेवा
केल्यानें कर्तव्यें लाभेल तुह्मांस शांतिचा ठेवा ७

---

## ७. लांडगा आणि धनगर.

एका उत्सवसमयीं मौजेनें जुळुनि लोक वाड्यांत
बकऱ्याच्या मांसाचीं खाद्यें होते अनेकविध खात १
दूरुनि रंग बघुनि तो एक मनीं लांडगा असें वदला
"न्याय नरांचा पाहुनि आश्चर्य अनल्प वाटतें मजला २
पोटास्तव एकहि मी बकरें वधितां कसे जळति नर ते.
परि चैनीस्तव अगणित तन्मन बकरीं न वधुनि हळहळते ३
जो न्याय ते स्वतांतें लाविति तो लाविति न परातें ते
हा पक्षपात बघतां क्रोधाची तीव्र लहर मज येते" ४
हें वदुनि लांडगा तो गेला तेथुनि निघोनि रानांत
इकडे वाड्यामध्यें होते नर दंग सुखविलासांत ५
बालांनो ! ह्या गोष्टीपासुनि ठसवा मनांत हा बोध
पाप समर्थ करी परि तें जन करितां तयास ये क्रोध ६

---

## ८. दोन भांडीं.

मातीचा एक, दुजा तांब्याचा घट असे जलीं दोन
वाहत होते गोष्टी अन्योन्यांसह मनोरम करोन १
चढला रंग खरोखर बहुविध संभाषणास त्यांच्या या
तेव्हां प्रेमें मित्रा तांब्याचा लागला घट भिडाया २
त्यास निवारुनि वदला मातीचा घट तदा बहु प्रणयें
"आपण मित्र प्रेमळ,तरि दूरुनि बोल मजसि जवळ न ये ३
मी तुजला भिडलों कीं तूं मज भिडलास तरि विनाश मम
मैत्री टिकेल चिर जर दूरत्वाचा करीन मी नियम" ४
तात्पर्य कीं समर्थासह अतिमैत्री शमा सुखा नाशी
जुळल्यास करा मैत्री, परि जपुनि असा सदा समर्थाशीं ५

---

## ९. मुंगी आणि खबूतर.

बहु तान्हेली मुंगी गेली जल प्यावया नदीतीरीं
तेथें दुर्दैवें ती पाय सरुनि वाहली तदा नीरीं १
तीचें संकट पाहुनि तटतरुवरचा कपोत हळहळला
तरुपर्ण खुडुनि त्याणें व्हाया आधार टाकिलें तिजला २
ह्या पानावर मुंगी होवोनी हृष्ट फार मनिं बसली
परि त्या पक्ष्याच्या ती उपकारा हर्षभरिं न विस्मरली ३
तेथुनि वायुबळानें तीरा पानावरूनि ती आली
तिज सुखरूप विलोकुनि हृष्ट तिची मित्रमंडळी झाली ४
एके दिवशीं आला वनिं फासेपारधी खग वधाया

शर कर्मधर्मयोगें त्याणें खर रोंखिला कपोता या ५
इतुक्यांत तीच मुंगी डसली येऊनि धनुर्धरपदाला;
चळला शर, परिसुनि तो पाक्षि टणत्कार तेथुनि उडाला ६
व्हा बालहो ! कपोतापरि सिद्ध करावयास उपकार;
जरि नसले मुंगीपरि ते फेडायास सिद्ध नर फार ७

---

## १०. राजा मागणारे बेडूक.

तप उग्र बेडकांनीं आचरुनि विधीस फार तोषविलें !
'वर मागा' हें विधिनें ह्मणतां 'नृप द्या अह्मां' असें कथिलें
ही प्रार्थना परिसतां विधि हासुनि बोलला तयां वचन।
'नृप हो तुम्हां कशाला? परि जर हावा असेंच तर घ्या हा'
ऐसें वदूनि विधिनें काष्ठाचा खंड त्यां दिला एक।
तो लांब, रुंद, मोठा नृप पाहुनि हर्षले तदा भेक ३
परि निर्जीव, अचल तो, झाला नृप पात्र तत्तिरस्कारा !
प्रार्थुनि विधीस पुनरपि वदले ते करुनि त्या नमस्कारा ४
'हा नृप निर्जीव नको, मानूं उपकार जर दुजा द्याल'।
ऐकूनि याचना ही विधिनें नृप त्यां दिला महाव्याल ५
येतांच त्या नृपानें केला आरंभ बेडका खाया !
लाहोनि खाद्य रुचिकर व्यालाची पुष्ट जाहली काया ६
अनुतप्त बेडकांनीं 'पाहिला नृप द्या' असें विधिस म्हटलें।
परि तो कोपुनि वदला, 'मौर्ख्याचीं अनुभवा कठोर फळें' ७

तात्पर्य, हें मुलांच्या चित्तामध्यें अमोलिक ठसावें ।
आहे जी स्थिति तींतच मानुनि संतोष आपण असावें ८

---

## ११. पोट आणि अवयव

एके समयीं झाले अवयव पोटावरी सकल कुपित ।
ते वदले कीं ' करणें सर्वांनीं काम सारखें उचित १
आह्मी कष्टावें, सुख पोटानें स्वस्थ बसुनि सेवावें
हें न्यायाला न जुळे, या उपर तरी असें न चालावें' २
ऐसा करून निश्चय हातांनीं काम सोडिलें करणें ।
डोळ्यांनीं पायांनीं सोडून दिलें विलोकणें फिरणें ३
ह्या रीतिनें सगळीं देहाचीं स्तब्ध जाहलीं कामें ।
पोटास न अन्न मिळुनि तें बसलें स्वस्थ निष्क्रिय रिकामें ४
पोषक न द्रव्य मिळुनि सारे अवयव सुकून ते गेले ।
देहास दैन्य आलें कीं केवळ चर्म अस्थिवरि ठेलें ५
ऐसें झालें तेव्हां अवयव अनुताप पावले फार ।
त्यांना कळलें कीं हा झाला निजहानिहेतु अविचार ६
कळलें तयांस कीं हें इतरांपरि काम पोटही करितें ।
ठसलें तन्मानें कीं हें गात्रां गात्रांत अन्नरस भरितें ७
पोषितसों आपण त्या तैसें तें आपणांस पोषितसे ।
यास्तव त्याचेवरती केला जो राग तो न योग्य असे ८
ही गोष्ट सकल तुमच्या चित्तीं जर बोध खोल हा जाई ।
जो पोषितो तयाचीं व्हावें कामें करून उतराई ९

---

## १२. मोराचीं पिसं लावणारा डोंबकावळा.

पंखांत पिसें रोवुनि मोरांचीं डोंबकावळा सजला
" झालों मी मोर " असें मानुनि तो डौल करुनि बागडला १
स्वजना तुच्छ करुनि तो गेला मोरांचिया समाजांत
मोरांची रीति धरुनि झटला साजावयास मोरांत २
परि आगंतुक पक्षी मोरांनीं तो क्षणांत ओळखिला
कृत्रिम उपटोनि पिसें अवमानुनि दूर हांकलून दिला ३
मग डोंबकावळा तो दुःखानें निजजनांकडे गेला
परि तो तद्वाक्शल्यें मेल्यापेक्षांही जाहला मेला ४
बालांनो, ह्या गोष्टीपासुनि उपदेश हा असा घ्यावा
स्वजनास न सोडावें, न पराचा भरंवसा क्षण धरावा ५
जे देशबांधवांतें, सोडुनि पाहाति परां धरायास
त्यास न मिळतो थारा, मिळतो केवळ तयास उपहास ६

---

## १३. सिंह आणि दुसरे पशु.

वनराज करार वनीं करि कोल्हा तरस लांडगा यांशीं
कीं कोणा कांहिं मिळो खाया द्यावा समांश चौघांशीं १
एके समयीं वधिलें भक्ष्यास्तव हरिण एक चौघांनीं ।
केले चार तयाचे कोल्ह्यानें भाग सम तया स्थानीं २
तेव्हां सिंह वदे कीं, " चौघांचा सख्यसमय जो ठरला
त्या अन्वयें तुह्मी हा आपण होऊनि द्याल भाग मला ३
हा दुसरा भाग असें स्वामी तुमचा म्हणूनी माझाच, ।

मी प्रिय मान्य तुह्मां, कीं स्वामीहि असून मी न करिं जाच ४
हा तिसरा भाग तुम्ही मम विक्रममूल्य म्हणुनि मज द्याल ।
विक्रम नसला माझ्या अंगीं तर काय तुम्हि करुं शकाल ? ५
चवथा भाग सख्यांनो ! हा माझ्या संग्रहास ठेवीन ।
दुर्भिक्ष्यसमयिं त्याचा लाभ तुम्हां मी अवश्य देईन" ६
ऐसें वदोनि सिंहें चारी बळकाविले अहो ! भाग ।
तन्मित्रां मनिं आला परि उघड न दाविला तयीं राग ७
बालांनो ! बलवंता वाटे न करार लंघितां खंत ।
पाळी वा लंघी वा स्वार्थपरायण करार बलवंत ८
अवलांचा बलवंतासंगें न टिके करार बहुकाल ।
बलवंत निज हितास्तव अबलांचें नाणितो मना हाल ९

---

## १४. कोल्हा आणि सिंहीण.

कोणी कोल्ही वदली वचन असें सिंहिणीस पाहून ।
"तूं एकच पोर विसी मम संतति अधिक बाइ ! तुजहून" १
कोल्हीस सिंहिणीनें उत्तर हें शांति न त्यजून दिलें ।
"मान्य असे मजला तव भाषण, तूं प्रसवतेस अधिक पिलें २
मी एकच पोर वितें, परि म्हणाति तयास लोक मृगराय ।
न सुतांच्या संख्येनें, गुणवत्तेनेंच धन्य हो माय" ३
बालांनो ! गोष्टींतिल हें तत्त्व मनीं स्मरा अहोरात्र ।
संख्या न आदराला, गुणवत्ता मात्र होतसे पात्र ४
ती धन्य माय म्हणिजे सुत एकच जीस परि सुगुणशाली ।

बहुत कपाळकरंटे प्रसवुनि सुत माय धन्य नचि झाली ५
गुणवत्ता संपादुनि बालांनो, मेळवा यशास जनीं ।
भूषित करा कुलाला, धन्य प्रसवुनि तुह्मांस हो जननी ६

---

## १५. खेकडी आणि तिचें पोर.

एके समयीं पोरा वच कोणीं खेकडी असें वदली, ।
'गति सरळ कां न धरिसी? सोडुनि दे वक्र तूं गती असली' १
तेंव्हां मातेस असें वदलें तें पोर फार विनयानें, ।
" ज्या गतिनें तूं चालसि ती मी शिकलों तवानुकरणानें २
चालुनि दाव सरळ गति म्हणजे मीही तसाच चालेन ।
मातापितरांचें मज करितां अनुकरण दोष लागे न " ३
जी मातापितरांची वर्तनिं भाषणीं दिशा मुलें बघतीं ।
तीच दिशा मोठेपणीं सहजासहजींच तींहि अनुसरतीं ४
मातापितरांनीं जर घालून दिला स्वयें पवित्र धडा ।
तर तो गिरवितिल मुलें सृष्टीचा हा असे नियम उघडा ५

---

## १६. लोणारी आणि परीट.

आपुलिया खेड्याहुनि मोठ्या शहरास एक लोणारी ।
गेला, त्याची आशा कीं येथें मज मिळेल धन भारी १
येथें धन त्यास मिळुनि थोडेंसें सांचलें तयापाशीं ।
यास्तव घरदार करुनि तो झाला येथलाच रहिवाशी २

यावर कोणी त्याचा गांवकरी परिट त्याच शहराला।
चरितार्थ करायाच्या उद्देशानें तयापरी आला ३
तो कर्मधर्मयोगें ह्या लोणाऱ्यास एकदा दिसला।
तेव्हां प्रेमभरानें त्यांणीं पुशिलें परस्परां कुशला ४
मग लोणारी वदला परटास, "रहावया मम घरांत
ये, माझें घर मोठें, संकोच करूं नको लव मनांत ५
त्याला परीट वदला, "हे तव उपकार थोर मजवरते।
कीं देसि घर मला; परि धर्मास नको तुझें मला घर तें ६
मित्रत्व असो अपुलें, परि सहवासास तूं न मज उचित।
मी स्वच्छ करिन पट तें क्षणमात्रें मळविसील तूं खचित" ७
बालांनों ? बोध ठसो हा कीं कामास नित्य येईल।
संगति अयोग्य करणें न जुळे जर चालरीत कुलशील ८

---

## १७. दुखणाईत गीध.

म्हातारपणीं कोणी दुखण्यानें गीध पीडिला फार।
निजकर्म आठवुनी कालवला तो मनांत बहुवार १
तेव्हां आईस असें वदला तो "नवस करुनि देवास
घालूनि भीड वळवीं पुनरपि आरोग्य मजसि यायास" २
आइ म्हणे "रे बाळा ! न करील तुज क्षमा कधीं देव,
हिंसा केल्या त्वां बहु आला होता तुला जणों चेव ३
बहु दुष्कर्मं केलीं त्वां बाळगिला न विधिनिषेध लव
देवार्पित बलि खातां पुत्रा, मति कचरली कधीं न तव ४

कृतकर्माचा तुजला पश्चात्ताप न कधीं मुला ! झाला
तर सांग कोणच्या मी तोंडानें विनविणार देवाला ? ” ५
बालांनो ! तरुणपणीं पापाचार त्यजा जणों साप.
पाप करायाचें बल सरतां वार्द्धकिं फळे न अनुताप ६

---

## १८. तान्हेला कावळा.

प्यायास कावळा जल बघतां दिसलें तया सजल पात्र
जल खोल; त्यास त्याची पोचेना चोंच कष्टलें गात्र १
प्यायास तयें जल तें बहुविध केले उपाय परि फसले;
मग ही तयें लढविली हिकमत शोधोनियां स्वबुद्धिबलें २
जलिं चंचुनें तयानें बारिकसे टाकले अनेक खडे
त्यायोगें पात्राच्या जल तें वर ठेपलें चढोनि कडे ३
मग कावळा सुखें जल पिडानि उडाला तदिष्ट देशास
व्हा न निराश मुलांनो ! युक्ति करुनि मेळवा स्वसाध्यास ४

---

## १९. टकल्या.

टक्कल झांकायास्तव टकल्या शिरिं एक टोप घालितसे,
ह्या टोपानें त्याच्या शिरिं दिसले केश दिसाति सत्य जसे १
एके दिनिं मित्रांसह टकल्या मृगयेस विपिनिं गेला हा
तेथें वाहुटळीनें टोप उडविला शिरावरुनि हा ! हा ! ! २
टक्कल उघडें पडतां पोट धरुनि मित्र हासले त्याला.

परि ह्या उपहासानें टकल्या लज्जित मनीं न लव झाला ३
मित्रांवरि ताण करुनि टकल्या हांसुनि असें तयां वदला,
'मत्केशांनीं त्यजिलें,मग कां परकेश न त्यजोत मला ?'४
दिसतां उणें पराचें जन निर्दय हासती कुटिल भावें
परि न चिडावें आपण,त्यांच्याहुनि अधिक आपण हसावें!५

2580

## २०. नाचणारा उंट.

एके समयीं जुळले बहुविध वनपशु सभाप्रसंगानें,
सरलें काम सभेचें होउन निर्णय तदा बहुमतानें १
मग रमवायास्तव त्या स्थळिं माकड नाचलें विविधरीती.
नृत्य असें अवलोकुनि सकल सभा पावली सुख अती ती२
त्यावर ताण करावी ऐसें उंटाचिया मनीं आलें,
केलें नृत्य तयानें उचलुनि वरि पाय चार सगळाले ३
अवजड तनु, बोजड कृति, पात्र कसा होउ तो न उपहासा?
हसले पशु त्याला तो झाला त्या समयिं उंट मेलासा ४
एकास साधलें तें साधेल दुजास हा नसे नेम.
हें तत्त्व व्यवहारीं, बाळानों, अनुसरा, तयें क्षेम ५

## २१. डुक्कर आणि घोडा.

कोणी सूकर तरुवर रद घासुनि तीक्ष्ण ते करित असतां
वदला तुरग तया, "मज येइ हसें तव बघून बालिशता १

रिपु न उपस्थित येथें, नर वा हरि वा न येथ वा दूर
 रद घासुनि कां श्रमसी ? सेतु नदीवर वृथा नसुनि पूर २
वदला सूकर तुरगा, " आधीं चिंतिति उपाय बुध सकल
 संकट ओढवल्यावर तत्प्रतिकारीं प्रयत्न तो विफल ३
मजवर रिपु आल्यावर मज रदघर्षणि मिळेल न क्षण गा,
 यास्तव या अवसरिं मी सिद्ध करुनि शस्त्र ठेवितों तुरगा" ४
बालांनों ह्या गोष्टीवरुनि अशी शुभकरी स्मरा उक्ति
 अवसर असतां भावि स्थिति सुखकर व्हावया करा युक्ति ५.

---

## २२. किरडू आणि कानस.

भक्ष्यार्थ लोहाराच्या शिरलें किरडू कुणी दुकानांत.
 तेथें इकडे तिकडे फिरलें तें विविध वस्तु पाहात १
पाहुनि कानस खाया तें किरडूं लागलें मुखिं धरून.
 तेव्हां कानस वदली, "किरडा, कां दांत घेसि पाडून? २
मी ज्यास त्यास खातें, मज खाया बल नसे कुणा रेस.
 कां दांत घेसि भंगुनि ? जाऊं माझ्या नकोच वाटेस " ३
बल पाहूनि पराचें मग करणें लगट योग्य त्यासंगें
 स्वपर बलाबल नेणुनि बलवंता डवचि तो, स्वयें भंगे ४

---

## २३. कोल्हा आणि बोकड.

तान्हेनें व्याकुळसा कोल्हा विहिरीस प्यावया जल ये ।
 परि जल हाता ये ना ह्मणुनि उडी घातली अशंक तयें ॥ १

जल पिऊनि जाहल्यावरि वर येण्याचा विचार त्या पडला ।
श्रमला यत्न करुनि बहु परि त्यास उपाय मुळिं न सांपडला २
इतुक्यांत तेथ आला बोकड जल प्यावयास दैवानें ।
तो कोल्हयाला वदला,“ झाली का तृप्ति येथिल जलानें” ३
कोल्हा म्हणे तयाला, “ मित्रा ! येथिल जलास मी भुललों ।
येथील पाणि प्याया घर सोडुनि दोन दिन इथें रमलों ” ४
ऐकुनि ऐशा वचना गेला बोकड तळास विहिरीच्या ।
आला बोकड पाहुनि हर्ष न मावे मनांत कोल्ह्याच्या ५
मग बोकडाचिया तो कोल्हा पाठीवरोनि वर आला ।
येऊनि त्यास हांसत वदला, “ जातों सख्या ! मम गृहाला ६
ही गोष्ट बोध करिते जो व्यवहारीं मनांत राखावा ।
साधाया स्वार्था खल पाडिति संकटिं परा करुनि कावा ७

---

## २४. कुतरा आणि त्याचें प्रतिबिंब.

मुखिं धरुनि भाकरीचा तुकडा जातां नदी तरुनि पार ।
कुतरा कोणी जळिं निज बघुनि प्रतिबिंब हर्षला फार १
“ मजसा हाही कुतरा जात असे स्वमुखिं भाकर धरोन ।
त्याची भाकर मिळतां खाइन मी भाकरी अहो ! दोन” २
ऐसा विचार करुनी तोंड तयें वासिलें सुखभरांत ।
परि हाय ! हाय ! ! त्याची भाकर पडली गळोनि पाण्यांत ३
बालांनो ! ठसवा हा चित्तीं सारांश ह्या कथेंतील !
अतिलोभें धन न नवें येइल हातीं जुनेंहि जाईल ४

## २५. कस्तूरीमृग.

कस्तूरिका मिळाया गांवांतुनि बहुत पारधी आले ।
बघतां कस्तूरीमृग त्यांनीं त्यावरि उगारिले भाले १
शत्रूंसि पाहतां क्षणिं तो मृग अतिशय मनामधें भ्याला ।
तेव्हां स्वरक्षणास्तव तो मृग योजी तदा उपायाला २
तो मनिं म्हणे ' मजवरी कस्तूरीस्तवचि दुःख ओढवलें ।
ती टाकून दिल्यानें हें दुःख अहो टळेल मजवरलें' ३
ऐसें चिंतुनि त्यानें कस्तूरीत्याग त्या स्थळीं केला ।
निर्भय होउनि ऐसा तेव्हां मग आपुल्या गृहा गेला ४
बालांनो, गोष्टीचा भावार्थ असा मनामध्यें ध्यावा ।
जी वस्तु घालि संकटिं लोभ तिचा मानसा नसो द्यावा ५

---

## २६. रानडुक्कर आणि गाढव.

एके समयीं अवचित अवलोकुनि विपिनिं रानडुक्करास ।
गाढव मूर्ख तयाशीं सलगीनें लागला वदायास १
पाहून गाढवाची सलगी तो डुक्कर कोपला फार ।
तन्मनिं तत्क्षणिं आलें घ्यावा याचा बरा समाचार २
परि करुनि विवेक तयें निज कोपा तत्क्षणींच आवरिलें ।
मग धिक्कारुनि त्यातें वदला, " जा, तुजसि जीवदान दिलें ३
रे ! तुज सोडुनि देतों, जा प्राण तुझे असून मदधीन ।
मी तव रक्तानें मम दाढ विटाळुनि कधीं न घेईन " ४
बालांनो, घ्या हा ह्या गोष्टीपासून बोध साचार ।
वागे थोराशीं जो सलगीनें होइ तत्तिरस्कार ५

## २७. बेडूक आणि दोघे बैल.

कळपांत म्होरकेपण ऐसें वैभव मिळावयासाठीं ।
वनिं दोन बैल भांडत होते एक्या तळ्याचिया कांठीं १
तें बघुनि एक बेडुक घाबरुनी बोलला दुजास असें ।
"हा कठिण आपणावर ओढवला काळ खचित आज असे २
घोर भयंकर चालत आहे हें युद्ध बघ इथें जवळ ।
नकळे होइल अपुली गति कैशी. होउं काळमुखिं कवळ" ३
धिक्कारुनि त्यास वदे दुसरा बेडूक "तूं खरा भितरा ।
भांडोत ते परस्पर, न उपद्रवितील खास ते इतरा ४
त्यांच्या वाटेस न जर गेलों तर आपणास भीति नसे ।
भांडण चालो तिकडे येथें तूं त्यजुनि भीति शांत बसें" ५
त्याला पहिला वदला, "लढतांना जर इथेंच ते आले ।
तर त्यांच्या पायांनीं आपण चिरडून जाउं सगळाले ६
यास्तव अपुलें रक्षण व्हाया केलीच पाहिजे युक्ति ।
संकट खरें असे हें, खोटी माझी नव्हेच ही उक्ति" ७
ह्या गोष्टीपासुनि जो घ्यायाचा बोध तो ठसो स्थिर हा ।
होतेच लहानांची थोरांच्या भांडणांत हानि महा ८

---

# शिवराम महादेव परांजपे.

### जलदागम.

हा पयोद गगनांत गर्जतो,
फुल्ल होय विपिनांत सर्ज तो.

अबुद प्रचुर अंबु वर्षती,
    मानसांतरिं मयूर हर्षती. १
रंगभूमि नभ, वीज नाचते,
    कोण वर्णु शकणार नाच ते !
मेघ तैं मृदु मृदंग वाजवी,
    तो प्रसंग मानिं मोद माजवी. २
भृंगांचिया व्याकुलिता कुलांनीं
    वेली पहा या फुलल्या फुलांनीं.
कादंबशीर्षीं मुकुलावलीला
    सेवूनि दावीति अपूर्व लीला ३
दावदग्ध गतजीव जीं वनें
    सिंचिलीं अमृततुल्य जीवनें.
शुष्क काष्ठ नव पल्लवें लवे
    ईश्वरी कृति कुणा न वर्णवे. ४
त्याज्य होति पथ हे चिखलानें
    साधु दूषित जसेचि खलानें.
गर्जताति बहु दर्दुर गानीं
    सोडिलें स्वबिल तैं उरगांनीं. ५
रंगवूनि बहु हें बहुरंगीं
    ठेविलें कुणिं नभोंऽगणरंगीं;
जानकी फिरुनि राघवराया
    चित्तिं इच्छि आजि काय वराया ! ६
शैव हें न धनु ऐंद्र धनुष्य

मोहती बघुनि ज्यास मनुष्य;
भग्नशंकरधनुःस्वन हा न
गर्जतो गगनिं मेघ महान. ७
भृंग कुड्मलभरें लवलीला
हा कठोर लववी लवलीला.
दाविली कधिं दया मधुपांनीं
कामिनीवदनिंच्या मधुपांनीं ८
ग्रीष्मातपें तृषित भूमिस नीरदानीं
दावीयली सदयता अति नीरदांनीं.
कीं पाणपोय जणुं घातलि देवतांनीं
प्यावें जिथें जल मुदें तरुंनीं लतांनीं. ९
स्पर्श होति जंव या पवनाचे
नर्तकीपरि लता तंव नाचे.
धर्म येइ नटनें श्रमलीला,
होइ वर्षजलविभ्रमलीला. १०
सभोंवार दावाग्नि पेटे सदाही
वरूनी रवी उग्र शीर्षासि दाही.
अशा सेवुनीयां तपा शैलराज
व्रतांतीं करी स्नान हा काय आज ! ११
शुष्का करांहिं करणेंच धरा जयांला
कोंडोनि त्या घन तमीं दिनराजयाला.
देवर्षि भूमितलिं या सकलोन्नतातें.
धाराजलांहिं अभिषेकिति भूभृतातें. १२

# केशव विश्वास फणसे.

## १. निर्यमक कवितेचा अर्ज.

### ( शार्दूलविक्रीडित. )

सारे सुज्ञ रसज्ञ आज जमलां साहित्यसंमेलनीं ।
युष्मद्-दृष्टिसमोर निर्यमक मी आहें उभी या स्थळीं ॥
सांगा सत्य तरी विशोभित खरी मी वाटतें का परी ।
ऐकाया तुमचा विचार बहु मी उत्कंठ आहें अजी. १
प्रासांचा मज जाच तो न गमतो, ते होति कीं ऐच्छिक।
होताती मज शृंखलाचि यमकें आवश्यकत्वास्तव ॥
इच्छेनें मज वाटतील जितके जे जे बरे दागिने ।
ते ते घेइन तेवढेचि, हठ कां दावा विशिष्टीं नगीं ? २
गीर्वाणी मम जन्मदाहि यमकांवांचूनि रम्या दिसे ।
कां मी मात्र असुंदरा अरुचिरा वाटे रसज्ञां जनां ?
दोषी लेश नसेचि निर्यमकता, कर्णांस दोषी म्हणा, !
रूढिग्रस्त समस्त लोक म्हणुनी ते दूषिताती मला. ३
ती ‘ केकावलि ’ संस्कृतीं अयमका कां रम्य रूपान्तरें ?।
एकीला यमकें, दुजीस नलगे आवश्यकी कां बरें ? ॥
कानाला सवयी अनिष्ट जडल्या त्या पाहिल्यावीण कीं ।
कां रीति नव दूषितां बसवुनी रूढी जुनी मस्तकीं ? ४
अंबाडा वरिती स्त्रिया त्यजुनियां वेणीस चक्राकृती ।
घेती सुंदर पोलका बघुनियां लाजेस चोळी थिटी ॥

लेणें नाजुक घालती त्यजुनियां त्या लठ्ठ गोठांप्रती ।
सारासार विचार मींच मम कां दावूं नये संप्रती ? ५
जैशा सांप्रत सांखळ्या न रुचती बायांस त्या बोजड ।
तैशी ही यमकावलीहि चरणीं माझ्या रुते संतत ॥
जाणा ज्यापरि जोडवीं, यमकही एकाक्षरी त्यापरी ।
पादान्तां करिती कधीं मलिन तीं दोन्हींहि थोडें तरी ६
जैशा कर्मठ बायका निशिदिनीं प्राणाधिकालंकृती ।
सोसें साहति सांखळ्याहि जड त्या, कीं जोडवीं घालिती ॥
तैशा रूढिवशा विवेकविधुरा कांहीं कवींच्या मती ।
सोसानें गतिरोधकारि यमकां अत्याग्रहें सेविती ७
वैदर्भी शुभ रीतिला, गुणरसां कीं रम्य अर्थांप्रती ।
पाशांनीं यमकांचिया सुकतसे सद्वृत्त सुश्लोक ही ॥
**पुण्यश्लोक** सुवृत्त जेंवि सुकला तो अक्षपाशोत्सवीं ।
**वैदर्भी**दायिते प्रती, निज सुखा, संपन्न राज्याप्रती ८
होत्यें निंदित मी अनाथ विजनीं त्या **एकनाथें** परी– ।
धैर्यें शीघ्र सनाथ कीं करुनियां प्रेमें जनीं आणिली ॥
**नागेशा**दिकही मदीय असती ते पाठिराखे जगीं ।
माझे भक्त न होति काय आजि ह्या साहित्यसंमेलनीं ? ९
होती व्यर्थ अवाळुतुल्य यमकें श्रीमम्मटाच्या मतें ।
नाशा हीं यमकें झणी श्रमबलें, शस्त्रें अवाळू जसें ॥
तैं होईल निकोप देह मम हा, आत्मा प्रसादें युत ।
तैं नैसर्गिक–कल्पना–रस–भरें मोहीन सर्वांप्रत १०
कानीं लागुनि लागुनी सयमका ही मत्सपत्नी सदा ।

नेत्रीं नाचुनि नाचुनी निशिदिनीं कीं नूपुरीं गर्विता ॥
लोकांचें मन मद्विरुद्ध विटवी अद्यापि ही दुर्मदा ।
बाह्यांगास हिच्या भुलून मुकती अंतःसुखा माझिया ११
माझ्या शैशविं तेविं नृत्यसमयीं संगीतकीं शोभलीं ।
माझीं सुंदर नूपुरें सुयमकें स्वाभीष्टकाळीं भलीं ॥
आतां तीं शिशुभूषणें मम पुरे, व्हा तुष्ट अर्थें रसें ।
स्त्रीतें प्रौढ वयांत नूपुरझणत्कार त्रपा देतसे
हो एकाक्षरि नित्य हें यमक वा होवो अनेकाक्षरी । १
हो दुर्वर्ण—सुवर्ण, बंधनचि तें, स्वातंत्र्यनाशा करी ॥
जें स्वाभाविक उन्नतिप्रद, गणा तेंची वरें बंधन ।
शोभा निर्यमकांत त्यांसचि दिसे जे रूढिरात्र्यंध न १३
कांहीं लोक जसे सदैव करिती स्त्रीपारतंत्र्यस्तुती ।
तैशी ही यमकाख्य--बंधननुती वाटे मला संप्रती ॥
होती आपण दास, ठेविति सदा दास्यामधें स्वस्त्रिया ।
सांगू काय, मलाहि पाहति अजी दास्यांत ठेवावया ! १४
निर्भूषा युवती सुरेख तरि हो सुज्ञीं तिचा आदर ।
आहें निर्यमका तशी, मग मला कां मानिती ना बुध ॥
जाणा निर्यमका तशी सयमका, उत्कृष्ट दोघी जरी ।
लेणें ऐच्छिक जाहल्या यमक हें मानेल एकाक्षरी १५
माझी शक्ति सुयोग्यता न बघती निंदाल मातें जरी ।
माझे भक्तहि निंदितील तुमची ती एकदेशी रुची ॥
व्हा न्यायी, कविता बघा अयमका अन्यांचिया भूवरी ।
नादीं त्या यमकांचिया न भुलतां ठेवा रुची ती शुची १६

नाहीं आधुनिकांस शक्ति यमकीं, मानूं नका अल्पही ।
दीर्घेंही यमकें असाध्य न तयां, वार्ता लघूंची किती ॥
माझी ही सहजा गती न विकला, ओघा न यो विघ्न वा ।
अंत:सुंदरतेकडे जन वळो, सद्धेतु हे ओळखा १७
भावी अभ्युदयास सूचवितसे उद्योग हा चांगला ।
याचा अल्प जरी उपक्रम अजी युष्मद्विरोधामुळें ॥
द्या उत्साह अशा कवीस नितरां सोडोनि मिथ्याग्रहा ।
हा सारस्वत मार्ग मी क्रमिन तैं वेगें अविघ्नें पदें १८
**विद्यासागर** सुज्ञ तो पण चुके, तत्रापि मागाहुनी ।
**मायकेलें मधुसूदनें** वळविला माझ्याकडे तो क्षणीं ॥
होते अन्य विरुद्ध तेहि वळले, तैसे वळा सत्वरें ।
जो तेथें इतिहास तोच इकडे होणार जाणा खरें १९

÷ ÷ ÷ ÷ ÷

शार्दूलीं युवती बसूनि करिती लीला जशा क्रीडनीं ।
ह्या क्रीडोत तशा मदीय कविता साहित्यसंमेलनीं ॥
प्रीतिप्रेरित युक्तियुक्त अशिं हीं शार्दूलविक्रीडितें ।
वेगें तुष्ट करोत सुज्ञहृदयें हृष्टी मनें लज्जितें २०

---

## २. शेतावरील सहल.

### ( द्रुतविलंबित. )

मजसवें फिरतां कृपिभूवरी । विलसले श्रमबिंदु मुखावरी ॥
द्रुत विलंबित होय गती तुझी । सकल तें स्मरतें शतदा अजी १

क्षिति समा विषमा विवरास्पद । उतरतां चढतां निसरे पद ॥
द्रुत विलंबित बाहुकराश्रयें । तुजसि सांवरिलें तयिं म्यां सये ! २
कधिं पुढें कधिं मागुति राहुनी । स्वतनया पळती थकती क्षणीं.
द्रुत विलंबित चालुनि चालुनी । अमित देति मना सुख ईक्षणीं ३
हिरवळींतुनि शालितुनी उनीं । विविधधान्यततींतुनि चालुनी
बघुनि सृष्टि वधूसुषमा भली । स्वमतिदृष्टि सदा सुख पावली ४
हरभरा खुडुनी झणिं आर्द्रसा । हरिखलों बहु घेउनि तद्रसा ॥
भरविलाहि विशंक परस्परां । रसचि आपण तें लुटिला खरा ५
कितिक सुंदर सृष्टिवधू दिसे । हरित शालुचि पांघरली असे ॥
दिसाशि यामार्धि जंगम तूं लता । सुकलिकायुगलापरि त्या सुता ६
मधुर तोडुनियां बदरीफळें । कितिक भक्षियलीं नच तें कळे ॥
कणिस पेरु मुळे मृदु कांकड्या । विपुल खाउनि वांटियल्या गड्यां ७
शुचिपटीं बसुनी तरुखालतीं । वदत हांसत गे ! तव संगतीं ॥
मधुनि वाचित, पाहत कापणी । न कळतां दिन जाय सुखीं झणीं ८
कृषिमहीवर शेतकरी सदा । गरिब ते नमिती अपुल्या पदा ॥
कळुनि शोच्य तदीय गृहस्थिती । परम दुःखित होय तदा मती ।
सखि ! असें शहरीं जनसंकुलीं । न फिरलों कधिं घेउनियां मुलीं ॥
कितिक अज्ञजनांस्तव लाज ती । धरुनियां मुकलों स्वसुखाप्रती.
अरसिकां न रुचे फिरणें असें । अमृत यांतिल त्यांस कळे कसें ? ॥
कितिक ते अपुल्यापरि साहती । अरसिकीं पडुनी असुखाप्रती.
वृषभ हे मळणींत पहा कसे । गरगरां फिरती ग्रह ते जसे ॥
गुरु कुणी; बहु मंद कुणी असे । भयद चाबुक केतु तया दिसे.
करिति घारवणी मळतांक्षणीं । भुइवरी, तिवईवरती कुणी ॥

भरभरां कुणि आणिति टोपलीं । कितिक भातचि सावडती मुली;
कारिति राशि, सुपा कुणि मारिती । भरति, मापति, नेति घराप्रती.
दिसत भातचि भात गृहान्तरीं । गृह भरे, परमेशकृपा खरी १४
धारिति सूप, घिरट्ट कुणी परी । भ्रमति ते नरसे ललनाकरीं ॥
मुसळ घेति कुणी उखळ्या झणीं । चहुंकडोनि उठे तुमुलध्वनी १५
गृहिं, गृहांगणिं, तांदुळ दीसती । हिरकण्या जणुं शुद्ध चकाकती !
दरवळे जणुं आम्रज मंजिरी । अहह ! चैन हिमांत घरोघरीं १६

---

## ३. कविताकामिनी.

( चाल—वीरशिरोमणि० )

जी वाल्मीकिव्यासशुकांच्या आश्रमिं वाढे वनीं,
तीतें नाणा कां हो मनीं ? ॥ ध्रु० ॥
उनाड पाहुनि पाणिनिनें जिस सत्सूत्रीं बांधुनी
केलें निर्दोषा अजि जनीं ॥
सच्छंदा सत्पदा सुरागा विविधरूपधारिणी
करि जिस भगवान् पिंगलमुनी ॥
भरताचार्य धनिक जिस नाट्यीं शिक्षा ती देउनी
नर्तविति जीतें रंगांगणीं ॥
चाल—जिस कविकुलगुरुनें विलास बहु पढवुनी ।
भरविली युक्तिनें रसिकवरांच्या मनीं ।
भवभूति करी जिस करुणरसाची खनी ।
विक्रमभोजादिक राजे ते रसिक वदान्याग्रणी

होते दक्ष जिच्या रक्षणीं. १

शालिवाहनहि सुरुचिर गाथासप्तशती गाउनी
महाराष्ट्रीचा पथ कथि जनीं ।
श्रीमद्व्यासावतार कविवर गुणाढ्य विद्वन्मणी,
करी जिस विविध कथालापिनी ।
भर्तृहरीच्या समागमें जी होय चतुर भाषणीं
तैशी बहुश्रुता बहुगुणी ॥
चाल—अमरादिक सेवे उभे कोष घेउनी ।
गांभीर्य देति जिस माघ भारवी गुणी ।
श्रीहर्ष हर्ष दे जिला चतुर सूक्तींनीं ।
पदोपदीं हे श्लेषनगांची सुबंधु ओंवाळणी ।
करी कीं आनखशिख शोभिनी २

सुस्वरवर्णा सुपदा सुरसा भाववती मोहिनी ।
केलें दंडि-बाण-बिल्हणीं ॥
मुरारि जीच्या सर्वांगामधिं वीरश्री भरवुनी
चमकवी जीतें समरांगणीं ॥
शृंगाराची खरी झरी जिस गोवर्धन कविमणी ।
करी कीं हित-मित-मृदु-भाषिणी ॥
चाल—अवतरे प्रकाशूं अपूर्व मृदु यद्ध्वनि ।
आनंदवर्धनाचार्य मार्मिकाग्रणी ।
आनंद वाढवी रसिकांचा तत्क्षणीं ।
अभिनवगुप्तें अभिनव आशय गुप्तार्था प्रकटुनी ।

महती वाढविली बहु जनीं ३
ध्वनिध्वंसि करि धैर्य धैर्यसुत महिमभट्ट खंडुनी ।
हरी तन्महिमा मम्मट झणीं ॥
सोडवि झडकरि कोमल कविता कर्कश तर्कांतुनी ।
उर्वशी जशि असुरांपासुनी ॥
रुय्यक अप्पय जगन्नाथ कवि अलंकार दावुनी ।
ओढिती रसिकमनें तत्क्षणीं ॥
चाल—साहित्यदर्पणीं रूप सकल दावुनी ।
भामिनीविलासीं विलसे नग लेउनी ।
रसगंगाधरशिरिं नाचे ही स्वर्धुनी ।
जयदेवें हिस शिकवुनि गायन केलें मधुरध्वनी ।
भरविती भगवद्भक्ती मनीं ४
महाराष्ट्रभाषाजननी ही रसिकशूरसुतखनी ।
नव्यांला नवी, जुन्यांला जुनी ॥
धर्माची नीतीची भारतिं हीच जन्मदायिनी ।
जगावर ही बहु उपकारिणी ॥
एवंगुणमणिगणसंपन्ना सत्कविता—कामिनी ।
वराया आलि तुम्हां भामिनी ॥
चाल—कविजन विश्वाचे मित्र तयांपासुनी ।
ही दिव्य प्रतिभाऽप्सरोदरीं घे जनि ।
चिर पोसुनि हिजला रक्षियलें द्विजगणीं ।
दुष्यंतासम इस अन्यांच्या मोहें अवमानुनी
जनहो होइल उपरति जनीं ५

———

# सौ० वेणुबाई साठये.

## १. उषा.

( श्लोक. )

उषे ! रजनि लोपली, द्युति तुझी तमा संहरी,
प्रशांत समयीं अशा मम मन प्रसादा वरी.
दिसे वदन रम्यसें धवल कांतिही राजते.
सुवर्णकर शालुही त्वरित नेसुनी शोभते. १
घोर तिमिर तूं दूर सारिसी, दीप्ति आपुली त्वरित प्रकटिसी.
प्रेम दिव्य तूं दाविसी जनीं, शांत करिसि गे उदय पावुनी २

( दिंडी. )

कोप रविचा जाहला पूर्वकालीं, सृष्टिसुंदरिला कंप सुटे भारी.
देव दानव चिंतेंत मग्न झाले, पूर्व सुकृतानें अरुण बाल आले. ३
सकल जगताचा जनक बोलताहे, भानुकिरणीं संहार करूं पाहे.
तेज सूर्याचें घेइ तुझे ठायीं, रथीं सविता सारथी अरुण होई. ४
दिली आज्ञा मग कमलनंदनानें, मान्य केली त्या गरुडबांधवानें.
पृथ्वि-देवीतें शांत करायाला, रवी मोदें यावया सिद्ध झाला. ५
धन्य विनतासुत विघ्न हें निवारी, सिद्ध होउनि दिक्पाल उभे द्वारीं
छत्र अंबर शिरिं चवरि पवन वारी, उषागमनाची पूर्व ही तयारी ६
समय मंगल दाविला दिनकरा हें, शांततेचें पसरलें राज्य आहे.

होय शंकित ही वसुंधरा पाहे, दूति होईं मी उषा बोलली हें. ७
सत्त्वराशी ही विमल विश्वमूर्ति, अरुण पसरी आरक्तवर्ण दीप्ति.
पहा सूर्योदयसमय जवळि येई, संधिकालीं ही उषा उदित होई ८

( श्लोक. )

परम मधुर दिव्य देवि साजे, कनकमयस्फटिकासनीं विराजे.
जन सुखभरिं गाढ सुप्त झाले, उठवुनि त्यांस जिनें प्रसन्न केलें. ९
सृष्टी सारी दडुनि बसली संकटें ध्वांतधामीं.
वार्ता सांगे शुभकर रवी शांत झालों असें मी.
देवी जाई अवनिस असा देइ संदेश माझा.
लीलेनें तूं सकल जनता लाविसी नित्य काजा १०

( गीति. )

उदयाचलीं उषा ये उटजद्वारीं मुनी उभे असती.
प्रार्थुनि ते प्रथम उषे संध्यावंदन करावया निघती. ११

( श्लोक. )

सहस्रकरमंडिता नववधूमुखा लाजवी.
उदात्तचरिता उषा मुनिमनेंहि संमोहवी.
कुणी न दिसला दुजा म्हणुनि ती निसर्गा वरी.
तिचा उदय बोधितो सकल चिज्जडां सत्वरी. १२
कांहीं पक्षी मंजु गाताति गीतें, द्यावा वाटे मान या सारिकेतें.
चंडोलाला भानुचें गीत गाया, वाला हर्षें धाडि वाटे मना या.१३

( साकी. )

आम्रमंजरीरस सेवुनिया कोकिल मंजुल गाती.

बक वायस पिक पहा विहंगम सगळे मौन धरीती. १४
कोणी कोणी सकल खगांना मान सारखा देती.
खेद तयानें होई रसिकां, गुण संतत ते घेती. १५

( श्लोक. )

कासारीं कमलें प्रफुल्ल मधुपा, तूं मुक्त होई कसा.
उद्यानीं कुसुमें अनंत फुललीं चाखीं तयांच्या रसा.
वाहे मंद सुगंध शीतल असा वायू नभोमंडलीं.
झाले कोकिल गानिं दंग, लतिकाही नर्तनीं रंगली. १६
उषे ! स्तवन आवडे तव, पुरें न वाटे मना,
प्रभातसमयीं मनीं स्फुरवि तूं नव्या कल्पना.
सुगंधि सुमनें शिरीं निजकरीं तुवां वाहिलीं.
पराग कुसुमांतला तिलक लावि भालावरी. १७

---

# सौ० मनोरमाबाई गोळवलकर.

## १. पाळणा.

मी लोटीतें झोंका तुज मधुबाळा ॥
सुंदरा नीज स्नेहाळा ॥ ध्रु० ॥
हृत्स्नेहाच्या माखुनि तैलें तुजला ॥
न्हाउनी निजवि तनु मृदुला ॥
करिं प्रेमगुणें धरुनी ही तव आई

झुलवितें करीं अंगाई ॥
ती ईशकृपा पांघरूण तुज घाली ॥
हा बाळ सदा सांभाळी ॥
( चाल ) तुज नीज सुखानें यावी ॥
ही बाळकळी उमलावी ॥
जग कीर्ति–सुगंधें भरवीं ॥
ही आस धरीं विनति करीं मी प्रभुला ॥ सुंदरा. ॥१॥
किति धन्य जगीं थोर कष्ट जे घेती ॥
जे लोक–हिता साधीती ॥
बहु धीर खरे संकटिं शांती वरिती ॥
सन्मार्गशिल ना त्यजिती ॥
ते वीरांचि जे बाहुबला गाजविती ॥
स्वातंत्र्य देश रक्षीती ॥
( चाल ) तूं तसा थोर होशिल का ॥
शस्त्रास्त्रें करिं धरिशिल का ॥
कीं चतुर गुणी निघशिल का ॥
ही नव चिंता वारिशि का वेल्हाळा ॥ सुंदरा. ॥२॥
तूं सोडुं नको विश्वबंधुचें नातें ॥
धरिं प्रेमा करिं ऐक्यातें ॥
तूं कार्य करीं राजनिष्ठ राहूनी ॥
राष्ट्रातें बनवीं झटुनी ॥
परतंत्र जरी आजि मायभू झाली ॥

तुह्मि सुपुत्र तिजला वाली ॥
( चाल ) वाहुनी देशसेवेला ॥
जो कार्यीं रत जन झाला ॥
परमेशकृपाबल त्याला ॥
ही उक्ति खरी जाण मनीं, ईशाला ॥
तुजसाठीं प्रार्थीं प्रभुला ॥ सुंदरा. ॥ ३

---

## श्रीमती सारजाबाई बापट.

### १. सिंहगडचा पोवाडा.

या सिंहगडा जाउनी
त्या पडक्या भिंतींतुनी
अजुन हा उमटतो ध्वनी
'गड आला पण सिंह छातिचा ताना पडला रणीं !'
'मुहूर्त योग्य योजिला
रायाचे लग्ना चला.'
ताना शिवाजिस बोलला.
दिलगिर होउन म्हणे शिवाजी, 'वेळ न याया मला,
कोंडाणा करणें सर
आम्ही निघतों स्वारीवर
तेथोनि परतल्यावर

कार्य-सिद्धि घ्या करूनि येऊं भेटाया मागुनी.'
'तुम्ही दहाजणांचे धनी,
नका जाउं स्वतः रणीं,
जित तानाजी राहुनी
काय फायदा ? चाकर कसले शिवराया श्रमवुनी ?
पतिज्ञा घ्या ऐकुन,
आठ दिवसां आजपासुन
गड कोंडाणा घेइन
शिवरायाचें निशाण तेथें देइन फडकावुनी.'
बोलोन् वीर चालला,
म्हणे, 'शेलारमामा चला
या घेउन सूर्याजिला
गडी मावळे आणा घेतों भेद पुढें जाउनी.'
मोगलांनीं उदेभानुला
द्याया खलिता दूत धाडिला
तो मार्गीं यास भेटला.
मारुन त्यासी पत्र घेतलें वेषहि पटकाविला.
गेला टेहळित किल्ल्यावरी,
होते निशंत किल्लेकरी,
दिलें पत्र तयांच्या करीं.
साधुनि अपुला डाव परतला भेद पुरा काढुनी.
उन्मत्त उदेभानुनीं

बकऱ्याच्या झोंबीवरुनी
रायबा मारिला लोटुनी
पाहुन सारे कोळि खवळले मिळले तानाजिला.
त्या मस्त उदेभानुनीं
दिलि सती चिता उधळुनी
तो रोष ठेऊनी मनीं
टपला होता प्रबळ सिंह तो मिळला तानाजिला.
शूर शेलारमामा आले
घेऊन सैन्य आपुलें
सर्वांनीं बेत ठरविले,
दोर लावुनी वरी चढावें किल्ला करण्या सर.
यशवंति यशाची खरी
दोर घेउन चढली वरी
धरुनियां दोर तो करीं
ताना गेला चढुन सरासर दोर बांधिला वरी.
म्हणे, ‘ या हो मावळे ह्मणीं,
हा दोर करीं घेउनी,
विजयश्री तिष्ठते रणीं. ’
“ हरहर महादेव ” बोलुनी चढुनी गेले वर.
चकित ते यवन बोलती
‘ सैतान पातले किती
परि स्वर्ग दावुं त्यांप्रती. ’

कळवे मोंगल आपण काफर पाड तयांचा किती !
अनिवार वीर झुंजती
रणीं कत्तल झाली किती
त्या किल्लेदाराप्रती
जर्जर करुनी तानाजीनें देह ठेविला रणीं !
तो नायक पडतां रणीं
मावळे गेले दचकुनी
फिरणार परत तों ध्वनी
सूर्याजीचा असा ऐकिला, ' छी थू तुमच्यावर
मर्दहो ! कुठें चाललां ?
का भ्याड असे जाहलां ?
हा बाप रणीं पहुडला !
त्यास वलांडुन जातां येइल काळोखी, ध्या मनीं. '
ऐकतां स्फुरण त्यां चढे
करुनियां जिवाचे धडे
रक्ताचे पाडिले सडे
आलि जयश्री; स्तब्ध जाहली; ताना पडला रणीं.
मामांनिं उदेभानुला
लढुनियां स्वर्ग दाविला,
भाच्याचा सूड उगविला.
तानाजीशीं येउन म्हणती, ' किल्ला झाला सर. '
हें वाक्य ऐकण्यास्तव

देहांत तडफडे जिव
म्हणे, ‘ नाहिं भेटला शिव.
सांगा त्यातें “ रामराम ” मम. ’ ताना पडला रणीं !
तोफेचे बार ऐकुनी
गड झाला सर जाणुनी
शिव आला तो पाहुनी
खिन्नवदन मावळे बोलती, ‘ ताना पडला रणीं ! ’
पाहतां प्रेत तें रणीं
शिव कवटाळी धावुनी,
न्हाणिलें प्रेम-अश्रुंनीं.
म्हणे ‘ आला गड गेला माझा सिंह कसा हो रणीं ! ’

---

## मनोहर कृष्ण गोळवलकर

### १. पौर्णिमेचा चंद्र.

( चाल—सगुणगुणमाया । आलि कोल्हाटिण खेळाया )

अस्तंगत तो भानु जहाला ! शीतकिरण हा नभीं उदेला,
प्रखरकराचा ताप महीला, जणु हो भारी,
येउनि शशि त्यासि निवारी. १
हें नभ भरलें शशि—किरणांनीं, वाटे भूतलिं शीतकरांनीं,
सुधारसाचें सिंचन करुनी, ताप निवारी,

हा बघ शशि अति सुखकारी २

पाहुनि कांति नभीं ही शशिची, वाटे वरुनी रजत-रसाची,
किंवा वितळुनि हिम मेघाची, वृष्टी होई,
ताप हरुनि बहु सुख देई ३

शशि—तेजें भू श्वेताचि दिसते, चंदनचर्चित मज ही गमते,
सुधाकरानें जणु निज हस्तें, चर्चित केली,
म्हणुनी ही शीतल झाली ४

वनस्पतींचा शशि हा शास्ता, आज्ञापी जणु म्हणुनि तरु-लता,
निजपर्णांहीं करिती वाता, ताप हराया,
महिला जणु त्या सुखवाया ५

मंद मंद हा पवन वाहुनी, जलकण आणी अमित उडवुनी,
हिमबिंदू ते त्यांचे बनवुनि, भूमितलीं या,
सिंची जणु ताप हराया ६

सुधांशुचा क्षय पाहुनि गमतें, नित्य सुधेच्या स्रावें झिजते,
किंवा वितळुनि खालीं पडते, विधुची काया,
भूतल हें शीत कराया ७

निशिदिनिं विधुचा क्षय जरि होतो, कांहीं कालें वृद्धि पावतो,
परोपकारा देह झिजवितो, प्रभु संतोषें,
करि वृद्धी पुनरपि भासे ८

परोपकारें ईशकृपेला, पात्र होतसे हें जगताला,
दावी झिजवुनि निज देहाला, शशि अवलोका,
बोध करित जणु हा लोंका ९

ईशनियमनें सारें घडतें, तिळभर अंतर नच तें पडतें,
पाहुनि रचना हीं मन जडतें, प्रभुच्या ठायीं,
रमतें हें हरिच्या पायीं १०

---

## गणेश कृष्ण गर्दे

(विष्णुसहस्रनामांपैकीं ' अद्भुत ' या नामाचें भाष्य पुढील पद्यांत आलें आहे.)

### १. ' अद्भुत '

अद्भुत साऱ्या हरि तव लीला, विस्मित माझ्या करिति मतीला
सृष्टित सारें नवलचि भासे, मन हें शास्त्रें जरिहि विकासे १
वृक्ष वडाचा अणुकणिं मावे, शुक्रकणातें मति कशि पावे ?
सूर्य कसा तो सतताचि पेटे, विस्मय याचा खचितचि वाटे. २
विस्तृत तारा ग्रहगणमाला, पाहुनि होई नवल मनाला.
माप जियेचें मनिं अनुमाया, शक्य तया जो तरि तव माया ३
लोकां पाडिशि विस्मयीं शिशुपणीं प्राणासवें ओढितां
दुग्धप्राशनिं पूतनाकुचघटा, गाडा पदें पाडितां;
माती भक्षिल काय पाहुं म्हणुनी तुंडाब्ज उद्घाटितां,
मातेला मुखिं विश्व दावुनि तिलाही विस्मयीं पाडितां; ४
खोड्या पाहुनि ताडितां, नयनिं ते अश्रू बळें काढितां,
लोणी खाउनि कोपुनीहि दशदाधातें रवी फोडितां,
दाव्यानीं तुज बांधितां अमितही पुरीं न तीं पाडितां,
वृक्षां पाडुनि अर्जुनद्वय, बका चंचूसवें फोडितां ५

हस्ताग्रें धरितां महीधर, पदीं कालेय संपीडितां,
हत्ती मत्तहि पाडुनी उपटुनी दंता धनू मोडितां;
चाणूरादि बलाढ्य मल्ल वधुनी कंसासहि तोडितां,
वर्णू मी किति या त्वदीय, मथुराशार्दूल! विक्रीडितां ? ६

---

# कुमारी इरावतीबाई करमरकर

## १. निर्झरकांठीं कुठें तरी !

रात्रंदिन मी भटकत असतें निर्झरकांठीं कुठें तरी।
निसर्गमित्रासंगें फिरतें, वेडी आहें खरोखरी ॥
बंध कसा तो माहित नाहीं वायूसंगें मी गातें।
वनीं निर्झरांसवेंचि अथवा गिरिच्या शृंगीं मी रमतें ॥
चपलेसम मी चपला आहें, आळस मजला नसे कदा।
सृष्टी देवी जेथें नटली तेथें माझा वास सदा ॥
वनदेवीसह खोल गह्वरीं घोर काननीं मी असतें।
मंजुळ निर्झरगाना ऐकत कडेकडेनें मी जातें ॥
सरोवराच्या निर्मल उदकीं हृदयीं कोमल कमलाच्या।
सरोवराच्या लहरिसवेंची येति लहरि आनंदाच्या ॥
नीलाकाशीं हंसऱ्या तारा त्यांसंगें हो असतें मी।
त्याही हंसऱ्या, मीही हंसरी. सख्या सारख्या पहा अम्ही ॥
सरित्प्रवाहावरती लाटा खेळति मोठ्या आनंदें।
मीही जाउनि खेळें तेथें लुब्ध होतसें त्या नादें ॥

गभीर ऐशा महासागरीं नृत्य करितसें कधीं कधीं ।
मम सान्निध्यें गभीररूपा टाकुनि देई महोदधी ॥
कोमल हृदयीं अश्रु गाळितें दुःखित पाहुनि सर्व जनां ।
दुःखित होती सर्व रसिक ते ऐकुनिया करुणा गाना ॥
जगतामध्यें सर्व ठिकाणीं जातें मजला बंध नसे ।
नाम ऐकण्या उत्सुक झालां? 'कविता बाला' नांव असे॰

---

## कुमारी गंगूबाई काळे.

### १. फूल.

हिंडत असतां उद्यानीं । लता पाहिली मीं नामी ॥
जों जों जवळीं मी गेलें । तों गंधें मोहित झालें ॥
गंध पसरला उद्यानीं । हर्षित मी अंतःकरणीं ॥
गेलें जवळीं लतिकेच्या । उसळाति लहरी प्रेमाच्या ॥
वेड लागलें सुमनाचें । डोळ्यांना परि कां न दिसे ? ॥
पुष्प काढिलें हुडकुनि मीं । आनंदित अंतर्यामीं ॥
चुंबीं त्याला प्रेमानें । वदलें त्यासी कुतुकानें ॥
'स्वयें न विखारिसि जरि गंध । पवन पसरि तरि तो मंद॥
सुज्ञ झांकिती गुण अपुले । तत्त्व काय हें मज न कळे?'॥

---

## संपादक

### महाराष्ट्रवंदन. (पूर्वार्ध)

अये शारदे देवि ! हा दीन दास
तुझ्या, नम्र होओनि, वंदी पदांस.
नवें गीत गाया तया स्फूर्ति द्यावी;
कृपा त्यावरी आजि हे त्वां करावी. १

स्वधर्म स्वदेश स्वभाषा भजाया
जिहीं होमिली, स्वार्थ सांडूनि, काया,
स्मरावें प्रभातीं तयां पुण्यशीलां,
असें फार वाटे तदीया मतीला. २

कवी वीर मुत्सद्दि भूपाल संत
जनीं कीर्ति गाठी जयाची दिगंत
महाशील—दातृत्व—सद्भाव[3]—मूर्ति
अशा थोर झाल्या मराठा विभूति. ३

मुखीं पुण्य नामें तयांचीं वसावीं,
मनीं तद्गुणांची स्मृती नित्य व्हावी
अशा रीतिनें चित्त संशुद्ध व्हावें,
चरित्रासही तेज मोठें चढावें ४

धरोनी मनीं हेतु हा गीत गाई,

---

१ देहाचा यज्ञ केला. २ दिगंताला जाई. ३ चांगली भावना. ४ थोर माणसें.
५ पद्यकार.

तयालागि उत्साह दे पूर्ण आई !
प्रसादेंचि जाईल हें शेवटाला
तुझ्या, देवि ! विश्वास वाटे मनाला. ५
जिजाबाइ[1] जाणो दुजी ती भवानी[2],
जगीं धन्य झाली. कवी तीस वानी.
तिची कूस त्या दिव्य रत्नें प्रकाशे
मराठा—मुखश्री[3] जयानें विकासे. ६
शहाजीमहाराज ते वंदनीय
पहा वाचुनीयां चरित्रा तदीय.
शिवाजी शिवाजीमहाराज झाले
जिजाई—शहाजींस तें श्रेय आलें. ७
मिळे शुद्धिची वृक्षबीजास जोड
तरी त्या फळें फार येतात गोड.
जिजाई—शहाजीपरी शुद्धबीज
निघे त्यांतुनी कां न बाहेर बीज ? ८
नमूं श्रीशिवाजीमहाराज धन्य
तयासारिखा लोकिं झाला न अन्य.
स्वधर्मस्वदेशां करी बंधमुक्त
म्हणोनी तयाला नमस्कार युक्त. ९
स्वराज्य स्वयें स्थापियेलें तयानें
स्वधर्मासि रक्षोनि वागे नयानें.

---

१ शिवाजीमहाराजांची आई. २ शिवाजीमहाराजांची आराध्य देवी; तुळजापुरची भवानी. ३ मराठ्यांच्या तोंडावरील शोभा.

भवानीपरी माय तो पूज्य मानी.
  कवी कोणता तद्यशाला न वानी ? १०
उभारी पताका जयाची नृपाल
  महाराष्ट्रदेशा चढे तेज फार.
महाविक्रम[1] श्रीशिवाच्या प्रतापें
  मनामाजि दिल्लीशही फार तापे. ११
जिहीं जिंकिलें रागलोभादिकांस,
  जिहीं तुच्छिलें त्या भवा[2] वैभवास
जिहीं लाविले नीतिबोधप्रदीप[3]
  सदा सिद्धि ठाके जयांच्या समीप; १२
धरी श्रीशिवाजी तयांच्या पदांस,
  प्रसादें तयांच्या चुरी[4] आपदांस.
रणीं खंडि शत्रूंचिया तो मदासें[5],
  सदा भूपती रंजवी स्वप्रजांस १३
नमावा शिवाजी, स्मरावा शिवाजी,
  जनीं धन्य तो धन्य तो होय गाजी[6]
गुरुश्रेष्ठ दादाजि[7] त्याला मिळाला,
  नमस्कार माझा असो त्या द्विजाला. १४
गडांमाजि ज्या साजलें नांव सिंह[8]
  तया प्राण वेंचोनि घेई नृसिंह[9].

---

१ मोठा पराक्रम ज्याचा अशा श्रीशिवाजीमहाराजांच्या. २ संसाराला. ३ सदाचार आणि सदुपदेश यांचे दीप. ४ ( विपत्तींचा )नाश करी. ५ गर्वाला. ६ शूर. ७ दादाजी कोंडदेव. ८ सिंहगड. ९ नरश्रेष्ठ तानाजी मालुसरे.

शिवाजी-नृपाचा दुजा प्राण झाला,
असा धन्य तानाजि ! वंदा तयाला. १५
पित्याचें जया लाभलें शौर्य मोठें
असा शंभु[1] दावी प्रतापासि कोठें[2].
यशोदा[3] सुमाता तिचा पुत्र शाहू[4]
प्राणामांजली त्यांसि सानंद वाहूं. १६

ताराबाई सोयराबाइ वंदा, राजारामा त्या प्रजासौख्यकंदा;
बाळाजी तो आवजीपुत्र वाना; तत्पुत्राही खंडुजीला भजाना ! १७
प्रताप[5] स्वतां मूर्तिमंत प्रताप, रणीं देइ शत्रूप्रती तीव्र ताप.
मुखें वानितां त्या पळे दूर पाप, सजे शीर्ष त्याला नमाया अपाप
जळीं पाहती शत्रुचे ज्यास वाजी, असा वंदि वीराग्रणी तो धनाजी[6];
स्मरा तो मनामाजि संताजि[7] थोर, पडे शत्रुला पाहुनी ज्यास घोर
तारापुत्र श्रीशिवाजी स्मरावा, संभाजी तद्बंधुही आठवावा.
त्यांच्या जे जे भूषवीती कुलाला, ते ते होती योग्य मद्वंदनाला.
वंदीं रामा[8] नीलकंठात्मजाला, प्रल्हादाला[9] अर्पितों पुष्पमाला.
मल्हारींचा[10] पुत्र तो शंकराजी, त्याला मोदें मानसीं आठवा जी !
परशुराम[11] चिमाजिहि[12] पिंगळे[13], बघुनि ज्या प्रतिपक्ष दुरी पळे,
नरमणी परसोजिहि भोसले, अरिचिया हृदयीं बहु तो सले.

---

१ संभाजी. २ क्वचित्, एखाद्या प्रसंगीं. ३ येसूबाई, संभाजीची पत्नी. ४ शाहू-महाराज. ५ प्रतापराव गुजर. ६ धनाजी जाधव. ७ संताजी घोरपडे. ८ रामचंद्र नीलकंठ अमात्य. ९ प्रल्हाद निराजी, पंतप्रतिनिधी. १० शंकराजी मल्लार. ११ परशुराम त्रिंबक प्रतिनिधि. १२ चिमणाजी दामोदर. १३ बहिरोजी पिंगळे.

जनिं झडे बहु हैबत-नौबद, अरिस खंडु[2]हि फारचि तापद.
समर दमाजि[3] शहाजि[4] उदाजि[5]ही, अमित विक्रम दावियला तिहीं;
कान्होजी[6] तो *मानसिंग प्रतापी, संताजी[7] हा फार शत्रूसि दापी,
अप्पाजी तो होय थोरात थोर, ठाके त्याच्या कोण सांगा समोर ?

तो खेम सांवत धरोनि शिवाजिपक्ष
झुंजे रणीं, बहु सतावितसे विपक्ष.
आबाजि बंधु अति विक्रमि तो निळोजी
जो स्वामिकार्य करितां न जिवास मोजी. २५

पुरंदरामाजि करोनि आजी, टाकी तनूलागि मुरारबाजी.
तया नमस्कार करावया जी, करा तुम्ही मस्तक नम्र आजी. २६

व्यंकोजि तंजावरभूमिपाल,
टेका तयाच्या पुढती स्वभाल.
तो पिंगळे वंद्य कृतार्थ मोरे[12],
निर्मीतसे जो गडराजे[13] थोर २७

शिवाचा सखा शूर येसाजिकंक
जनीं कीर्ति त्याची असे निष्कलंक.
दुजा होय सन्मित्र तो मर्द बाजी[14]
तयाच्या यशाला प्रमोदें नेवाजी[15]. २८

अहा ! रांगण्याची धरी खिंड बाजी[16]

१ हैबतराव निंबाळकर. २ खंडेराव दाभाडे. ३ दमाजी थोरात. ४ शहाजी निंबाळकर. ५ उदाजी चव्हाण. ६ कान्होजी आंग्रे. *मोरे ७ संताजी पांढरे. ८ शत्रु. ९ निळोजी सोनदेव, पंतअमात्य. १० युद्ध. ११ अहो ! १२ मोरोपंत. १३ रायगड. १४ पासलकर. १५ गा. १६ देशपांडे.

तयाची स्मृती सर्व लोकांसि ताजी.
तनु स्वीय तो देशकार्यार्थ अर्पी
तदात्म्यास तोषें सदा पूर्ण तर्पी[1] २९
अबाजी उपाख्या जया सोनदेव
तयाचें जनीं वांछिती सर्व खेवें[2].
झणीं घेइ कल्याण[3]; तोषे शिवाजी
तयाला प्रणामांजली देइ आजी. ३०
नेटाजि पालकर खंडुनि वैरि सर्व
त्यांचा हरी झडकरी बलभूल[4] गर्व.
लावी तयास गुरु[5] तो करभार[6] द्याया.
त्याचें असे यश मुखें बहु योग्य गाया. ३१
अण्णाजि[7] दत्ताजि[8]हि सोमनाथ[9], हर्षें बहू सेविति भूमिनाथ[10]
फर्जंद[11] आणी रघुनाथ[12]पंत, यशा तदीया न दिसोचि अंत. ३२
रणामाजि ठाकोनि हंबीर[13]राव
करी शत्रुशीं हात, मारोनि घाव.
तयाचें असे राहिलें नाम मागें.
करायास जिव्हेवरी नृत्य लागे ! ३३
बाळाजी[14] तो पेशवा आद्य झाला, कामा आला फार शाहू-नृपाला.

---

१ तृप्त कर. २ क्षेम. ३ गांवाचें नांव. ४ बळापासून उत्पन्न होणारा. ५ मोठी. ६ खंडणी. ७ अण्णाजी दत्तो, पंतसचीव. ८ मंत्री-वाकनीस. ९ डबीर-सुमंत. १० शिवाजीमहाराज. ११ हिरोजी फर्जंद; महाराजांचा अत्यंत विश्वासांतला मित्र. १२ उपाध्ये, पंडितराव. १३ मोहिते. १४ बाळाजी विश्वनाथ.

त्याची मोठी बुद्धि, कर्तृत्व थोर. दैवानें त्या दीधला फार जोर.
साताऱ्याचें तेज वाढे भरारा, सर्वां वाटे राजयाचा दरारा.
शत्रू कांपे अंतरंगीं थरारा, मानी त्याच्या सर्वदाही करारा. ३५

योद्धा मोठा धोरणी थोर मंत्री
केलें त्यानें राज्य तें एकतंत्री.
शाहूला तो होय जीवासमान
सर्वांहूनी थोर दे त्यास मान. ३६

त्या बाळाजी विश्वनाथासि भावें, चित्तामध्यें आठवोनी नमावें.
त्याला झाला पुत्र तो बाजिराय, त्याचा लोकीं राजतो कीर्तिकाय[1].
हिंदुस्थानीं मेळवी प्रांत पाहीं, शाहू त्याचा गर्व चित्तांत वाही.
दुर्दैवानें घातला थोर घाला, त्यायोगें त्या यौवनीं मृत्यु आला !
धैर्यें वीर्यें विक्रमें धोरणानें, तातापेक्षां शोभला पुत्र जाणें.
झालें ऐसें पेशव्यांमाजि रत्न, राज्यासाठीं केवढा तत्प्रयत्न ?
आनंदें त्या बाजिराया नमावें, चित्तीं त्याच्या विक्रमातें[2] स्मरावें.
आप्पा बंधू धाकटा वीर्यशाली, त्याची कीर्ती फार लोकांत झाली.
चिमाजि आप्पा वसईस गेला; शत्रू तयानें विलयास नेला.
तेथिल किल्ल्यावरि वीर बाका, लावी स्ववीर्यें भगवी पताका !
भिओनि गेला बहु तो फिरंगी[4], कडाडली वीज जणो तदंगीं !
झाले छळापासुनि हिंदु मुक्त, प्रणाम आप्पांसि म्हणोनि युक्त.

सुभेदार मल्हाररावां प्रणाम,
तयाचें मनीं घ्या सदा पुण्य नाम.

---

१ कीर्तिरूप देह. २ पराक्रमाला. ३ पराक्रमानें शोभणारा. ४ पोर्तुगीज शत्रु.

महाशूर तो बाजिचा एक हस्त
तयाच्या करीं कीर्ति राही प्रशस्त. ४३
पहा वैरि मल्हारिनांचे धाके
तदीया कृपाणासि दिल्लीश वांके.
बहू देति त्या पेशवे सव मान.
सुभेदार तो वंद्य आम्हां कसा न ! ४४
तुकोजि तेवीं यशवंत वीर, राणोजि दत्ताजि जयाजि धीर;
केली महा मर्दुमकी तयांनीं म्हणोनि मी. सादर त्यांस मानीं. ४५
वीर्यशालि विलसे जनकोजी, तद्यशा कवण मानव मोजी ?
देशकार्यिं तनु वेंचि उदार,तत्पदीं नति असो बहुवार. ४६
तिजा पेशवा होय बाळाजिनामा
करी राज्य योजोनिया दंडसामां.
महा धोरणी भाग्यशाली निघाला.
मराठाजयश्रीमहोत्कर्ष झाला. ४७
नमावें तया; भाउ तोही भजावा,
तसें आठवा चित्तिं विश्वासरावा.
रणीं शांत हो बाळ तो सुंदरांग,
दुजें गोपिकाबाइचें अंतरंग ! ४८

---

१ प्रशस्त कीर्ति करीं राही; म्हणजे मोठा कीर्तिमान् झाला. २ तलवारीला. ३ दिल्लीचा पातशाह. ४ होळकर ५ शिंदे. ६ शिंदे. ७ मोजण्यास समर्थ आहे. ८ नमस्कार. ९ तिसरा. १० बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब ११ शिक्षा व तह १२ पराक्रमी सदाशिवराव भाऊ ( साहेब )

सर्वे घेइ *भीमातटप्रांतवाजी
तयां सिंधु[1]तीरावरी पाणि पाजी.
भराऱ्या अशा विक्रमी[2] फार मारी
तया त्यामुळें नाम राघोभरारी[3] ! ४९
स्मरा हो स्मरा माधवा[4] वीररत्ना,
गतश्री पुन्हां आणि योजोनि यत्ना.
तरी त्यासि लाभे, पहा! आयु अल्प
तयें हानि झाली प्रजांची अनल्प[5]. ५०
रमा[6] जाय साध्वी सती भर्तृसंगें,
तिला मान द्या या कथेच्या प्रसंगें,
घनाच्या सवें चंचला[7] होय शांत[8]
कशी कौमुदी[9] सोडुनी जाय कांत[10] ? ५१
गोपिका[11] वीरसू[12] फार तेजस्विनी
पार्वती[13] धैर्य वैराग्य यांची खनी[14].
माधवा[15] जन्म दे पुण्य गंगा[16] जनीं
बाइ वेणा[17] रमे काव्य[18]संलापनीं. ५२
वधू गौतमांची[19] शिला होय मार्गे[20]

* भीमथडीचे घोडे १ सिंधूनदीच्या कांठीं. २ पराक्रमी. ३ चपळ रघुनाथराव. ४ थोरले माधवराव पेशवे. ५ पुष्कळ. ६ माधवरावांची पत्नी. ७ वीज. ८ लुप्त, नष्ट. ९ चांदणें, चंद्रिका. १० पति अर्थात् चंद्र. ११ गोपिकाबाई, नानासाहेब पेशव्यांची ज्येष्ठ पत्नी. १२ वीर पुत्र प्रसवणारी. १३ भाऊसाहेबांची बायको. १४ खाण. १५ सवाई माधवरावास. १६ पवित्र गंगाबाई. १७ समर्थांची एक शिष्य. १८ कविता रचण्यांत. १९ गौतम ऋषींची, २० पौराणिक कालीं.

यशाला सतीच्या महा डाग[1] लागे
जणो आचरोनी सुकर्में अनंत
स्नुषा[2] होय मल्लारिचीं[3] भाग्यवंत ! ५३
अहिल्या[4] सती ती महा धर्मनिष्ठ
करीं न्याय झाला तिच्या सुप्रतिष्ठ[5].
प्रजांना गमे वत्सला[6] थोर माता,
तिच्या वंदितों पादधूलीस आतां. ५४
दया दावि दीनां, करी दानधर्म,
भजे ईश्वरा, पावती लोक शर्म[7].
तिला आकळे[8] शत्रुचें नीतिवर्म[9],
यशा वाढवी तें करी नित्य कर्म. ५५
नसे सत्कृतीच्या तिच्या चिन्ह कांहीं
असें एकही तीर्थ वा क्षेत्र नाहीं.
तिच्या कीर्तिचा दुंदुभिध्वान[10] चाले
तयानें कवींची मनोवृत्ति हाले ! ५६
असे वंद्य लक्ष्मी[11] तिचें स्थान झांशी
स्मरा हो तिला; ती महापुण्यराशी;
धरामंडळा भेदुनीयां निघाली[12]

---

१ इंद्राशीं संगत झाल्याचा. २ सून. ३ मल्लारराव होळकराची. ४ खंडेराव होळकराची पत्नी. ५ स्थिर. ६ ममताळू. ७ सुख. ८ समजे. ९ राजकारण. १० नगाऱ्याचा शब्द. ११ लक्ष्मीबाईसाहेब, झांशीकर. १२ निघालेली. सुप्रसिद्ध लक्ष्मी समुद्रांतून निघाली, प्रस्तुत लक्ष्मी भूमंडळाच्या उदरांतून निघाली, एवढाच दोघींमध्ये भेद.

जणों अन्य लक्ष्मीच जन्मासि आली ! ५७
प्रजाप्रेम, वात्सल्य, औदार्य, धैर्य
महा ओज तेजस्विता मान शौर्य,
अशा सद्गुणांचें महोदार सद्म[2]
धरा त्या सतीचें शिरीं पादपद्म ५८
शिंदे कुलालंकृति[3] थोर साची, माहादजी ही अभिधा[4] जयाची,
तो भाग्यशाली अतुलप्रतापी, शौर्यें निजें दिल्लिपतीस दापी ५९
विदेशी बघोनी पटाईत सेना
जुना फौजफाटा तयाला रुचेना,
नवें सैन्य पाश्चात्यरीत्या उभारी
तयें वीर झाला समस्तांसि भारी. ६०
हिंदुस्थानपटावरील सगळीं तो मोहरीं हालवी,
नाना-इंग्रज-हैदर-प्रभृतिनां लीलावशें[5] चाळवी.
दिल्लीवल्लभ राजसंघ अवघे आक्रांत केले तयें,
त्याच्या वांचुनि राजकारण कुठें थोडेंहि चालूं नये! ६१
पुण्याला महादाजिचें प्रस्थ आलें,
तयाच्या पुढें सर्व निस्तेज झाले.
नवी फौज, संपत्तिचा डौल रंग
पुणें थक्क ! तो पाहुनी सर्व ढंग ! ६२
पुण्यामाजि विख्यात मुत्सद्दि नाना
तयाशीं करी नीतिचे पेंच नाना.

---

१ फार मोठें. २ घर. ३ अलंकार. ४ नांव. ५ वश.

असावा करीं पेशवा आपुल्याच,
नसावा तया भानुचा लेश कांच. ६३
अभिप्राय ऐसा असे पाटिलांचा[१]
तदुद्योग चाले तशा धोरणाचा,
कधीं माधवोलागि[२] एकांतिं बाहीं,
तया रंजवाया करी यत्न कांहीं. ६४
हिराबागिं केंव्हां सवें माधवाच्या
करी गोष्टि अंतस्थ राष्ट्रीय साच्या;
कधीं पर्वतीच्या सैरीं[३] नौविहार[४]
कधीं पर्वतीप्रांतिं साधी शिकार. ६५
वजीरातिंचा[५] मान दे माधवाला
अशा रीतिनें तोषवी राजयाला;
पुढें जाहला पंचमींचा[६] सुरंग !
मराठा जयामाजि शाहीर[७] दंग. ६६
कीर्ति-वैभव-पराक्रम-शाली, हे[८] विभूति सहसाचि निमाली[९] !
पाटिलां सतत आदर दावा, तत्पराक्रम सदैव वदावा ६७
नमा आदरें धाकुट्या माधवाला
महा भाग्यवान् बाळ जन्मास आला,

---

१ महादजीशिंदे यांचा. २ सवाईमाधराव यांस. ३ तळ्यांत. ४ नावेंत सहल ५ दिल्लीच्या पातशहाच्या वजीरीची सनद देण्याचा मान. ६ रंगपंचमीचा रंग. ७ अनेक मराठी शाहिरानीं या रंगपंचमीच्या रंगप्रसंगावर पोवाडे रचिले आहेत. ८ हा मोठा पुरुष. ९ मृत्यु पावला.

तया भानुंची[1] लागली थोर शिक्षा[2],
   गमेना तया कष्टदा[3] कार्यदीक्षा[4]. ६८
निजामास खर्ड्यांत[5] गांठोनि दंडा,
   तयाचा त्वरेनें महादर्प खंडी;
असा होय उत्कर्षशाली नृपाल,
   परी होय अल्पायु गांगेय[6] बाल. ६९
असे वृत्ति ज्याची सदा निष्कलंक,
   मनीं तुल्य मानीतसे रावरंक;
धनाची धरीना स्पृहा न्याय देई,
   असा रामशास्त्री[7] स्मृतिलागि येई. ७०
प्रकाशे प्रतापें नभीं दिव्य भानु
   चकाकोनि गेला तसा राष्ट्रिं भानु[8]
बहु खेळला नीतिचे डावपेंच,
   तयाचा तुलालेश[9] कोणा न येच ७१
स्वदेशी विदेशी तया शत्रु झाले,
   पुढें तन्मतीच्या कुणाचें न चाले;
न त्याच्या विचाराविणें पान हाले,
   स्वराज्या तयानें महातेज आलें. ७२
तयाच्या सवें दूरदृष्टी निमाली,

---

१ नानाफडनिसांची. २ वळण. ३ तापदायक. ४ राज्यकारभाराचें काम. ५ खर्डेगांवीं. ६ गंगाबाईचा. ७ प्रभुणे, प्रसिद्ध न्यायाधीश. ८ बाळाजी जनार्दन भानु अथवा नानाफडणवीस. ९ तुलनेचा अंश देखील.

न मागें तयाच्या जना कोणि वाली.
दिशा धुंद झाल्या, पडे अंधकार,
लया भानु जातां बुडे राज्य ठार ! ७३

करोनी महान् युक्तिचे यत्न नाना
महासंकटीं वांचवी राष्ट्र नाना,
तयाची सुकीर्ती मुखें नित्य वाना,
तया देवतेतुल्य चित्तांत माना. ७४

स्मरा विठ्ठला[1] तेवि नारायेणाला[2],
उदाजीमुखां[3] शूर धारानृपांला;
स्मरा बापु ते गोखले स्वामिभक्त,
सखाराम[4] जो राघवीं[5] होय रक्त[6] ७५

हरिपंत[7] सेनापती तो भजावा,
दमाजी[8] पिलाजीहि[8] चित्तीं धरावा;
मनीं आठवा कानडे रामचंद्र[9],
जना भाउ[10] जैसा चकोरासि चंद्र. ७६

पेठे जया त्र्यंबक[11] नांव साजे,त्याचा यशोदुंदुभि[12] थोर वाजे.
गोविंद[13] तेवीं बळवंतराव[14],दोघे स्ववीर्यें मिळवीति नांव. ७७

---

१ विट्ठल शिवदेव विंचुरकर यांस. २ नारोशंकर राजेबहाद्दर यांस. ३ उदाजीराव, यशवंतराव वगैरे धारच्या राजांस. ४ सखाराम बापू बोकील. ५ रघुनाथरावाच्या ठिकाणीं. ६ प्रेम ठेवणारा. ७ फडके. ८ गायकवाड. ९ रामचंद्र गणेश कानडे. १०परशुरामभाऊ पटवर्धन ११ त्र्यंबकरावमामा पेठे. १२ कीर्तिरूप नगारा. १३ बुंदेले. १४ मेहेंदळे.

रास्ते घोरपडे पवार शिरके थोरात ते पानसे
तेवीं जाधव चक्रदेव फडके आंग्रे बळी[1] काळसे;
ते ओढेकर शिंदखेडकरही मेहेंदळे भोयटे
त्यांचें सद्यश गावयास रसना[2] मोठ्या प्रयत्नें झटे. ७८

( उत्तरार्ध )

नमो ज्ञानरूपा तुला ज्ञानराया[3] !
जनीं जन्मलासी जना उद्धराया;
तुवां निर्मिला रम्य गीतार्थदीप[4],
तयें भक्त जाताति[5] देवासमीप ७९
तुझें काव्य तत्त्वज्ञता तीहि गोड,
अशांची दिसेनाचि अन्यत्र जोड;
तुझी स्वानुभूति[6]-प्रथा योग्य वाटे
तुझें नाम घेतां मनीं मोद दाटे ८०
" मऱ्हाटी " तुझी जाहली नम्र दासी
म्हणोनीच निष्णात ती भ्रुविलासीं[7].
मनोभृंग माझा तुझ्या पादकंजीं[8]
कवीन्द्रा ! सदा घालु सप्रेम रुंजी[9] ८१

---

१ ( शत्रूला ) कृतांतासारखे बलिष्ठ. २ जिव्हा. या श्लोकांत सुप्रसिद्ध मराठे सरदारांचीं आडनांवें आणलीं आहेत. त्यांवरून त्या त्या आडनांवांचे थोर पुरुष समजावे. त्यांचीं पुरीं नांवें इतिहासांत पहावीं. ३ श्रीज्ञानेश्वरा. ४ गीतेच्या अर्थावर प्रकाश पाडणारा मोठा दिवा अर्थात् ज्ञानेश्वरीरूप भाष्य. ५ देवाचें स्वरूप ओळखतात. ६ साक्षात्काराची प्रसिद्धि ७ कटाक्ष फेकण्याच्या कामांत. ८ पदकमलांवर. ९ गानयुक्त परिभ्रमण.

तुझ्या गेहिं साक्षात् वसे शुद्ध मुक्ती[1],
तियेंच्या स्मृतीनें जना होय मुक्ती;
तिथें तेंवि नांदे सुखानें निवृत्ति[2]
स्मरोनी तया रंगते साधुवृत्ति ८२

तुझा बंधु तो साधु सोपान[3] झाला
स्वर्गारोहिं[4] सोपान[5] सोपा[6] जनाला
तुझ्या शुद्ध सत्काव्यगंगाप्रवाहीं
सदा स्नात व्हावें अशी आस राही ८३

दया शांति यांचें गमे रम्य धाम[7]
सदा वृत्ति ज्याची दिसे पूर्णकाम[8]
विराजे जनीं वाणिचा[9] एक नाथ[10]
असे वंद्य आम्हांसि तो एकनाथ[11] ८४

भजोनी प्रभूला तुवां नामदेवा,
जना चारिला भक्ति—वैराग्य—मेवा;
तुझ्या प्रेम[12]संगीत त्या कृष्णलीला
जनाच्या अगा रंजवीती मतीला ८५

जनाबाइ झाली तुझी धन्य दासी,
अहा ! रंगली वर्णितां श्रीधरासी;
तिचे वाचितां गोड भारी अभंग
फुटे प्रेमपान्हा, स्फुरे अन्तरंग ८६

---

१मुक्ताबाई. २ निवृत्तिनाथ. ३ सोपानदेव. ४ स्वर्ग चढण्याच्या कामीं. ५ जिना ६ सुगम. ७घर. ८ पुरी झाली आहे इच्छा ज्याची असा; तृप्त. ९ शारदेचा. १० पति. ११ एकनाथमहाराज. १२ प्रेमानें गाइलेल्या.

अगा ! धन्य तूं, ती जनी धन्य दासी,
प्रभू गाउनी पावलां तत्पदासी.
तुम्हांलागि वंदीतसों नम्रभावें,
तयें आमुचें पूर्ण कल्याण व्हावें ८७

वंदीं जया नाम मुकुंदराय, राहे तयाचा जनिं कीर्तिकायं[1];
मी वांकवीं त्या जयरामिं[2] माथा, न कां धरावें शिरिं रंगनाथा[3]?
महान् महाराष्ट्र[4]सरस्वतीचा, विलास मुक्तेश्वर होय साचा;
तया प्रणामांजलि अर्पितोहें, सुदाम कृष्णाप्रति जेविं पोहे ८९

भागीरथी—विमल—भंग दुभंग होती
तेणें अभंग परिभूत तयां करीती.
ऐशी अलौकिक करी कृति वैश्य कोणी[6],
त्याचे घरीं चरणरेणु शिरीं नमोनी ९०

जो अग्रगण्य असतांहि ‘ अकिंचनांत ’
मोठी ‘ समर्थ ’ पदवी मिरवी जनांत.
‘ स्वामी ’ जयास म्हणती असुनीहि ‘ दास ’
तो साधुवर्य नमिला गुरु रामदास ९१

वैराग्यकंद कवि[9]हीर कविप्रवीर[10]
श्रीरामचंद्रचरणीं रमला कबीर.
त्याच्या पवित्र कृतिला [11]नति होय माझी

१ कीर्तिरूप देह. २ जयरामस्वामी. ३ रंगनाथस्वामी. ४ मराठी भाषेचा. ५ गंगेच्या शुभ्र लहरी. ६ महाभाग्यशाली कोणी एक वैश्य, अर्थात् तुकारामबोवा. ७ पायधूळ. ८ वैराग्याचा गड्डा. ९ बुधश्रेष्ठ. १० काव्यें रचणारांत प्रमुख. ११ नमन

तेणें तुटो प्रबल हा भवबंध आजी ! ९२
सर्वांहुनी प्रिय गमे परमेश्वरासी
ठावा असा तुळसिचा महिमा जनासी.
तद्दास[1] त्यास तिजहूनहि होय मान्य
सद्वंद्य तो तुळसिदास जगांत धन्य ! ९३
नांवेंचि वामन[2] अवामन[3] कीर्तिखाणी,
ज्यालागि वाम[4] न सुधामधु[5]गीत वाणी !
दे ती प्रतिक्षणिं सुतोष नवा मनाला
वंदीं अशा भुवनवंदित वामनाला ९४
षड्जेतर[6]स्वरविकारहि पूर्ण ठावा,
संरक्तरामघन[7] यद्धृदयीं वसावा;
संन्यस्तपक्ष[8] करि विष्णुपदीं[9] विहार,
तो अद्भुत[10] द्विज[11]मयूरहि वंद्य फार. ९५
कवी थोर सोलापुरीं रामजोशी, कृतीमाजि शृंगारवैराग्य पोशी;
जणो लावणी लावणीची करी तो, तयाच्या पदाब्जासि चित्तीं धरीतों.
जी नाचली तुणतुण्यावर पूर्वरंगीं
झाली पवित्र पुढती हरिनामसंगीं.

---

१ तुळशीदास. २ वामनपंडित. ३ मोठी. ४ प्रतिकूळ. ५ अमृत व मध यांनीं प्रशंसिलेली. ६ षड्जाहून इतर स्वरभेद. मयूरपक्षी केवळ षड्जच जाणतो. ७ कृष्णमेघ मयूरपक्ष्याच्या हृदयांत असतो. मयूरकवीच्या हृदयांत प्रेमपूर्ण रामरूप मेघ असतो. ८ सोडला आहे भेद ज्यानें असा; अभेददर्शी. पक्षिपक्षीं पक्ष म्हणजे पंख. पक्षहीन असून द्विजमयूर विष्णुपदीं विहार करितो हा विरोधाभास. ९ परमेश्वरचरणीं; मयूरपक्षीं आकाशांत. १० विलक्षण. ११ ब्राह्मण मोरोपंत कवि; पक्षिपक्षीं मोर.

ती रामजोशिकविची नवपद्यलीला
नाहीं कशी रमविणार महन्मतीला ? ९७

चित्तास फार चटका फटका अमोल
लावीच एक घटिका, लटिका न बोल.

ऐशी चमत्कृतियुता कविता *कवीन
फंदी अनंत करि, त्या न कसा नमीन ? ९८

अमृतराय कटाव करीतसे, मधुर तत्कृति भक्तिस वीतसे;
पुढति शेखमहंमद मी नमीं, अहह ! तत्कृतिसिंधुंत मीनें मी९९

जनिं निरंजन माधवमुनीश्वर, सुकवि कृष्णदयार्णव ईश्वर;
कवि अनंत रमाप्रियदासही, वितरितों नमनांजलि त्यांसही १००

दासोपंतालागि चित्तीं स्मरावें, सत्काव्यांतें त्याचिया आदरावें;
वंदा वंदा थोर गोपाळनाथा, पूजा प्रेमें अंतरीं देवनाथा १०१

नमीं सर्वभावेंचि आनंदनंदें,
जयाचें असे काव्य आनंदकंदें.
शुभानंद सप्रेम तो आदरावा,
तसा चित्तिं चिंतामणी तो धरावा १०२

महीपूर्व लोकीं पती संत वर्णी,
तयाचा ध्वनी येतसे नित्य कर्णी,
कवीचें तया गाजतें फार नाम,

---

* कवींत श्रेष्ठ. १ त्याच्या काव्यसागरांत. २ मासा. ३ निरंजनमाधव. ४ शब्दसृष्टीचे ईश्वर. ५ रमावल्लभदास. ६ आनंदनामक वडिलांचा आनंद अर्थात् आनंदतनय. ७ आनंदाचें मूळ. ८ महीपूर्व पति म्हणजे महीपतिबोवा ताहराबादकर.

तयाला असो आमुचा हा प्रणाम १०३

सदा रंजवी बोधि आबालवृद्धां
कथोनी कथा पूर्विंच्या त्या समृद्धा.
जयाची कृती स्थान सर्वां रसांला
तया आज वंदू कविश्रीधराला १०४

कवि विठ्ठल[1] प्रभाकर[2] रघुनाथादिक[3] दुजे जुने झाले.
त्यांचीं काव्यें वाचुनि रसिकाचें हृदय संमदें[4] हाले १०५

जुन्या संस्कृतांतील त्या नाटकांस
मराठी नवा वेष घालावयास
पहा सज्ज झाले कवी गोडबोले[5].
तयांची कृती फार ती गोड बोले १०६

स्वसूत्रीं मराठीस घालोनि बंध
लिही थोर जो सर्वमान्य प्रबंध;
असा उद्यमी जो महाराष्ट्रिं झाला
नती त्या असो पांडुरंगात्मजाला[6] १०७

मराठींत झाले महाकोशकार
तिहीं कार्य केलें, तया मोल फार.
हरी[7] बाल[8] छत्रे[9] मराठीस सेवी,
स्वकीर्तीस मागें स्वयत्नींचि ठेवी १०८

---

१ रुक्मिणीस्वयंवर वगैरे काव्यें रचणारा बीडकर कवि. २ लावणीकार. ३ रघुनाथपंडित. ४ आनंदानें. ५ परशुरामपंत. ६ दादोबा तर्खडकर (व्याकरण-कार). ७ हरि केशवजी. ८ बाळशास्त्री जांभेकर. ९ सदाशिव काशिनाथ.

अलंकारि लेले[1] तसे राजवाडे[2]
तिहीं निर्मिले कीर्तिचे थोर वाडे.
महादेवशास्त्री[3], तसा ब्रह्मचारी[4]
मराठी कृतीची पताका उभारी १०९
महा अंकविद्[5], ज्योतिषी होय जाडा,
असा लोक गाती जयाचा पवाडा;
जगन्मित्र शिष्यप्रिय प्राज्ञ केरू[6],
नमीं शीलवन्मालिकेंतील[7] मेरू ११०
तयें निर्मिला शिष्य बाळासमान[8],
तया कोण सांगा न देईल मान ?
तयाची स्मृती आपणां द्यावयाला
उभी ठाकली दक्षिणा[9] पाठशाळा १११
चतुःशास्त्र[10]शाली द्विजश्रेष्ठ मोर[11]
न कोणीहि विद्वान् टिके त्यासमोर.
तया शिष्य तो लाभला प्राज्ञ[12] कृष्ण
तयानें गुरू जाहला शांत[13]तृष्ण ११२
असे शास्त्रसंपन्न, वैदर्भरीती[14]
तरी ग्रंथि दावी, सुधी ती स्तवीती.

---

१ साहित्यशास्त्रकार गणेशशास्त्री. २ अलंकारविवेककार कृष्णशास्त्री. ३ कोल्हटकर. ४ विष्णुबोवा. ५ गणितशास्त्रज्ञ. ६ केरूनानां छत्रे. ७ शीलवान् पुरुषांच्या माळेंत अग्रगण्य. ८बाळगंगाधर टिळकांसारखा. ९ डेक्कन कॉलेज. यांत केरोपंतांचें तैलचित्र आहे. १०चार शास्त्रें पढलेला ११ मोरशास्त्री साठे.१२ विद्वान् कृष्णशास्त्री चिपळूणकर. १३संतुष्ट. १४ साहित्यशास्त्रांत वैदर्भी या नांवाची एक भाषाशैली सांगितली आहे. ती प्रसादगुणविशिष्ट असते.

प्रसन्ना तयें निर्मिली लेखमाला
सदादर्शवंत्[1] जाहली ती जनाला ११३

असे न्यायतर्कादि वादांत दंग
तरी अंतरीं त्याचिया काव्यरंग;
मराठी कशी गोड साधी लिहावी
तिचा मार्ग भावी पिढीलागि दावी ११४

पढे आंग्लभाषा, तिच्यांतील रत्नें
मराठींत आणोनि ठेवी प्रयत्नें.
करी देशबंधूं-प्रति ज्ञानदान,
तयाचा तुम्ही कां न ठेवाल मान? ११५

जयाचा महोद्योग चाले अखंड, तशी शोधबुद्धी जयाची उदंड.
करी टांचणें माहितीचीं सदाही, लिही लेख गोपाल[2] बोधार्थ पाहीं.
जणो चालता बोलता पूर्वकाल[3], गमे वृत्तभांडार मोठें विशाल;
असें बोलणें स्पष्ट,दृष्टी हिताची,बुजावी स्मृती काय सांगा तयाची?
जया नाम साजे महादेव[4] कुंटे, मती तीव्र ज्याची कुठेंही न खुंटे;
जसी पावसाची सरी थोर साची, तशी होय वक्तृत्वशैली तयाची?
तयाच्या पुढें नर्तकी होय वाणी,करी स्वैर लीला तिला कोण वानी!
मऱ्हाटी खरी आवडे त्यास भारी,तिला आदरी संस्कृता दूर सारी.
असा मान देई मराठीस मोठा,लिही तीच आणीतसे तीच ओंठा.
मराठी जुन्या थोरविद्येस मानी,तयालागि चित्तांत मी कां न आणीं?

---

१ निर्मल आरशासारखी. २ गोपाळराव हरि देशमुख. ३ इतिहास. ४ महादेव मोरेश्वर कुंटे.

जनीं राजसेवा, मनीं लोकसेवा,- नव्या भक्तिपंथें[1] भजे देवदेवा[2].
जया बुद्धि मोठी कुशाग्रा विशाला, जयाच्या न सीमा असे उद्यमाला.
जसा नाटकामाजि तो सूत्रधार, तसा चालवी तो सदा कारभार;
स्वदेशोन्नतीचे बहू मार्ग दावी, गुणी माणसा देशकार्यासि लावी.
महाधूर्तता थोर गांभीर्य पोटीं, कुतर्का कुभांडासि तो दूर लोटी.
वसे नेहमीं फार माधुर्य ओंठीं, तयें साधि कामें भलीं मोठमोठीं.
विपक्षांतही[3] मान मोठा तयाला, स्वकर्तव्यरंगीं सदा दंग झाला.
अहोरात्र चिंता स्वदेशार्थ वाही, सुधी होइ सुस्नात लोकप्रवाहीं[4].
असे नम्रता कल्पनाही उदार, जना घेउनी चालवी कारभार.
पुरे शत्रुचे आकळी डावपेंच, करी फोल ते सर्वही युक्तिनेंच
करी सर्व कांहीं, अहंकार नाहीं; कधीं शत्रुचे तीव्र आघात साही.
जुन्या चांगल्याचा बहू गर्व वाही, नव्या वाइटापासुनी दूर राही.
सदा हंस नीर त्यजी, क्षीर घेई, गुणां, दोष टाकोनि, तो मान देई.
निराशा तयाला कधींही न वाटे, मनीं मोद आशाभरें थोर दाटे.
महासंकटें दूर होतील सर्व, दिसेल प्रयत्नें जना मोदपर्व[5].
धरी भाव ऐसा, करी थोर यत्न. असें तें महादेव[6] गोविंद रत्न !
तयाची प्रभा फांकली दिव्य भारी, करा आज कार्यें तिच्यामाजि सारीं
तया माधवाची स्मृति प्रेमपूर्ण, करो देश सामर्थ्यसंपन्न तूर्ण.
असे आंग्ल तें सर्वही चांगलेंच, स्वदेशामधें ग्राह्य कांहीं नसेच;

स्वधर्म स्वभाषा स्वदेश स्वरीति '

---

१ प्रार्थनासमाज-पद्धतीनें. २ एकेश्वरी मताप्रमाणें एका परमेश्वराला. ३ प्रतिप्रक्षांत. ४ लोकमताला मान देणारा. ५ आनंदाची पर्वणी. ६ न्या. महादेव गोविंद रानडे.

स्वविद्या ययांची टवाळी करीती— १३०
असे माजले अंबरीं मेघ कृष्ण
महावात जन्मे जनीं विष्णु[1]कृष्ण !
तयें स्वप्रतापें चमत्कार केला,
घनाटोप[2] मोठा लया शीघ्र नेला. १३१
" जुनें चांगलें प्रेमभावें भजावें,
जुनें ओखटें[3] सर्वभावें त्यजावें.
असे चांगलें तें पराचेंहि घ्यावें,
पराचें अकल्याणकारी त्यजावें १३२
असें कोण मी हें पुरें ओळखावें,
असे काय कर्तव्य चित्तीं पहावें;
कसा धर्म माझा करावा विचार,
त्यजावे झणीं सर्व विक्षेप[4] चार[5] १३३
असे केविं भाषा, दिसे केविं देश,
कशी होति विद्या कला रीति वेश !
करो कल्पना ही मनांत प्रवेश
जनालागि सद्बुद्धि देवो परेश " १३४
अशी[6] भावना चित्तिं त्याच्या उदेल्या
तयांनींच लीला सुमालेंत[7] केल्या.
विपक्षीं[8] समर्था न भ्याला कदापि

---

१. विष्णुशास्त्री चिपळूणकर. २ मेघांचें बंड. ३ वाईट. ४ विकल्प. ५ चेष्टा. ६ वरील. ७ निबंधमालेंत. ८ प्रतिपक्षाला.

करोनी प्रमाणें पुढें, त्यास दापी १३५
निबंधावली[1] बासरी[2] दिव्य भासे
ध्वनीनें तिच्या चित्त भारी विकासे,
कधीं मोदरोमांच[3] अंगीं थरारे,
कधीं खेद आश्चर्य वृत्तींत थारे. १३६
कधीं ती करी हर्षुनी नर्तनास,
समर्याद केव्हां करी मंद हास;
कधीं पाउलें टाकि ती मंद मंद,
कधीं ईक्षणें[4] प्रेरि आनंदकंद १३७
कधीं काव्यरंगीं करी ती विहार,
कधीं वर्णि देशस्थितीचे प्रकार.
कधीं देशभाषास्वरूपा विवेची,
कधीं राजनीतीवरी शब्द वेंची. १३८
कधीं ती महाभागचारित्र्य वानी,
कधीं रंजवी ती विनोदी कथांनीं;
कधीं भाषितें वाचकां रम्य दावी,
तयांचीं मनें त्यांमुळें तुष्ट व्हावीं १३९
विधर्मी[5] कुचेष्टा करी त्यास दंडी[6],
सधर्मी[7] बके[8] तन्मतालागि खंडी;
कुणी सत्यवादी, कुणी क्षेमवादी,

---

१ निबंधमाला. २ पांवा, मुरली. ३ आनंदाचा कांटा. ४ कटाक्ष. ५ परधर्मी. ६ त्यावर टीकेचा भडिमार करी. ७ स्वधर्मांतला. ८ बडबड करी.

जनीं चावळे, दावि ती त्यास वादी १४०
कधीं सांगते रम्य पूर्वेतिहास,
कधीं वार्णि वक्तृत्वलोकभ्रमांस;
अशा रम्य लीला करी फार मौला,
सदा बोधिती रंजवीती मनाला १४१
निशा येउनी लोक दिङ्मूढ झाले,
असें विष्णुशास्त्र्यांचिया ध्यानिं आलें.
शलाका प्रबोधार्थ लेखांजनाची
तयें निर्मिली दीर्घयत्नेंचि साची १४२
महोदार सद्वैद्य पियूषपाणी
सुदैवें मिळाला मनामाजि आणीं;
तया वंदुनी बोध त्याचा स्मरावा,
तयें दाविला मार्ग तो आदरावा १४३
तयें स्थापिल्या भिन्न विज्ञानशाला,
शिकोनी तयांमाजि त्यांलागि पाळा;
उठा उद्यमी व्हा, विकल्पास सोडा,
निजें विक्रमें ऋद्धिसिद्धींस जोडा १४४
समाजांत ज्या दुष्ट अत्यंत रूढी
उराशीं सदा धारियेल्या विमूढीं,

---

१ मूर्खपणानें बोले. २ चाबकाचा फटकारा. ३ वक्तृत्व, लोकभ्रम हे निबंधमालेतील निबंध आहेत. ४ निबंधमाला. ५ अज्ञानाची झडप. ६ भ्रांत. ७ काडी. ८ जागें करण्याकरितां. ९ लेखरूप अंजनाची. १० अमृत अर्थात् यश आहे हातांत ज्याच्या असा;यशस्वी. ११ शिक्षणसंस्था. १२ अज्ञान लोकांनीं.

तयांचा समाचार घ्यायास सिद्ध, जनीं होय गोपाळ[1] तो सुप्रसिद्ध.

मनें कोंवळा निर्मळ प्रेमपूर्ण,
द्रवे पाहुनी फार अन्याय तूर्ण;
झटे नित्य सत्यप्रकाशार्थ लोकीं,
तयाचा नसे जन्म वायां विलोकीं १४६

गरीबींत त्याचा असे जन्म झाला,
सुविद्येसि साधी, मनीं फार घाला;
अनाथां भगिन्यादिकां बांधवांस
करायास साह्या कसी वीर कांस १४७

रहाणी तयाची असे फार साधी,
महोदार[2]संकल्पिं लागे समाधी;
असे अल्पसंतुष्ट, संपत्ति विद्या,
कृती आवडेना तयाला अवद्या[3] १४८

नसे आंत बाहेर कांहीं तयाला,
मनांतील बोलोनि दावी जनाला;
न भीति विधात्याचिही त्यास वाटे,
तयाच्या धजे कोण जायास वाटे ? १४९

जसी नर्मदा शर्मदा[4] शैलखंडां—
वरी तांडवा मांडिते ती उदंडा,
तशी चंड ओजस्विनी वाक्स्रवंती[5]
तयाची, जणों शारदा-वैजयंती[6] ! १५०

---

१ गोपाळ गणेश आगरकर. २ मोठे उदार विचार करण्यांत. ३ निंद्य. ४ कल्याण करणारी. ५ वाणीरूप नदी. ६ सरस्वतीच्या कंठांतील हार.

असा जाहला धन्य गोपाळराव,
तयाच्या ठिकाणीं असो प्रेमभाव;
सदा नाम त्याचें मुखालागि यावें,
तसें थोर तत्कार्य चित्तीं धरावें १५१

तयां ओके[1]-गुंजीकरांना[2] प्रणाम,
स्मरा विष्णु[3]चें श्रीधरा[4]चेंहि नाम;
नमूं माधवा[5], तेविं त्या शंकराला[6],
नती त्याहि रामोत्तरा[7] राजयाला. १५२

स्मरा धर्ममार्तंड[8] वैराजवासी[9],
जयें निर्मिलासे महाग्रंथराशी;
मराठीवरी प्रेम त्याचें उदार,
करी तींत वक्तृत्व तो जोरदार. १५३

नवा मार्ग कादंबरीलेखनाचा, जयें आदरीला जना मान्य साचा;
यथावत्[10] लिही रम्य संसारचित्रें, मना रंजवीती सदा तीं विचित्रें.
वसे अंगनावर्ग[11]दाक्षिण्य अंगीं, सदा रंगला वाङ्मयाच्याच रंगीं;
कधीं लेख वाचीतसे प्राज्ञरंगीं[12], हरिभाऊ[13] तो आठवे या प्रसंगीं.
पिकाच्यापरी बोलला मंजुवाणी, गमे श्रोतृवर्गास आनंदखाणी.
स्वदेशोन्नतीचा करी यत्न फार, स्मरा चित्तिं गोपाल[14] तो नैकवार[15].

---

१वामन दाजी. २ रामचंद्र भिकाजी. ३ विष्णु मोरेश्वर महाजनि. ४ श्रीधर गणेश जिनसीवाले. ५ महादेव शिवराम गोळे, महादेव चिमणाजी आपटे. ६ शंकर मोरो रानडे, शंकर बाळकृष्ण दीक्षित. ७ राजारामशास्त्री भागवत ८काशीनाथशास्त्री लेले, ९ वांईकर. १० असतील तशीं. ११ स्त्रीवर्गाविषयीं आदर. १२ विद्वानांच्या सभेंत. १३ हरि नारायण आपटे. १४ ना. गोखले. १५ वारंवार.

असे ज्ञात त्या अर्थशास्त्रेतिहास, करी राजनीत्या[1]गमीं तो प्रयास.
वदे इंग्रजी सांप्रदायीक गोड, दिसे त्यांत आंग्लांहि कांहीं न खोड,
असे हौस अध्यापनाची तयाला, प्रयत्नें पहा थोर आचार्य झाला.
सदा शिष्यवर्गा बहु प्रेम दावी, तयाची कथा निर्मला कां न गावी?
गुरू मानिता जाहला माधवा[2]ला, तयाचाचि मार्ग क्रमाया निघाला,
उभारी सभा[3] भारती सेवकांची, न त्याला अपेक्षा दुज्या स्मारकाची,
असे राजकीया[4] सभा हिंददेशीं, तिच्या लाभला मान्य अध्यक्षतेसी,
कधीं चित्त सामाजिकप्रश्निं घाली, तयामाजि तल्लेखनी दंग झाली.
करायास शिष्टाइ तो आफ्रिकेला, तसा आंग्लदेशासि गोपाळ गेला.
असा उद्यमी अल्पसंतुष्ट वाग्मी[5]. कशी तत्प्रशंसा करावी न आम्हीं ?
गणेशा[6] नमूं व्यंकटेशात्मजाला, मिळे आंकडेशास्त्रि हें नांव ज्याला.
खरा त्या कळे अर्थशास्त्रेतिहास, सदाही तयाचा निदिध्यास त्यास;
जिहीं निर्मिलें नाट्य[7] संगीतमिश्र, अहो वंद्य ते बाळगोविंद[8]मिश्र.
मराठींत केला जिहीं वाग्विलास, प्रणामांजली सर्व त्या कोकिलांस.
महाराष्ट्र व्हावा धनाढ्य स्वतंत्र, असा अंतरीं जो जपे पूत[9] मंत्र;
स्वतंत्र स्थिती आवडे ज्या स्वभावें, तया बाळ गंगाधरा आठवावें.
स्वदेशार्थ त्यानें तनुत्याग केला, जनांच्याचि आशीर्वचा जो भुकेला,
म्हणोनी जनें अर्पिली लोकमान्य, उपाधी[10] तयाला असामान्य[11] ! नान्य[12]
करीं लेखनी, आननीं ती रसज्ञा, करी वीर ऐसा स्वकार्य[13]प्रतिज्ञा,

---

१ राजकारणशास्त्रांत. २ माधवराजी रानडे यांना. ३ सरव्हंट्स आफ इंडिया सोसायटी. ४इंडियन न्याशनल कॉंग्रेस. ५भाषणचतुर. ६रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी. ७संगीत नाटकें. ८ बळवंतराव ऊर्फ अण्णा किर्लोस्कर व गोविंदराव देवल यांच्यासारखे आदरणीय. ९ पवित्र. १० पदवी. ११ दुसऱ्या कोणाला न मिळणारी. १२कमी योग्यतेची दुसरी नाहीं. १३ देशस्वातंत्र्य.

महाधैर्य तेजस्विता अंतरांत, उभा ठाकला तो महासंगरांत
दुज्या बाजुला सर्व सामर्थ्य सत्ता, तशी प्राज्ञ लोकांतली बुद्धिमत्ता.
असें थोर वैषम्य[1] पक्षांत दोन
किती विस्मयाविष्ट[2] होती बघोन। १६७
बहू काल संग्राम तो घोर चाले
सुटे कंप भूमीस, ती फार हाले !
गमे हर्ष त्यां संकटांमाजि थोर
घना पाहुनी हर्षतो जेविं मोर १६८
धडाडी तयाची बघोनी विपक्ष
मनामाजि धाके, तसा हो विलक्ष;
कधीं कौतुकें बाललीलांस पाही
कधीं त्रास पावोनि खेदास वाही. १६९
असें चाललें चंड दोर्दंडयुद्ध
बहू जाहले खिन्न चित्तीं प्रबुद्ध,
मनीं वांछिती सिद्धि बाळास यावी
प्रभूची कृपा त्यावरी पूर्ण व्हावी. १७०
परी शत्रु भारी, करी जोर फार,
धरी रोष चित्तीं, करी तीव्र वार;
तरी त्या वरी नीतिरूपा[12] जयश्री;
विपक्षा मिळाली बळाची[13] जयश्री ! १७१

---

१ भेद, विरोध. २ आश्चर्यचकित, थक्क. ३ टिळकांस. ४ शत्रु. ५ विस्मययुक्त. ६ बाळ गंगाधर. ७ भयंकर. ८ बाहुयुद्ध. ९ ज्ञाते. १० टिळकांस. ११ नैतिक. १२ जय. १३ सत्तेचा जय.

विपक्षा बघोनी दडे भ्याड कोणी.
असा वीर झाला न लोकांत कोणी.
सदा संकटीं दंड ठोकोनि ठाके,
तयाच्या पुढें शत्रुसंघात वांके; १७२
जनीं ध्यानिं तेवीं मनीं स्वप्निं नाहीं
स्वदेशोन्नतीवांचुनी अन्य कांहीं;
सदा नीतिनें वागणें, वेष साधा,
न झाली तयाला अहंकारबाधा १७३
जनाला गमे तो खरा थोर वाली,
तदन्तें जनाची महाहानि झाली;
प्रभूला किती प्रार्थिती प्रेमभावें
'पुन्हां बाळगंगाधरा जन्म द्यावें.' १७४
नवा शंकराचार्य हा काय झाला!
असें वाटतें पंडितांच्या मनाला.
रची कर्मयोगार्थ गीतारहस्य
गमे निर्विकारां बुधां तें प्रशस्य १७५
धरी जें करीं कार्य तें सिद्ध व्हाया
करी यत्न, योजी हजारों उपायां.
महायत्नवादी त्यजीना स्वकार्य,
चिकाटी अशी तो धरी वीर आर्य १७६
जसा वृक्ष अर्पी परार्थ स्वकाया,
तसा बाळ लोकां सजे देह द्याया;
दिसेना जनीं ही अशी वीरवृत्ति,

तयाची जनें ही स्मरावी प्रवृत्ति १७७
जनीं वागणें योग्य 'जैशासि तैसें',महातत्त्व सांगे जनालागिं ऐसें;
फल त्यागुनी जाहला कर्मयोगी, तनु त्यागुनी स्वर्गलोकासि भोगी
तयाचें सदा पुण्य नाम स्मरावें, फलत्यागतत्त्वा तयाच्या वरावें,
तयाचें सदा शुद्ध चारित्र्य गावें, तयांतील मर्मांकडे लक्ष्य द्यावें;
तयासारिखें धैर्य चित्तीं धरावें,
करावें सुविद्येवरि प्रेम भावें;
मनीं देशकल्याणचिंता असावी,
कृती त्याप्रमाणें स्वहस्तें करावी १८०
कवी संत भूपाल जे पुण्यधाम[1]
दुजे राहिले त्यांप्रतीही प्रणाम.
स्वदेशी स्वतंत्र, स्वधर्म स्वतंत्र,
स्वभाषा तशी हो पुरी आत्मतंत्र[2] ! १८१
जपा 'राष्ट्रदेवो भव त्वम्' सुमंत्र,
तसें आचरा, व्हा सुखें आत्मतंत्र.
करा, सिद्धि ज्यामाजि, तो आत्मयज्ञ,
असें बोधिती दूरदर्शी[3] नयज्ञ[4] १८२
धरा कंठिं या पुण्य नामावलीला,
स्मरा पूर्वजांच्या महोदार लीला,
करा नित्य त्यां प्रेमभावें प्रणाम.
तयानें तुम्ही व्हाल संपूर्णकाम[5]. १८३

---

१ पुण्याचें घर. २ स्वतंत्र. ३ दीर्घदृष्टी. ४ व्यवहारज्ञ. ५ इच्छा पुरी झालेले.

REFBK-0002347

REFBK-0002347